पुणे, बुधवार, ९ ऑक्टोबर २०२४ • RASHTRA SANCHAR-Vol-3-issue 300 • वर्ष ३ रे, अंक ३०० • किंमत ₹ ६ • पाने : १२

राष्ट्रसंचार
@rashtrasanchar.com
BEYOND THE NEWS

## हरयाणात भाजपची हॅट्ट्रिक : एक्झिटपोलचे अंदाज चुकले

# पेरली जलेबी उगवलं कमळ!



काँग्रेसचा विजय निश्चित मानून काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष सुरू केला, ढोल ताशे वाजू लागले होते. कार्यकर्ते फटाके फोडून एकमेकांना लाडू, जिलेबीचा तुकडा मोडे पर्यंत वारे विरुद्ध दिशेने वाहत भाजपच्या बाजूने वाहत काँग्रेस मोठ्या फरकाने पिछाडीवर पडली आणि चमत्कार घडला.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** लोकसभा निवडणुकीत भाजपने हरयाणात पाच जागा जिंकल्या, तर २०१९ मध्ये भाजपने सर्व १० जागा जिंकल्या. यानंतर हरयाणा विधानसभा निवडणुकीत बाजी काँग्रेसच्या बाजूने असल्याचे वातावरण निर्माण होऊ लागले. मात्र भाजपने हा सगळा खेळच उलटला. केवळ विजयाची नोंद केली नाही तर २०१४ आणि २०१४ च्या विधानसभा निवडणुकीपेक्षाही मोठा विजय मिळवला.

हरयाणा व जम्मू -काश्मीर विधानसभेचा ऐतिहासिक निकाल काल लागला. यामध्ये हरयाणा विधानसभा निवडणुकीत भाजपने बहुमताचा आकडा ओलांडून .

९० पैकी ४८ जागांवर भाजपने निर्णायक विजय मिळवित हट्ट्रिक केली आहे. काँग्रेस ३५ जागांवर तर अपक्ष ३ जागांवर विजय मिळवला. एक्झिट पोलच्या सर्व अंदाजांच्या अगदी विरुद्ध हा निकाल आहे. अशा तऱ्हेने भाजपने आपली जुनी युक्ती आजमावून हरयाणा निवडणुकीचा डाव फिरवला आहे. हरयाणात इतिहास रचताना भाजपने विजयाची हॅट्ट्रिक केली आहे. यापूर्वी राज्यात सलग तीन निवडणुका कोणत्याही राजकीय पक्षाला जिंकता आल्या नव्हत्या.

हरयाणा विधानसभा निवडणुकीचे निकाल काहीसे अनपेक्षित लागले आहेत. जवळपास सर्वच एक्झिट पोलच्या अंदाजानुसार काँग्रेसचा एकतर्फी विजय होईल, असा अंदाज वर्तवण्यात आला होता. सुरुवातीच्या ट्रेंड्सनुसार काँग्रेस आघाडी घेताना दिसत होती. मात्र नंतर चित्र पुर्ण पालटले आणि भाजपने जोरदार मुसंडी मारली. ताज्या आकडेवाडीनुसार **काँग्रेसचे** » पान ७ वर

## काँग्रेसला गुलिगत धोका
### भाजपचा झापुक झुपूक विजय





| विधानसभा निवडणूक निकाल २०२४ — हरियाणा | एकूण जागा ९० |
|---|---|
| पक्ष | जागा |
| भाजपा -८ | ४८ |
| काँग्रेस +६ | ३७ |
| INLD -८ | २ |
| अपक्ष | ३ |
| बहुमत - ४६ | |



हरियाणाचे विद्यमान मुख्यमंत्री नायब सिंह सैनी

| विधानसभा निवडणूक निकाल २०२४ — जम्मू काश्मीर | एकूण जागा ९० |
|---|---|
| पक्ष | जागा |
| एनसी + +२५ | ४२ |
| भाजपा -१ | २९ |
| काँग्रेस | ०६ |
| पीडीपी ३ -२६ | |
| अपक्ष | १० |
| बहुमत - ४६ | |



ओमर अब्दुल्ला जम्मू-काश्मीरचे नवे मुख्यमंत्री



### कुस्तीपटू विनेश फोगाटने राजकीय मैदान मारले!

• हरयाणा विधानसभा निवडणुकीतकाँग्रेसच्या बहुतेक महत्त्वाच्या उमेदवारांनी निराशा केलेली नाही. कुस्तीपटू विनेश फोगाट यापैकीच एक आहे. विनेशने आपली पहिली-वहिली निवडणूक मोठ्या फरकाने जिंकली आहे. आंतरराष्ट्रीय कुस्तीच्या आखाड्यातून निवृत्ती घेतलेल्या व भारतीय जनता पक्षावर नाराज असलेल्या फोगाट हिने विधानसभा निवडणुकीच्या आधी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता.



### ओमर अब्दुल्ला जम्मू-काश्मीरचे नवे मुख्यमंत्री

• जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकांमध्ये नॅशनल कॉन्फरन्स (एनसी) सर्वात मोठा पक्ष म्हणून पुढे येऊ लागला आहे. नॅशनल कॉन्फरन्स व कॉंग्रेस यांच्या आघाडीनं बहुमताचा आकडा पार केला असून ओमर अब्दुल्ला जम्मू-काश्मीरचे नवे मुख्यमंत्री होतील, हे आता स्पष्ट झालं आहे. ओमर अब्दुल्ला यांचे वडील व जम्मू काश्मीरचे माजी मुख्यमंत्री फारुख अब्दुल्ला यांनीच ही माहिती दिली आहे.



### 'आप'ने खाते खोलले

• मेहबूबा मुफ्ती यांच्या 'पीडीपी'ला अवघ्या तीन जागा मिळाल्या. मुफ्ती यांची मुलगी इल्तिजा हिलाही पराभव पत्करावा लागला. विशेष म्हणजे जम्मू-काश्मीरमध्ये आम आदमी पक्षाने खाते खोलले आहे. 'आप' उमेदवार मेहराज मलिक यांनी डोडा मतदार संघात विजय मिळवला.

## पन्नास लाखाचे कोरलीन रॉक्स जप्त

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे:** पुणे वनविभागाने सुमारे ५० लाखाचे कोरलीन रॉक्स ( कोरलीन शेवाळ जलचर वनस्पती) जप्त करून एकास अटक केली आहे. ही कारवाई विमाननगर परिसरातील पीएनजी ज्वेलर्सच्या पाठीमागे असलेल्या बीसिंग्स एक्वैरियम हिंद विजय सहकारी एचएसजी सोसायटीमध्ये केली आहे. पुणे वनविभागाने केलेल्या या कारवाईचे सर्वत्र कौतुक होत आहेत. अमलान असीम बिश्वास (रा. जेनेसीस हौसिंग सोसायटी, आळंदी रोड, वडमुखवाडी, ता. हवेली, जि. पुणे) असे गन्हा दाखल करून अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून अनाधिकृतपणे ठेवण्यात आलेले १९७.६७ किलोग्राम वजनाचे कोरलीन रॉक्स व मॅकॉ जातीचे दोन पोपट जप्त करण्यात आले आहे. सदरची कामगिरी पुणे वनविभागाचे मुख्य वनसंरक्षक एन आर प्रविण, उपवनसंरक्षक महादेव मोहिते, सहाय्यक वनसंरक्षक अतुल जैनक, » पान ७ वर

### प्रफुल पटेलांची घोषणा ; काका पुतण्यात निवडणुक अटळ

# बारामतीतून 'दादा'च

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई:** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे मतदारसंघ बदलाची चाचपणी करत असल्याच्या चर्चा सुरू असतानाच राष्ट्रवादीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल यांनी बारामतीमधून अजित पवारांना बारामतीमधून उमेदवारी जाहीर केली आहे. अजित पवार हेच बारामती विधानसभा निवडणूक लढवतील अशी घोषणा प्रफुल पटेल यांनी यावेळी केली.

अजित पवार हे पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष असल्याने ते स्वत:ची उमेदवारी जाहीर करू शकत नाहीत. त्यामुळे राष्ट्रीय कार्याध्यक्ष या नात्याने मी त्यांची उमेदवारी जाहीर करतो, अशी घोषणा प्रफुल पटेल यांनी केली.

सोमवारी रात्री पार पडलेल्या बारामतीमधील व्यापारी मेळाव्यात



बोलताना बारामतीतून आपणच उमेदवार असू, असे अप्रत्यक्षरित्या अजित पवार यांनी सांगितले. तुमच्या मनातील उमेदवार बारामतीत असेल फक्त घडाळ्याचे चिन्ह दाबा आणि त्याला विधानसभेत पाठवा, असे अजित पवार म्हणाले होते

सुप्रिया सुळे विरुद्ध सुनेत्रा पवार या नणंद भावजय यांच्यात झालेल्या लोकसभा निवडणुकीत सुनेत्रा पवार यांना मोठ्या प्रमाणात सुप्रिया सुळेंकडून पराभव पत्करावा लागला होता.

#### पवारांची जादू...

• राजकीय पक्षांकडून इच्छूक उमेदवारांचे अर्ज मागवण्यात येत असून मुलाखती देखील घेतल्या जात आहेत. पण या सगळ्यात शरद पवारांची जादू पाहायला मिळत आहे. तुतारीकडे बऱ्याच उमदवारांचे कल दिसत आहे.

## माजी आमदार मुरकुटे यांना अटक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**श्रीरामपूर :** श्रीरामपूरमधील माजी आमदार भानुदास मुरकुटे यांच्याविरुद्ध राहुरी पोलिस ठाण्यात अत्याचाराचा गुन्हा दाखल झाला आहे. राहुरी पोलिसांनी मुरकुटे यांना कालरात्री साडेअकरा वाजता त्यांच्या श्रीरामपूरमधील निवासस्थानातून अटक केली. मांजरी (ता. राहुरी) येथील महिलेने त्यांच्याविरोधात अत्याचाराची फिर्याद दिली आहे.

माजी आमदार मुरकुटे कामानिमित्त श्रीरामपूरबाहेर होते. मुंबईत होते. काल रात्री ते शहरात दाखल झाले. त्यानंतर राहुरी पोलिस त्यांच्या श्रीरामपूरमधील निवासस्थानी पोचले. पोलिसांनी चौकशी केल्यानंतर त्यांना ताब्यात घेत अटक केली. अटकेनंतर त्यांना रक्तदाबाचा त्रास होऊ लागल्याने त्यांना नगरमधील जिल्हा» पान ७ वर

# सरेंडर व्हा, नाहीतर एन्काऊंटर करू !

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यातील बोपदेव गँग रेप प्रकरणाला चार दिवस होऊन देखील आरोपींचा शोध लागलेला नाही. दरम्यान, पोलिस खबरींमार्फत आरोपींचा शोध घेत असून आरोपींना सरेंडर व्हा नाहीतर एन्काउंटर करू असा निर्वाणीचा इशारा दिल्याची माहिती आहे.

मुलीवर अत्याचार करणाऱ्या आरोपींनी केलेला प्रवास, बोपदेव घाट ते सासवड, कोंढवा परिसरातील सीसीटीव्ही फुटेजचा डेटा धुंडळला आहे. त्याद्वारे पोलिसांनी आरोपींच्या गुन्ह्याची कडी जुळविली असून, संबंधित आरोपींची ओळख पटल्याक्षणी त्यांच्या एन्काऊंटरची तयारी पुणे पोलिसांनी केली आहे. त्यासाठी एका विशेष पथकाची नियुक्ती केली असून, पथकाकडून एन्काऊंटरच्या प्रात्यक्षिकाची तयारी केली जात आहे.




» क्राईम

दरम्यान, आरोपींच्या अटकेच्या मागणीसह पीडित मुलीला न्याय मिळवून देण्यासाठी पुणेकरांसह विविध सामाजिक संघटनांनी मागणी केली आहे. त्या दृष्टीने पोलिसांकडून आता थेट एन्काऊंटरची तयारी केली जात असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

गुन्हे शाखेची पथके आरोपींच्या मागावर असून, सीसीटीव्ही आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) माध्यमातून संबंधित आरोपींची कुंडली मिळविण्यात पोलिसांना यश आले आहे.» पान ७ वर

## गरबा खेळता-खेळता हार्टअटॅकने एकाचा मृत्यू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**चाकण :** गरबा किंग म्हणून ओळखले जाणारे अशोक माळी हे चाकण येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात उत्साहाने गरबा खेळत होते. मात्र, अचानकपणे त्यांना तीव्र हृदयविकाराचा झटका आला. ज्यामुळे ते गरबा खेळता-खेळता जमिनीवर कोसळले. या घटनेनंतर लगेचच त्यांना वैद्यकीय मदत मिळवण्यासाठी प्रयत्न करण्यात आले, परंतु दुर्दैवाने डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. अशोक माळी यांच्या मृत्यूची घटना कॅमे-यात कैद झाली असून, या दुर्दैवी क्षणाचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत आहे. हा हृदयद्रावक प्रसंग उपस्थित असलेल्या अनेक चाहत्यांच्या डोळ्यांसमोर घडला,

# महिला अत्याचारांचे विरोधात महाविकास आघाडी आक्रमक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे शहर व परिसरात गेल्या काही दिवसांत महिलांवरील अत्याचारांच्या अनेक घटना उघडकीस आल्या आहेत. महाराष्ट्रातील महिलांच्या सुरक्षेबाबत राज्यातील सरकार टोकाचे उदासीन आहे. एकीकडे महाराष्ट्रातील प्रत्येक शहरात प्रत्येक गावात कुठेतरी महिलांवर अत्याचार सुरू असताना राज्यातील सरकार मात्र स्वतःची जाहिरात करण्यात मग्न आहे. या सरकारला शुद्धीवर आणण्यासाठी, महिलांच्या सुरक्षेबाबत त्यांना जाब विचारण्यासाठी खा.सुप्रियाताई सुळे यांच्या नेतृत्वात महाविकास आघाडीच्या वतीने अलका



खा. सुप्रियाताई सुळे यांच्या नेतृत्वात आंदोलन संपन्न

चौक येथे तीव्र आंदोलन करण्यात आले. गृहमंत्री राजीनामा द्या, मुख्यमंत्री राजीनामा द्या, महिला अत्याचाराने त्रस्त सरकार राजकारणात व्यस्त अशा घोषणांनी संपूर्ण डेक्कन परिसर दणाणून गेला. या आंदोलनास प्रशांत जगताप , अरविंद शिंदे , संजय मोरे, गजानन थरकुडे, रवींद्र धंगेकर,रमेशदादा बागवे, मोहनदादा जोशी, स्वाती पोकळे, डॉ. सुनील जगताप, मंजीरीताई घाडगे, मनाली भिलारे, गणेश नलावडे, रोहन पायगुडे, राजश्री पाटील, संगीता तिवारी, अजीत दरेकर, तनया साळुंखे यांच्यासह महाविकास आघाडीचे शहरातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व सर्वसामान्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अयोध्येत साकारणार महाराष्ट्र भवन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** श्रीराम जन्मभूमी श्री अयोध्या धाम येथे राज्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून उभारण्यात येणाऱ्या महाराष्ट्र भवनच्या म्हणजेच भक्त निवासाच्या वास्तूचे भूमिपूजन मंगळवारी संपन्न झाले. राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण, यूपीचे उपमुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य यांच्या हस्ते हे भूमिपूजन करण्यात आले. या वेळी अप्पर सचिव मनीषा म्हैसकर, अयोध्येचे आमदार, खासदार उपस्थित होते.अयोध्येत महाराष्ट्रामधून आलेल्या प्रभू बालकराम मंदिरात प्रभू श्रीराम यांचे मनोभावे दर्शन घेण्यासाठी आलेल्या राम भक्तांच्या निवासाची उत्तम व्यवस्था देण्याच्या हेतून अयोध्येत महाराष्ट्र भवन उभारले जात आहे. यावेळी बालकराम मंदिराच्या उर्वरित बांधकामाचीही पाहणी चव्हाण यांच्यासह मान्यवरांनी केली. भूमिपूजन झाल्याने आता तेथे भवनचे काम सुरू करून लवकरच त्याचे बांधकाम पूर्ण होईल .

#रा

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रकृती बिघडली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रकृती बिघडल्यामुळे त्यांचे आजचे नियोजित कार्यक्रम रद्द करण्यात आले आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे आपल्या निवासस्थानी असल्याची माहिती मिळत आहे. प्रकृती ठीक नसल्यामुळे शिंदे यांनी आपला सोलापूर दौरा रद्द केला आहे. तसेच आज होणारी राज्य मंत्रिमंडळाची बैठकही पुढे ढकलली आहे. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर आजची मंत्रिमंडळाची बैठक महत्त्वाची मानली जात होती. शिंदे हे आज सकाळी साडेअकरा वाजता मुंबई विमानतळावरून सोलापूर शहरात होणाऱ्या वचनपूर्ती सोहळ्यासाठी जाणार होते. हा कार्यक्रम आज साडेबारा वाजता होणार होता व त्याची संपूर्ण तयारी प्रशासनाकडून करण्यात आली होती; मात्र शिंदे यांची तब्येत अचानक बिघडल्याने हा दौरा रद्द करण्यात आला आहे.




### विधानसभा निवडणुकीसाठी इच्छुकांच्या मुलाखती

# निसर्ग कार्यालयाला छावणीचे स्वरूप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सोलापूर, कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातील विधानसभांच्या उमेदवारीसाठी मंगळवारी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाच्या वतीने इच्छुकांच्या मुलाखती पार पडल्या मार्केटयार्ड येथे निसर्ग मंगल कार्यालय स्वतः शरद पवार, खासदार सुप्रिया सुळे, आमदार रोहित पवार यांनी मुलाखती घेतल्या. तिन्ही जिल्ह्यातून १०० च्या वर उमेदवारांनी यावेळी आपली इच्छा प्रदर्शित केली. प्रत्येक मुलाखतीवेळी पक्षाचे निरीक्षक आणि त्या त्या मतदारसंघाचे आजी तसेच माजी खासदार उपस्थित होते. सोलापूर जिल्ह्याच्या



वेळी धैर्यशील मोहिते- पाटील यांनी सर्व उमेदवारांच्या मुलाखती वेळी इच्छा दर्शवली. सोलापूर जिल्ह्यासाठी पंढरपूर, मंगळवेढा, मोहोळ, करमाळा या तालुक्यातून राष्ट्रवादी काँग्रेस करता अनेकांनी उमेदवारी मागितली आहे.

पंढरपुरातून भगीरथ भालके, तसेच माढा येथून अभिजीत पाटील, मोहोळ येथून राजू खरे तसेच रमेश कदम यांनी देखील उमेदवारी मागितली आहे. आपापल्या समर्थकांसह सर्वांनी सकाळी साडेअकरा वाजल्यापासूनच निसर्ग मंगल कार्यालयामध्ये गर्दी केली होती. तथापि तिसऱ्या मजल्यावर केवळ उमेदवार आणि त्याच्यासोबत एक प्रतिनिधी अशांच्या मुलाखती स्वतः शरद पवार यांनी घेतल्या. त्यामुळे दुपारपासून निसर्ग कार्यालयाला छावणीचे स्वरूप आले होते या तिन्ही जिल्ह्यातील प्रमुख कार्यकर्ते आमदार यांनी हा संपूर्ण परिसर गजबजून गेला होता. सकाळी बोपदेव घाटातील दुर्घटनेच्या ठिकाणी खासदार सुप्रिया सुळे यांनी भेट दिल्यानंतर त्या थेट या ठिकाणी आल्या त्या देखील मुलाखती होईपर्यंत स्वतः संपूर्ण प्रक्रियेमध्ये सहभागी होत उमेदवारांशी चर्चा करीत होत्या.

#रा

## २१ प्रसूतिगृहांसाठी केवळ आठ स्त्रीरोगतज्ज्ञ

# प्रसूतिगृहात स्त्री-रोगतज्ज्ञांची संख्या अपुरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** महापालिकेच्या सध्या प्रसूतिगृहांच्या तुलनेत स्त्रीरोगतज्ज्ञांची संख्या अपुरी आहे. पदांची संख्या मंजूर करणे हा धोरणात्मक निर्णय आहे. सध्या तात्पुरता उपाय म्हणून नॉन-क्लिनिकल कामामधील डॉक्टरांना प्रसूतिगृहांमध्ये ड्युटी देण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत.डॉ. लता त्रिंबके, वैद्यकीय अधीक्षक, प्रसूतिगृहांच्या अंतर्गत ऑडिटमध्ये प्रत्येक दवाखान्यामध्ये प्रसूतीसाठी नोंदणी करणाऱ्या गर्भवती, दर महिन्याला होणाऱ्या प्रसूती, अतिजोखमीच्या गर्भवतींची इतर रुग्णालयांमध्ये रवानगी केल्याची कारणे आणि त्यातील कोणती कारणे टाळता येऊ शकतात, याबाबत विश्लेषण करण्यात आले आहे. कोणत्या प्रसूतिगृहाने कोणत्या परिस्थितीत गर्भवती महिलांना कोणत्या दवाखान्यात पाठवावे, याचेही नियोजन करण्यात आले आहे.

> सध्या प्रसूतिगृहांच्या तुलनेत स्त्रीरोगतज्ज्ञांची संख्या अपुरी आहे. पदांची संख्या मंजूर करणे हा धोरणात्मक निर्णय आहे. सध्या तात्पुरता उपाय म्हणून नॉन-क्लिनिकल कामामधील डॉक्टरांना प्रसूतिगृहांमध्ये ड्युटी देण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत."
>
> — **डॉ. नीना बोराडे,** आरोग्यप्रमुख, पुणे महापालिका

किमान प्रत्येक परिमंडळातील प्रसूतिगृहांसाठी एक अशी पाच पदे भरण्याची मागणी पुणे आरोग्यप्रमुख डॉ. नीना बोराडे यांनी वरिष्ठांना केली आहे.

महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये गर्भवतींची तपासणी, उपचार, मार्गदर्शन आणि समुपदेशनासाठी स्त्रीरोगतज्ज्ञांची कमतरता भासत आहे. सर्व प्रसूतिगृहांमधील गर्भवतींवर उपचार करता यावेत, यासाठी स्त्रीरोगतज्ज्ञांना आठवड्याचे वेळापत्रक आखून देण्यात आले आहे. तसेच, ससूनला रेफर करण्याची संख्या वाढल्यास कारवाईचा बडगा उगारण्याचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे रेफर करण्याचे प्रमाण कमी झाले असले, तरी मोजक्या डॉक्टरांवर येणाऱ्या ताणाची समस्या सुटलेली नाही.

महापालिकेमध्ये स्त्रीरोगतज्ज्ञ पदाच्या कायमस्वरूपी १६ जागा मंजूर आहेत. पहिल्या टप्प्यात त्यापैकी केवळ 8 जागा भरण्यात आल्या. ही पदे भरूनही आता ४ वर्षे झाली आहेत. त्यानंतर आजवर उरलेल्या जागा भरण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे एकेका स्त्रीरोगतज्ज्ञाला एका दिवशी ३ ते ४ प्रसूतिगृहांची जबाबदारी सांभाळावी लागत आहे. याचीच परिणती म्हणून अतिजोखमीच्या गर्भवती स्त्रियांची ससून रुग्णालयात रवानगी केली जात आहे.

महापालिकेच्या अंतर्गत शहरामध्ये २१ प्रसूतिगृहे कार्यरत आहेत. प्रत्येक रुग्णालयामध्ये महिन्याला ४०० ते ५०० प्रसूती होतात. मात्र, २१ प्रसूतिगृहांमध्ये केवळ ८ स्त्रीरोगतज्ज्ञ कार्यरत आहेत.

### काय आहेत समस्या?

- वेतनश्रेणी कमी आणि कंत्राट पद्धतीने भरती, अशा अटी असल्यामुळे डॉक्टरांना महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये रुजू होण्याची इच्छा नसते.
- पुणे महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये ओपीडीची वेळ 9 ते 5 असल्यामुळे रुग्णांची संख्या जास्त असते. मात्र, त्यांना तपासण्यासाठी अपुरे डॉक्टर आहेत.
- महापालिकेकडून अनेकदा जाहिरात देऊनही वेतन कमी असल्यामुळे डॉक्टरांचा प्रतिसाद मिळत नाही.
- भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालयातील प्राध्यापक आणि सहयोगी प्राध्यापक कमला नेहरू रुग्णालयात ओपीडीमध्ये रुग्णांच्या तपासणीसाठी येतात. मात्र, इतर रुग्णालयांमध्ये कमी डॉक्टर असल्याने ओढाताण होते.

## नदीपात्रामध्ये स्वच्छता, संवर्धन अभियान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** 'स्वच्छता हे प्रत्येकाचे कर्तव्य' हा संदेश देण्यासाठी 'स्वच्छता हीच सेवा', या कार्यक्रमाचे आयोजन केंद्र सरकारच्या अभिनव मोहिमेअंतर्गत करण्यात आले होते.ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरिअल सोसायटीचे (एआयएस एसएमएस) अभियांत्रिकी महाविद्यालय, राष्ट्रीय सेवा योजना, ससून सर्वोपचार रुग्णालय आणि शिवाजीनगर बसस्थानकातर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमात महाविद्यालय व शनिवारवाडा परिसर, ओंकारेश्वर मंदिर आणि मुळा-मुठा नदीपात्रात स्वच्छता व संवर्धन अभियान राबविण्यात आले. याप्रसंगी ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरिअल सोसायटीचे सचिव मालोजीराजे छत्रपती, सहसचिव एस. पी. शिंदे, खजिनदार अजय पाटील, व्यवस्थापकीय समितीचे चेअरमन भगवानराव साळुंखे, राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रादेशिक संचालक अजय शिंदे, आदी उपस्थित होते.

» Selected

## संत निरंकारी मिशनच्यावतीने आयोजित रक्तदान शिबीर संपन्न



**पुणे :** संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा, संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनद्वारा विशाल रक्तदान शिबिरांचे आयोजन शाखा कोथरुड, झोन पुणे येथे करण्यात आले होते. यामध्ये २६९ संत निरंकारी मिशनच्या अनुयायांनी निस्वार्थीपणे रक्तदान केले. रक्त संकलनासाठी वाय सी एम रक्तपेढी आणि ससून हॉस्पिटल रक्तपेढी यांनी आपले योगदान दिले. या शिबिराचे उद्घाटन चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते संपन्न झाले. उद्घाटन प्रसंगी संबोधित करताना त्यांनी निरंकारी मिशनच्या माध्यमातून होणाऱ्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. संत निरंकारी मिशन द्वारा मानवतेच्या कल्याणार्थ वेळो-वेळी संपूर्ण विश्वामध्ये अनेक जनसेवेचे उपक्रम आयोजीत करण्यात येतात, ज्यामध्ये मुख्यतः स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, निशुल्क आरोग्य तपासणी, नेत्र चिकित्सा शिबीर तसेच महिला सशक्तीकरण, बाल-विकास, नैसर्गिक संकटांच्या वेळी सहायता यांसारख्या कल्याणकारी योजनांचे आयोजन केले जाते.

## 'प्रभात ब्रास बँड'चे संचालक शेखर सोलापूरकर यांचे निधन

**पुणे :** शहरातील जुन्या 'प्रभात ब्रास बँड'चे संचालक आणि



तब्बल ५६ वर्षे बँडपथकामध्ये वादन करणारे कलाकार गजानन उर्फ शेखर सोलापूरकर (वय ६४) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्यामागे पत्नी, संगीतकार निनाद सोलापूरकर आणि प्रशांत सोलापूरकर हे दोन मुलगे असा परिवार आहे. प्रभात ब्रास बँडचे संस्थापक स्वर्गीय बंडोपंत सोलापूरकर यांचे शेखर हे पुत्र होत. बँडपथकामध्ये पट्टीतरंग, क्लॅरोनेट आणि सिंथेसायझर वादन करण्यामध्ये सोलापूरकर यांचा हातखंडा होता. गांधर्व महाविद्यालयातून संवादिनीवादनाचे शिक्षण घेतलेल्या शेखर यांनी वडील सूरमणी बंडोपंत यांच्याकडून क्लॅरोनेटवादनाची कला आत्मसात केली. बँडवर भक्तिगीत, भावगीत, राष्ट्रभक्तीपर गीत तसेच शास्त्रीय संगीतावर आधारित चित्रपट गीत वाजवण्यात त्यांचा हातखंडा होता.

## अधिछात्रवृत्ती १०० टक्के देणार

**पुणे :** सरसकट अधिछात्रवृत्तीची मागणीसाठी आंदोलन करणाऱ्या उमेदवारांना अखेर न्याय मिळाला आहे. छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्थेच्या (सारथी) ९६९ उमेदवारांना नोंदणी दिनांकापासून १०० टक्के दराने अधिछात्रवृत्ती देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. यापूर्वी एकूण ३ हजार ५४५ संशोधक उमेदवारांपैकी पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना कागदपत्रांची पडताळणी करून ५० टक्के दराने सरसकट अधिछात्रवृत्ती देण्याचा निर्णय घेतला होता.

३ हजार ५४५ उमेदवारांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेच्या (बार्टी) ७६३, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या (महाज्योती) १४५३ आणि सारथीच्या १३२९ उमेदवारांचा समावेश होता.मात्र, बार्टीच्या ७६३ उमेदवारांना कागदपत्रे पडताळणी करून शपथपत्र घेऊन सरसकट १०० टक्के दराने अधिछात्रवृत्तीचा लाभ देण्यास सामाजिक न्याय आणि विशेष सहाय विभागाने १० सप्टेंबर रोजी मान्यता दिली. या पार्श्वभूमीवर बार्टीच्या उमेदवारांना सरसकट लाभ दिला जात असताना सारथीच्या संशोधक उमेदवारांना ५० टक्के दराने अधिछात्रवृत्ती देऊन सरकार भेदभाव करत असल्याचा आरोप करण्यात आला होता.

## काँग्रेसने मुस्लिमांना व्होट बँक म्हणून पाहिले-किरण रीजिजू

**पुणे :** माझ्याकडे देशाचे अल्पसंख्याक मंत्रालय कामकाज आहे. काँग्रेस



काळात या मंत्रालयास खूप बदनाम करण्यात आले. केवळ मुस्लिम मंत्रालय असे त्याला दाखवले गेले. पण आमचे मंत्रालय सहा धर्मियांसाठी काम करत आहे. मी ठिकठिकाणी जाऊन खरी परिस्थिती मांडून दुरुस्ती करत आहे. काँग्रेसने मुस्लिमांना व्होट बँक म्हणून पाहिले. त्यामुळे ते अल्पसंख्याक मंत्रालय हे मुस्लिम मंत्रालय असल्याचे दाखवण्याचे प्रयत्न करत आहेत, असा आरोप केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरण रीजिजू यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत केला. यावेळी पुणे भाजप शहराध्यक्ष धीरज घाटे, माजी मंत्री दिलीप कांबळे उपस्थित होते. रीजिजू म्हणाले, महाराष्ट्रामध्ये मी दौरा करत आहे कारण महाराष्ट्र वीरांची भूमी असून त्यातून देशाला प्रेरणा मिळते. राज्याला देशातील राजकारणात सध्या बदनाम करण्यात आले असून विरोधकांकडून दिशाभूल करण्यात येत आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी अपप्रचार करतात की, भारतात लोकशाही संपुष्टात आली आहे. अल्पसंख्याकांची गळचेपी होत आहे परदेशात जाऊन देशाला बदनाम करण्याचे काम विरोधक करत आहे. देशविरोधी यांच्याशी संगनमत करून वेगवेगळे आरोप केले जातात. सर्व धर्मियांना सोबत घेऊन विकासाचे दृष्टीने आम्ही प्रयत्नशील आहे.

राष्ट्रसंचार | राष्ट्रीय स्वच्छता अभियान | रा

## नागरिकांनी कृत्रिम प्लॅस्टिक फुलांचा वापर टाळावा

**पुणे :** राष्ट्रीय स्वच्छता अभियानाअंतर्गत प्लॅस्टिकच्या फुलांचा वापर आणि धोके या बाबत शेतकरी आणि नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी पुष्पसंशोधन संचालनालनालय, केए बायोप्लांट, राइज अँड शाइन, फ्लॉवर ग्रोवर्स कौन्सिल इंडिया, सोएक्स फ्लोरा आणि सहकारी शेतकरी फूल नर्सरी गट यांच्या वतीने फ्रेश फ्लॉवर्स आणि शोभिवंत झाडे यांचा वापर वाढण्यासाठीच्या कार्यशाळा आयोजित केली गेली होती. प्लॅस्टिकच्या बेसुमार वापरामुळे पर्यावरणीय समस्या उभ्या राहात आहेत. त्यातच प्लॅस्टिकच्या फुलांची भर पडली असून, प्लॅस्टिक फुलांचा वापर हा पर्यावरणासह शेती आणि शेतकऱ्यांना घातक ठरत आहे. त्यामुळे नागरिकांनी कृत्रिम प्लॅस्टिक फुलांचा वापर टाळावा, असे आवाहन पुष्पसंशोधन संचालनालयाचे संचालक डॉ. के. व्ही. प्रसाद यांनी केले.

या वेळी राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्रांचे संचालक डॉ. कौशिक बॅनर्जी, सीबीआयचे पोलिस उपमहासंचालक डॉ. सुधीर हिरेमठ, सोएक्स फ्लोराचे वरिष्ठ उपाध्यक्ष नरेंद्र पाटील, राइज अँड शाइनचे श्रावण कांबळे, के. एफ. बायोप्लांट्स किशोर राजहंस, ग्रोअर्स फ्लॉवर कौन्सिल ऑफ इंडिया धनंजय कदम आदी मान्यवर या वेळी उपस्थित होते. या वेळी डॉ. प्रसाद म्हणाले, "नैसर्गिक पाने आणि फुले यांचे मानवी जीवनात अतिशय महत्त्व आहे. मनातील भावना प्रकट करताना कृत्रिम फुले तो भाव पोचवू शकत नाही म्हणूनच लग्न तसेच इतर सण समारंभाला देखील सुंगधी आणि ताज्या फुलांचाच वापर केला जातो. आपल्या संस्कृतीमध्ये देखील देवांना आपण कृत्रिम फुलांचा वापर करत नाही. त्यामुळे नागरिकांनी प्लॅस्टिक फुलांचा वापर टाळावा."

राष्ट्रीय स्वच्छता दिवस तसेच गांधी जयंती निमित्ताने विविध घटकांना फुले आणि शोभिवंत झाडे यांचे वाटप करण्यात आले. तर कृत्रिम फुलांचा वापर टाळण्याची शपथ दिली. तसेच संस्थेतील विद्यार्थ्यांनी सामाजिक स्वच्छतेवर नाटक देखील सादर केले. तसेच या वेळी स्वच्छता कर्मचाऱ्यांचा सन्मान देखील प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच सूत्रसंचालन प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. तारक नाथ सहा यांनी केले. तर कार्यक्रमाचे आयोजन वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. प्रभा के. आणि डॉ. गणेश कदम यांनी केले.



## कष्टकऱ्यांचं कौतुक

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**श्री महालक्ष्मी मंदिर :** महापालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांच्या सन्मानासह त्यांच्या हस्ते देवीची महाआरती करण्यात आली. यावेळी ट्रस्टचे प्रमुख संस्थापक विश्वस्त राजकुमार अग्रवाल, प्रमुख विश्वस्त अमिता अग्रवाल, उपस्थित होते.

### महानगरपालिकेतील

## स्वच्छ फाउंडेशनच्या महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** उच्चभ्रू सोसायटी किंवा कमर्शियल ठिकाणी स्वच्छता करताना कोणी पैसे दिले नाही म्हणून कचरा घ्यायचा नाही असे कर्मचाऱ्यांनी करू नये. त्यांचा कचरा घेतल्यास नंतर त्यांना तुमच्या कष्टाची जाणीव होईल आणि ते पैसे देण्यास सुरवात करतील. शहर स्वच्छ ठेवण्याचे काम कष्टकरी महिला वर्गाकडून करण्यात येते. शहर स्वच्छ व सुंदर राहण्यामध्ये स्वच्छता कर्मचाऱ्यांचे मोठे योगदान आहे, असे मत पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा विभागाचे प्रमुख संदीप कदम यांनी व्यक्त केले.

पुणे शहर स्वच्छ ठेवण्याचे महत्त्वपूर्ण काम कष्टकरी महिला वर्गाकडून करण्यात येते. शहर स्वच्छ व सुंदर राहण्यामध्ये स्वच्छता कर्मचाऱ्यांचे मोठे योगदान असल्याचे प्रतिपादन पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा विभागाचे प्रमुख संदीप कदम यांनी केले. तसेच झोपडपट्टी असो वा उच्चभ्रू सोसायटी कोणी पैसे दिले नाही म्हणून कचरा घ्यायचा नाही, असे कर्मचाऱ्यांनी करू नये. त्यांचा कचरा घेतल्यास नंतर त्यांना तुमच्या कष्टाची जाणीव होईल. व ते पैसे देण्यास सुरूवात करतील. त्यामुळे तुमची सेवा अखंडीत राहील, असेही कदम यांनी स्पष्ट केले.

श्री महालक्ष्मी मंदिर, श्री बन्सीलाल रामनाथ अग्रवाल धार्मिक व सांस्कृतिक ट्रस्टच्या वतीने आयोजित सार्वजनिक नवरात्र उत्सवात पुणे महानगरपालिकेतील स्वच्छ फाउंडेशनच्या ५१ महिला स्वच्छता कर्मचाऱ्यांचा सन्मान सोहळा पार पडला. यावेळी महापालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांच्या सन्मानासह त्यांच्या हस्ते देवीची महाआरती करण्यात आली. यावेळी ट्रस्टचे प्रमुख संस्थापक विश्वस्त राजकुमार अग्रवाल, प्रमुख विश्वस्त अमिता अग्रवाल, उपस्थित होते.

## महापालिका हद्दीलगतच्या गावांमध्ये राबविणार मलनिस्सारण प्रकल्प

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** गावे प्रदुषणमुक्त करण्यासाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) माध्यामातून मलनिस्सारण प्रकल्प राबवण्यात येणार आहे. महापालिका हद्दी लगतच्या २३० गावांसाठी एकूण ११ मलनिस्सारण प्रकल्प राबिवण्यात येणार आहे. हे प्रकल्प राबविण्यासाठी ३०० कोटींचा खर्च अपेक्षित आहे.

पुणे तसेच पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या हद्दीलगतच्या गावांचा मोठा वेगाने विकास झाला आहे. या गावांमध्ये मोठ्या प्रमाणात नागरिकण होत आहे. मोठ - मोठे रहिवासी प्रकल्पही गावांमध्ये उभे राहिले आहेत. मात्र, नियोजनाचा अभाव असल्यामुळे या सांडपाणी व्यवस्था, एसटीपी प्रकल्प यांची या गावांमध्ये उणीव भासते. येथे निर्माण होणारा मैला, सांडपाणी हे थेट नदी, नाल्यांमध्ये सोडले जाते. परिणामी, नदी प्रदुषण होते. महापालिका हद्दीलगतच्या या गावांची संख्या सुमारे २३० एवढी आहे. या गावांची लोकसंख्याही मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे तेथे पायाभूत सुविधा निर्माण करण्याची गरज आहे. त्यासाठी पीएमआरडीने हद्दीलगच्या एकरा गावांमध्ये मलनिस्सारण प्रकल्प राबवण्याचा निर्णय घेतला आहे.

भूगाव, भूकुम, पिरंगूट, लवळे, हिंजवडी, माण, घोटावडे, चाकण-मेदणकरवाडी, शिक्रापूर-सणसवाडी, मारुंजी, केसनंद, चाकण या गावांमध्ये मलनिस्सारण प्रकल्प उभारण्यात येणार आहे. केसनंद व चाकण परिसरातील गावांसाठीही मलनिस्सारण केंद्र उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पांसाठी ३०० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. पीएमआरडीए प्रशसासनाकडून हा प्रकल्प केंद्र शासनाच्या अमृत योजनेअंतर्गत समाविष्ट करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

पुणे आणि पिंपरी-चिंचवडच्या लगतच्या गावांची लोकसंख्या मोठ्या वेगाने वाढली आहे. या गावांचे गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणात शहरीकरण आणि नागरिकरण झाले आहे. कोणतेही नियोजन न करता येथे विकासकामे झाली आहेत. मोठे गृह प्रकल्प, मॉल, व्यावसायिक प्रकल्प येथे उभे राहिले आहेत. छोट्या - मोठ्या कंपन्याही सुरू झाल्या आहेत. त्यामुळे या भागात नागरिकांनी घरे घेतली आहे. या गावांची लोकसंख्या ३० लाखांच्या पुढे गेली असल्याचे बोलले जात आहे. मात्र, एवढ्या मोठ्या लोकसंख्येसाठी आवश्यक असणाऱ्या पायाभूत सुविधा येथे उपलब्ध नाहीत. सर्वात महत्वाचे म्हणजे सांडपाणी व्यवस्थापन आणि मैला निर्मुलनासाठी कोणतीही उपाययोजना नाही. त्यामुळे पीएमआरडीएने या गावांसाठी मलनिस्सारण प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

## तब्बल चार महिना उशिराने फार्मसी प्रवेश प्रक्रिया

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** फॉर्मसी ऑफ कौन्सिलकडून मान्यता न मिळाल्याने ही प्रवेश प्रक्रिया रखडली होती. अखेर तब्बल चार महिना उशिराने फार्मसी प्रवेश प्रक्रिया सुरू होत आहे. मात्र प्रत्यक्षात वर्ग दिवाळीनंतर सुरु होणार असल्याचे स्पष्ट होत आहे. बारावीनंतरच्या डिप्लोमा अर्थात पदविका औषधनिर्माणशास्त्र (डी. फार्म.) म्हणजेच फार्मसी अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया १२ ऑक्टोबरपासून सुरु होत आहे.

करोना प्रादुर्भावानंतर फार्मसी प्रवेशासाठी विद्यार्थ्यांचा कल वाढला आहे. फार्मसीचे प्रवेश गेल्या दोन-तीन वर्षांपासून फुल्ल होत आहे. यंदाच्या वर्षीही फार्मसी प्रवेशाकडे विद्यार्थ्यांचे लक्ष लागले आहे. मात्र जून, जुलै आणि ऑगस्ट, सप्टेंबर महिना उजाडला. तरीही फार्मसीचे प्रवेश सुरू न झाल्याने पालकांसह विद्यार्थी हवालदिल झाले होते. फार्मसीचे प्रवेश लवकरात लवकर सुरू करावी, अशी मागणी होत होती. त्यानंतर तंत्रशिक्षण संचालनालयने सोमवारी डिप्लोमा फार्मसी प्रवेशाचे वेळापत्रक जाहीर केल्याने विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे. प्रवेशासाठी तीन नियमित प्रवेश फेरी होणार आहे.

### तात्पुरत्या जाहिरातींसाठी ३८० जागा निश्चित

## विद्रुपीकरण रोखण्यासाठी पालिका ॲक्शनमध्ये

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहराचे विद्रुपीकरण होत आहे. हे टाळण्यासाठी आता महापालिकेकडून २०२२ मध्ये राज्य शासनाने दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करत शहरात ३८० ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपात जाहिरातींसाठी परवानगी दिली जाणार आहे. राजकीय नेत्यांपासून ते गल्ली-बोळातील कार्यकर्त्यांकडून वाढदिवस, सामाजिक उपक्रम, जाहीर कार्यक्रम, तसेच इतर कारणांसाठी शहरभर जागा मिळेल तिथे महापालिकेची कोणतीही परवानगी न घेता बोर्ड, बॅनर्स, फ्लेक्स, झेंडे लावले जातात. शहराचे जागांची यादी



महापालिका प्रशासनाकडून पालिकेच्या संकेतस्थळावर जाहीर केली आहे. त्यामुळे नागरिकांनी यापुढे क्षेत्रीय कार्यालयांच्या माध्यमातून या जागांसाठी तात्पुरती परवानगी घेऊनच या जाहिराती कराव्यात, असे आवाहन महापालिकेच्या आकाशचिन्ह आणि परवाना विभागाने केले आहे.

या निश्चित केलेल्या जागांव्यतिरिक्त अनधिकृत बोर्ड, बॅनर, फ्लेक्स पोस्टर्स लावणाऱ्यांवर महाराष्ट्र मालमत्ता विद्रुपीकरण कायदा १९९५ अंतर्गत दखलपात्र गुन्हे दाखल करण्यात येणार असून, त्यानुसार कारवाई केली जाणार असल्याचा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

महापालिकेकडून सर्व क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत एकूण ३८० जागा तात्पुरत्या बोर्ड, बॅनर, फ्लेक्स पोस्टर्स लावण्यासाठी निश्चित केल्या आहेत. निश्चित केलेल्या जागांची यादी पुणे महानगरपालिकेच्या (https://www.pmc.gov.in/) या संकेतस्थळावर नागरिकांच्या सोयीसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे.ही माहिती महापालिकेकडूनच माध्यमांना प्रसिद्धीपत्रकाद्वारे देण्यात आली.

# आजी आजोबांनी लुटला गरबा आणि दांडिया खेळण्याचा आनंद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आयुष्यभर मुलांसाठी जगताना ते स्वत: मात्र जगणे विसरुन जातात. आयुष्याच्या उत्तरार्धात येता येता स्वत:साठी जगायला वेळ तर मिळतो, परंतु शारीरीक मर्यादा ही येतात. अशा वेळी विविध व्याधींमुळे सगळ्यांसोबत बाहेर गर्दीमध्ये जाऊन उत्सवाचा आनंद घेता येत नाही.



अशा समवयस्क ज्येष्ठ नागरीकांसाठी नवरात्रीनिमित्त विशेष गरबा आणि दांडियाचे आयोजन करण्यात आले होते. आयुष्याची सायंकाळ आनंदाने जगू पाहणाऱ्या ज्येष्ठांनी कार्यक्रमात दांडिया मनमुराद आनंद लुटला. निसर्ग छाया संस्थेच्या वतीने भूगाव येथे ज्येष्ठ नागरिकांसाठी भव्य गरबा आणि दांडियाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, संस्थेच्या संचालिका अमृता देवगावकर, मंदार देवगावकर, जयंत दशपुत्रे, मकरंद टिल्लू आदी उपस्थित होते. होते. त्यामुळे आयुष्याच्या उत्तरार्धात ज्येष्ठ नागरिकांनी हताश होऊन न बसता, बाहेर पडून आयुष्याचा मनसोक्त आनंद घ्यायला हवा.

# आरटीईची एक विशेष फेरी राबविण्याची मागणी




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत पुणे जिल्ह्यात दरवर्षी आरटीईचे सर्वाधिक प्रवेश होतात. यंदा ९७० शाळांमध्ये आरटीईच्या १७,५८८ जागा उपलब्ध होत्या. त्यासाठी ४८,१५५ अर्ज आले. त्यामुळे पहिली यादी आणि तीन प्रतीक्षा यादी मिळून पुणे जिल्ह्यात तब्बल १३,६६७ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत. परंतु आणखी एक विशेष फेरी राबविण्याची मागणी पालक संघटनांनी केली आहे. 'आरटीई'अंतर्गत २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रियेत यंदा राज्यात ७८ हजार ३९८ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाल्याचे स्पष्ट झाले आहे. प्रवेशासाठी यंदा प्राथमिक शिक्षण संचालनालयाद्वारे एक नियमित फेरी आणि तीन फेऱ्या प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात आल्या. तरी २६,८४० जागा रिक्त आहे.

> यंदा राज्यातील ९,२१७ शाळांमध्ये १ लाख ५ हजार २३८ जागा प्रवेशासाठी उपलब्ध झाल्या होत्या. त्यासाठी २ लाख ४२ हजार ५१६ पालकांनी आपल्या मुलांचे अर्ज भरले होते. या अर्जांतून पहिल्या नियमित यादीमध्ये ९३,००९ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला. त्यातील ६०,९८९ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले. या वर्षीची आरटीई प्रवेश प्रक्रिया अखेर संपली असल्याचे जाहीर केले आहे."
> — **शरद गोसावी** प्राथमिक शिक्षण संचालनालयाचे संचालक

"आरटीई प्रवेश मुळात तीन महिने उशिरा सुरू झाली होती. तसेच न्यायालयातील अनेक याचिका, खासगी शाळांचा नकार आणि कागदपत्रांसाठी पालकांची धावपळ अशी भीषण अवस्था होती. त्यामुळे आरटीई अंतर्गत प्रवेशापासून हजारो मुले-मुली वंचित आहेत.

# अष्टपैलू विद्यार्थी तयार करण्याचे वेलिंग्टन कॉलेज इंटरनॅशनलचे ध्येय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** वेलिंग्टन कॉलेज इंटरनॅशनल पुणे ही केवळ शिक्षण संस्था नाही तर जगभरातील शैक्षणिक संस्थेचा ब्रँड आहे. विद्यार्थ्यांना नवी आणि निखळ जीवनदृष्टी देण्याबरोबरच त्यांची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी जीवनातील नवी प्रयोगशीलता आणि सृजनशीलता, आदर्श आचार आणि विचारांचा परिचय देणारी ही संस्था आहे, असे वेलिंग्टन कॉलेज इंटरनॅशनल पुणेचे सह-संस्थापक अनुज अग्रवाल यांनी सांगितले. पुण्यातील अग्रगण्य शैक्षणिक संस्थांपैकी एक वेलिंग्टन कॉलेज इंटरनॅशनल कॅम्पसमध्ये आपला पहिला स्थापना दिवस साजरा केला.



या समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून वेलिंग्टन कॉलेज यूकेचे संस्थापक संचालक सर अँथनी शेल्डन, पंचशील रिॲलिटीचे संचालक रेशम चोरडिया, डॉ. मर्रे टॉड संस्थापक मास्टर, फ्रेंड्स ऑफ वेलिंग्टन ग्रुपचे सदस्य रॉबिन शहा, विद्यार्थी प्रतिनिधी मायला हेकाला उपस्थित होते.

## अवतीभवती
CITY UPDATE

### नाट्याविष्कारातून रसिकांनी अनुभवली सावरकरांची 'माझी जन्म ठेप'

**पुणे :** ५० वर्षांची काळ्या पाण्याची शिक्षा .., मनात देशभक्तीचे वारे .., मार्सेलिस बंदरामध्ये मारलेली उडी .., सावरकरांचा माफीनामा .. अन् 'ने मजसी ने परत मातृभूमीला । सागरा, प्राण तळमळला ..' या गीतातील आर्तता आज अभिवाचनाच्या रंगमंचीय नाट्याविष्कारातून रसिकांनी अनुभवली. निमित्त होते, स्वातंत्र्य वीर सावरकर फाउंडेशन, पुणे यांच्या वतीने आयोजित 'पहिल्या हिंदुहृदयसंम्राटाची झुंजार कहाणी....! माझी जन्मठेप' या आगळ्या वेगळ्या नाटकाचे. यावेळी भारतीय जनता पार्टीच्या महाराष्ट्र प्रदेश सचिव वर्षाताई डहाळे, ग्राहकपेठचे अध्यक्ष सूर्यकांत पाठक, भाजप पुणे शहर युवा मोर्चाचे सरचिटणीस दुष्यंत मोहोळ, स्वातंत्र्य वीर सावरकर फाउंडेशनचे अध्यक्ष प्रीतम थोरवे, चिंचवडचे अध्यक्ष डॉ. अविनाश वैद्य, आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

## RS NEWS DIGEST

**अत्याधुनिक सेवा**

### पुणे मनपाचे कै. सुभद्रा बराटे मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे उद्घाटन

**पुणे :** अत्याधुनिक वैद्यकीय सेवा, सुविधांनी अशा टेसला डायग्नोस्टिक सेंटर, प्लॅटिनम मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटल आणि पुणे मनपाचे कै. सुभद्रा बराटे मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटलचे उद्घाटन केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपालीताई चाकणकर, खासदार, राज्यसभा मेधा कुलकर्णी, आ. भीमराव तापकीर, मा. विरोधी पक्ष नेते दिलीप बराटे, भूषण कर्णावट, डॉ. अभिजीत सावळकर, डॉ. सुशांत हांडे, विनायक पुरभ आदी मान्यवर उपस्थित होतै.वारजे, कर्वेनगर आणि हवेली भागातील जास्तीत जास्त नागरिकांना याचा फायदा होईल. तसेच शासनाच्या सर्व योजनांचा लाभ देखील मिळणार आहे.





**नियुक्ती**

### राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्ष पुणे शहर उपाध्यक्षपदी खंडाळे

**पुणे :** पुणे शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने पुणे शहर उपाध्यक्षपदी निलेश खंडाळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खा. शरदचंद्र पवार यांच्या नेतृत्वाखाली, खा. सुप्रिया सुळे (राष्ट्रीय कार्याध्यक्ष) यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आ. जयंत पाटील (अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार) यांच्या आदेशानुसार ही निवड झाली आहे. आपल्या पक्षाची विचारधारा व तत्वांना केंद्रस्थानी ठेवून पक्षाच्या विस्तारार्थ आणि संघटन वाढवण्यासाठी आपण यशस्वी वाटचाल कराल व आपल्या सक्षम कृतीतून जनसामान्यांच्या मनात आपल्या पक्षाची प्रतिमा उत्तरोत्तर अधिक उज्ज्वल कराल, असा विश्वास आहे, असे निवड पत्रात नमुद केले आहे. त्यानुसार कार्यरत राहीन असा विश्वास निलेश खंडाळे यांनी पुणे शहर अध्यक्ष प्रशांत जगताप यांना दिला.

**प्रदर्शन**

### सिल्व्हरक्रेस्ट सोसायटीत विविध कलाकृतींचे प्रदर्शन

**पुणे :** सिल्व्हरक्रेस्ट सोसायटीमधील रहिवाशांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी नवरात्रोत्सवानिमित्त विविध कलाकृतींचे प्रदर्शन सभागृहात भरवण्यात आले आहे. कोथरूड परिसरातील नागरिकांनी या प्रदर्शनाला भेट दिली.

प्रदर्शनात प्रत्यक्षाहून प्रतिमा उत्कट वाटाव्यात अशा काही कलाकृतींचे फोटो, पेन्टिंग्ज, स्केचेस मांडण्यात आले. ४२ ते ८४ वयोगटातील बारा कलाकार यात समाविष्ट होते. डॉक्टर, आर्किटेक्ट, इंजिनिअर, बँकर, गृहिणी यांनी सादर केलेली उत्तम दर्जाची कलाकृती पाहण्यासाठी रसिकांनी गर्दी केली होती. प्रदर्शनात टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ, मधुबनी, निसर्गचित्रे, जिवंत भासावी अशी पोर्ट्रेट्स यांचा समावेश होता. होती. रघुनाथ लातूरकर, सुनील दामले आणि समीर जोशी यांनी संयोजन केले.





**इशारा**

### कॅब दरवाढीसाठी ठिय्या आंदोलन

**पुणे :** कॅब दरवाढीसाठी मागील एका वर्षापासून दिनांक ९ सप्टेंबर २०२३ पासून सातत्याने पाठपुरावा करुनही कोणतीही कार्यवाही झाली नसून आरटीए, पुणे यांनी निश्चित केलेले टॅक्सीचे दर पत्रक आजपर्यंत अंमलात आणलेले नाही. ते त्वरीत अंमलात आणावे, या मागणीसह अन्य मागण्यांसाठी मॉ साहेब कॅब संस्था महाराष्ट्र राज्य तर्फे प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) पुणे समोर ठिय्या आंदोलन करण्यात आले. यावेळी मॉंसाहेब कॅब संस्था महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष वर्षा शिंदे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मोठया संख्येने कॅब चालक उपस्थित होते. वर्षा शिंदे पाटील म्हणाल्या, पुणे आरटीए ने निश्चित केलेले दर पत्रक सर्व कंपन्यांना लागू करावे, ज्या मुजोर कंपन्या आरटीए प्रमाणे दर लागू करणार नाहीत, त्या कंपन्यांचे ॲप मोबाईल प्ले स्टोअर वरुन काढून टाकावे, गोवा राज्यासारखे पुण्यात देखील टॅक्सी मीटर द्यावे, एव्हरेस्ट प्लीट ई-कॅब बंद कराव्या आणि बेकायदेशीर प्रवासी वाहतूक करणा-या पांढ-या प्लेट च्या गाडया बंद कराव्या, अशा मागण्या आम्ही आरटीओ यांच्याकडे करीत आहोत. प्रशासनाने याकडे गांभिर्याने लक्ष न दिल्यास संघटनेचे ५ हजार सभासद रस्त्यावर उतरुन आंदोलन करतील.

**पुरस्कार**

### ज्येष्ठ हास्यचित्रकार शि. द. फडणीस यांना 'चतुरंग प्रतिष्ठान'चा जीवनगौरव



**पुणे :** 'चतुरंग प्रतिष्ठान' तर्फे प्रतिवर्षी सांस्कृतिक- सामाजिक- शैक्षणिक यापैकी स्वीकृत क्षेत्रात, जीवनभराच्या सृजनशील आणि मौलिक कार्याने लक्षणीय भर घालून, महाराष्ट्राचेच नव्हे तर देशाचेही सांस्कृतिक जीवन समृद्ध करणाऱ्या व्यक्तीस, समाजाच्या मनातील कृतज्ञतेची खूण म्हणून दिला जाणारा 'चतुरंग प्रतिष्ठान'चा जीवनगौरव पुरस्कार यंदा ज्येष्ठ हास्यचित्रकार शि. द. फडणीस यांना देण्यात येणार आहे, अशी माहिती 'चतुरंग प्रतिष्ठान' तर्फे प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविण्यात आली आहे. प्रदान सोहळा दि. ८ डिसेंबर रोजी बालगंधर्व रंगमंदिर येथे करण्यात येणार आहे. मानपत्र, सन्मानचिन्ह आणि तीन लाख रुपयांचा धनादेश असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. याआधी चतुरंगचा हा सांस्कृतिक क्षेत्रातील पुरस्कार भालजी पेंढारकर, पु. ल. देशपांडे, सुधीर फडके, बाबासाहेब पुरंदरे, श्री. पु. भागवत, नृत्यगुरू पार्वतीकुमार, नटवर्य भालचंद्र पेंढारकर, पं. सत्यदेव दुबे, डॉ. अशोक रानडे, रत्नाकर मतकरी, सदाशिवराव गोरक्षकर, विजया मेहता, सुहास बहुळकर, राजदत्त आणि लता मंगेशकर या मान्यवर बुजुर्गांना देण्यात आला आहे.



# कठोर प्रहार

सर्वोच्च न्यायालयाच्या ताज्या निर्णयाने देशातील तुरुंगात आजही जो अत्यंत हीन पातळीवरचा जातिभेद सुरू होता त्यावर अत्यंत कठोर प्रहार केला आहे. समाजात सुधारणा घडविण्यासाठी कायदेमंडळाऐवजी न्यायव्यवस्थेला पुढाकार घ्यावा लागतो हे दुर्दैवच! मात्र, न्यायव्यवस्थेने तशी सबब पुढे न करता हा ऐतिहासिक व सुधारणावादी निर्णय दिला त्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्या. मनोज मिश्रा आणि न्या. जे. बी. पारडीवाला यांच्या पीठाचे करावे तेवढे अभिनंदन कमीच आहे! सर्वोच्च न्यायालयाच्या या पीठाने मागच्या गुरुवारी देशातील बहुतेक राज्यांच्या तुरुंग नियमावल्या बरखास्त केल्या आणि कैद्यांना तुरुंगात दाखल करून घेताना त्यांच्या जातीची नोंद केली जाऊ नये, असा अत्यंत महत्त्वपूर्ण आदेश दिला. सर्वोच्च न्यायालयास हा आदेश द्यावा लागला कारण केंद्र सरकारने २०२२ मध्ये तुरुंग प्रशासनाची आदर्श नियमावली जारी केली असली तरी त्याची बहुतांश राज्यांनी अद्याप अंमलबजावणी करणे तर सोडाच पण या नियमावलीकडे ढुंकून पाहण्याचे कष्टही घेतलेले नाहीत. यामुळे तुरुंगात कैद्यांना त्यांच्या कर्मानुसार नव्हे तर जातीनुसार कामांची विभागणी करण्याची पद्धत आजही कायमच होती. २०१६ पासून देशभरातील तुरुंग आणि राज्यांच्या त्याबाबत असलेल्या नियमावल्या यांचा अभ्यास करणा-या पत्रकार, समाज अभ्यासक, लेखिका सुकन्या शांता यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केल्याने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानंतरही देशातील बहुतांश राज्यांतील तुरुंगात सुरू असलेल्या जातिभेदाचा भांडाफोड झाला. बहुतांश राज्यांच्या तुरुंगात कैद्यांना समान वागणूक देण्याच्या आदर्श नियमावलीस अडगळीत टाकून कैद्यांना त्यांच्या जातीप्रमाणे कामाचे वाटप करण्याचीच प्रथा सर्रास पाळली जात असल्याचे स्पष्ट झाले. म्हणजे एखादा कैदी कितीही गंभीर गुन्ह्यासाठी शिक्षा भोगत असला तरी तो उच्चवर्णीय असेल तर त्याला स्वच्छतागृह साफ करण्याची कामे दिली जात नाहीत आणि कितीही किरकोळ गुन्ह्यासाठी शिक्षा भोगणा-या कनिष्ठ वर्णीय कैद्यास स्वयंपाकाचे काम दिले जात नाही, त्याला स्वच्छतेचीच कामे करावी लागतात. २०२२ मध्ये केंद्राने तुरुंग प्रशासनासाठी संपूर्ण देशासाठीची आदर्श नियमावली तयार करताना तुरुंगातील हा जातिभेद मिटवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. या आदर्श नियमातील कैद्याची जात पाहून त्याला कामे दिली जाऊ नयेत वा त्यांच्या जातीनुसार तुरुंगात त्यांचे वर्गीकरण केले जाऊ नये यासाठीच्या अनेक तरतुदी करण्यात आल्या आहेत. कैद्यांचे वर्गीकरण कच्चे कैदी, नैमित्तिक कैदी, राजबंदी वा दिवाणी कैदी आणि सराईत गुन्हेगार असेच केले जावे, असे या नियमावलीत स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. मात्र, तुरुंग प्रशासन हा राज्यांच्या अखत्यारीतला विषय असल्याने राज्यांनी केंद्राच्या या आदर्श नियमावलीनुसार राज्याच्या नियमांमध्ये बदल वा सुधारणा करायला हव्यात. मात्र, बहुतांश राज्यांनी केंद्राच्या या आदर्श नियमावलीस एक तर केराची टोपली दाखविली किंवा या आदर्श नियमावलीच्या नियमांना बगल देणा-या तरतुदी तुरुंग प्रशासन नियमावलीत घुसडल्या! या पार्श्वभूमीवर जातिभेद मिटवण्याच्या सुधारणेसाठी सर्वोच्च न्यायालयानेच पुढाकार घेऊन ऐतिहासिक निकाल दिला त्याचे स्वागतच! या निर्णयामुळे यापुढे तुरुंगात जातीवरून भेदाभेदाची पद्धत संपुष्टात येईल. मात्र, हा सुधारणेचा एकच टप्पा झाला. तुरुंगाच्या बाहेर समाजात जो जातिभेद घट्ट रुतून बसला आहे व हल्ली तर तो आणखी अणकुचीदार बनतो आहे तो कसा दूर होणार? त्यासाठी कोण पुढाकार घेणार हा खरा प्रश्न! अशा सुधारणांसाठी ज्यांनी पुढाकार घ्यावा असे अपेक्षित आहे ते जनतेचे लोकप्रतिनिधीच आज आपली जात व या जातीची व्होट बँक अत्यंत उजळ माथ्याने मिरवित असतात. त्यात ना त्यांना काही गैर वाटते ना त्यांच्या समर्थकांना! याच लोकप्रतिनिधींनी समाजात न्याय व समता आणण्याच्या, पुरोगामीत्वाच्या लंब्याचौड्या गप्पा मागची कित्येत वर्षे झोडल्या पण प्रत्यक्षात मतपेटीच्या राजकारणासाठी जातीच्या जाणीवा जास्त टोकदार करण्यालाच प्रोत्साहन दिले. त्याचा परिणाम आज समाजाची वीण उसवत असताना दिसतो आहेच. घटनाकार बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनासभेत केलेल्या भाषणात ज्या चिंता व्यक्त केल्या होत्या त्या आजही तंतोतंत ख-या ठरताना पहायला मिळते आहे. हा एकप्रकारे आपण स्वीकारलेल्या लोकशाही व्यवस्थेचा व विज्ञानवादी दृष्टिकोनाचा पराभवच मानायला हवा. दलित नवरदेव घोड्यावर बसला म्हणून हत्या, सवर्णाच्या माठातील पाणी पिले म्हणून मारहाण, परजातीत लग्न केले म्हणून ऑनर किलिंग, नग्न करून धिंड काढण्याचे प्रकार अशा एक ना कित्येक घटना समाजात दिवसेंदिवस घडतात. आता तर बलात्काराच्या प्रकरणातही अत्याचार झालेल्या मुलीची व तिच्यावर अत्याचार करणा-या नराधमाचीही जात शोधण्याचे प्रकार पहायला मिळत आहेत. विशेष म्हणजे रोज अशा घटना घडत असताना व त्या वाचत-ऐकत असताना समाजमनाला कुठल्याही प्रकाराची खंत वा खेद वाटत नाही, हे पाहता जात आपल्या मनात, विचारात, जीवनात व आचरणात कशी घट्ट रुतून बसली आहे याचा प्रत्यक्ष प्रत्ययच येतो. त्यातून आपल्या समाजमनातून 'जाता जाईना जात' असेच चित्र पदोपदी पहायला मिळते. विशेष म्हणजे हे चित्र बदलण्यासाठी सध्या कुठल्याच पातळीवरून अल्पसेही प्रयत्न होताना दिसत नाहीत, हे समाज म्हणून आपले दुर्दैवच! अशा स्थितीत न्यायालयाने पुढाकार घेऊन सुधारणावादी निर्णय दिला, हा दिलासाच! किमान यामुळे जातिभेद कायद्यान्वये नाकारले जाण्याचे पहिले पाऊल पडले आहे, हे ही नसे थोडके!

# केसनंद गावाला आदर्श नंदनवन बनविणारे;जनसामान्यांचे युवा नेतृत्व"

## 'आदर्श सरपंच प्रमोद चंद्रकांत हरगुडे'



**केसनंद** (ता.हवेली) येथे एका सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात वडील चंद्रकांत दत्तात्रय हरगुडे, आई मंदाकिनी चंद्रकांत हरगुडे यांच्या पोटी ९ ऑक्टोबर १९८० रोजी प्रमोद (भाऊ) हरगुडे यांचा जन्म झाला. भाऊंचे शिक्षण कला शाखेत पदवीधर पर्यंत झाल्यानंतर त्यांना पुढे व्यवसाय करण्याची आवड निर्माण झाल्यानंतर त्यांनी व्यवसाय करीत औद्योगिकरण क्षेत्रात पदार्पण केले. हे करीत असताना प्रमोदभाऊंनी आपण समाजाचे काही तरी देणे लागतो हा उद्देश समोर ठेऊन समाजसेवेचे काम सुरू करीत केसनंद व वाघोली गावातील अनेकांचे विविध प्रश्न, समस्या सोडवित परिसरातील अनेक तरुणांना रोजगार मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. पुढे प्रमोद हरगुडे केसनंद गावच्या राजकारणात, समाजकारणात, विविध संस्था, मंडळ, आदी क्षेत्रात सहभाग नोंदवित सक्रिय काम करू लागले ते त्यानंतर केसनंद ग्रामपंचायतीचे सदस्य पदी विराजमान होत उत्तम कार्याच्या जोरावर आज प्रमोदभाऊ केसनंद ग्रामपंचायतीचे आदर्श सरपंच म्हणून कार्यरत आहेत. पुणे महानगरपालिका हद्दीलगत असणाऱ्या गावांमध्ये दिवसेंदिवस लोकसंख्या वाढत असून वाढत्या लोकसंख्येचा विचार करून केसनंद गावच्या समस्यादेखील मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. या वाढत्या समस्या दूर करण्यासाठी समाजासाठी आदर्श असे नेतृत्व म्हणून उदयास आलेले केसनंद गावच्या विकासात दिलेल्या योगदानामुळे सरपंच प्रमोद चंद्रकांत हरगुडे यांनी विकासाचे शिल्पकार तसेच "केसनंद गावाला आदर्श नंदनवन बनविणारे; जनसामान्यांचे युवा नेतृत्व" म्हणून सर्वसामान्यांमध्ये "केसनंद गावचे आदर्श सरपंच" म्हणून आपली वेगळी ओळख प्रमोदभाऊंनी निर्माण केली आहे.



### क्रीडा क्षेत्रातील योगदान :

● सरपंच प्रमोद हरगुडे यांनी केसनंद गावातील शालेय विद्यार्थ्यांना विविध क्रीडाप्रकारांचे धडे देत विविध क्रीडाप्रकारात व्यासपीठ उभे करून दिले आहे. क्रीडा क्षेत्रातील नामवंतांना केरानंदमध्ये गौरवण्यात देखील आले आहे.कबड्डी,कुस्ती या दोन्ही क्रिडा प्रकारांमध्ये जिल्हास्तरावरील स्पर्धाचे आयोजन करण्यात हरगुडे यांनी मोलाची कामगिरी केली आहे. याकामी अनेक गावांतील जुन्या जाणत्या क्रीडा शौकिनांचा पाठिंबा प्रमोद हरगुडे यांना लाभत आहे. नुकत्याच झालेल्या गावच्या यात्रेमध्ये अद्ययावत असा कुस्तीचा आखाडा तसेच इतर स्पर्धा यांमधून आधुनिकतेची जोड केसनंदकरांनी अनुभवली आहे




### आध्यात्मिक-सामाजिक बांधिलकीचा वसा :

● प्रमोद हरगुडे मित्र परिवाराच्या मदतीने आध्यात्मिक संस्काराची शिदोरी म्हणून वेगवेगळ्या धार्मिक सणांच्या निमिताने कीर्तन महोत्सव आयोजित करून आध्यामिक वसा जोपासला आहे, तर विद्यार्थ्यांना मोफत साहित्य वाटप, गुणवंतांचा गौरव, परीक्षा कालावधीत घरी ये-जा करण्यात अडचणी दूर करण्यासाठी मोफत रिक्षा उपलब्ध करून देण्याचा उपक्रम राबवला आहे.



### महिला सबलीकरण व सार्वजनिक स्वच्छतेचा मूलमंत्र :

● गावातील महिलांसाठी विविध कलागुणांना बळ देण्यासाठी व्यासपीठ महिला बचत गटांची स्थापना करून महिला आत्मनिर्भर करण्यासाठी मार्गदर्शन व पाठबळ सरपंच प्रमोद हरगुडे यांनी दिले आहे.तसेच शालेय विद्यार्थी, सामाजिक संस्था, सोसायटीमधील नागरिक,ग्रामस्थ, महिला नागरिकांमध्ये स्वच्छतेची आवड निर्माण होऊन आपला परिसर स्वच्छतेने नटलेला असावा,यासाठी सार्वजनिक स्वच्छता सप्ताह राबवून सार्वजनिक आरोग्य वृद्धिंगतसाठी प्रयत्न सरपंच प्रमोद हरगुडे यांनी करून एक आदर्श उभा केला आहे.



### कोट्यवधी रुपयांची अनेक विकासकामे मार्गी :

● वाढत्या लोकसंख्येचा विचार करून सर्व ग्रामपंचायत सदस्यांच्या साथीने व ग्रामस्थांच्या मार्गदर्शनाने सरपंच प्रमोदभाऊ हरगुडे यांनी अंतर्गत रस्ते, सांडपाणी व्यवस्थापन,कचरा व्यवस्थापन यासाठी कचरा संकलन करणाऱ्या गाड्यांची उपलब्धता करून नागरिकांना स्वच्छतेचा संदेश दिला आहे.ओला, सुका कचरा वर्गीकरणाची पद्धत राबवण्यात त्यांची टीम यशस्वी झाली आहे. वाढत्या लोकसंख्येचा विचार करून केसनंद मधील जलजीवन मिशन अंतर्गत नवीन पिण्याच्या पाण्याची योजनादेखील लवकरच कार्यान्वित होणार असल्याची माहिती सरपंच प्रमोद हरगुडे यांनी दिली आहे.केसनंद ग्रामपंचायतीमध्ये वेगवेगळ्या शासकीय निधीतून होत असलेली अनेक विकासकामे ही कोट्यवधी रुपयांच्या पुढे असून हीच बाब केसनंद ग्रामस्थांसाठी लक्षवेधी ठरत आहे. अनेक वर्षापासूनचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी राज्यातील मंत्रिमंडळातील अनेक नामवंत मंत्र्यांना निवेदन देऊन ग्रामपंचायतीच्या विविध प्रश्नांची सोडवणूक करण्यात सरपंच प्रमोद हरगुडे यांचा पाठपुरावा लक्षवेधी ठरू लागला आहे.

### पाणी पुरवठ्यासाठी स्वतःची दोन गुंठे जागा गावाला बक्षीसपत्र :

● सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून केसनंद गावाला गायरान क्षेत्र नसल्यामुळे वनविभागाध्ये अतिरिक्त येणाच्या जागा विकसित करून गावाला नंदनवन बनवण्यासाठी सरपंच हरगुडे प्रयत्न करीत आहेत. स्वतःच्या मालकीची दोन गुंठे जागा गावच्या पाणीपुरवठा योजनेसाठी बक्षिसपत्राने देऊन सामाजिक बांधिलकी जोपासली आहे. केसनंदची महसूलची कामे मार्गी लावण्यासाठी केसनंदसाठी स्वतंत्र तलाठी कार्यालय क गाव कामगार तलाठ्याची नेमणूक करण्यासाठी पाठपुरावा करून यश सरपंच प्रमोदभाऊ यांनी मिळवले आहे.

### वाहतूक कोंडी,तरुणांना रोजगार, विद्यार्थ्यांचे प्रश्न यासाठी पाठपुरावा:

● केसनंद येथे होणारी वाहतूककोंडी दूर करण्यासाठी केसनंद चौकात उड्डाणपूल व्हावा, यासाठी केंद्रीय वाहतूकमंत्री नितीन गडकरी, सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांना निवेदन दिलेले आहे. बेरोजगार तरुणांना गावातील कंपन्यांमध्ये काम मिळवून देण्यासाठी, तसेच शालेय विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी देखील नामांकित शाळांमध्ये प्रमोद हरगुडे यांचा पाठपुरावा सातत्याने चालू आहे. प्रमोद हरगुडे यांच्या माध्यमातून सुरू असलेले कार्य ग्रामविकासाचे एक उत्तम उदाहरण म्हणून पुढे येवू लागले आहे.



**अशा या कार्यकुशल, कर्तृत्ववान आदर्श सरपंच प्रमोद चंद्रकांत हरगुडे यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देत आहोत.**

**संकलन: पत्रकार विजयराव लोखंडे**

# गुड मॉर्निंग

दिवसाची अर्थपूर्ण सुरुवात

## पंचांग

**बुधवार, दिनांक ९ ऑक्टोबर २०२४**
अश्विन शु.६, मूळ, सरस्वती आवाहन, गुरू वक्री **नक्षत्र** : मूळ, योग :सौभाग्यशोभन, करण : गरज, श्री शके १९४६, विक्रम शोभन २०७९, क्रोधीनाम संवत्सर, दक्षिणायन, वर्षा ऋतू जागतिक टपाल दिन, रांजणगावदेवी यात्रा, नेवासा, जि. नगर, गोविंदराव टेंबे पुण्यदिन, वीर जीवा महाला जयंती, आयंबिल ओळी प्रा. (जैन)
**सूर्योदय :** स.०६.०९ **सूर्यास्त :** सायं.०६.५२ वा.
**राहू काळ : दुपारी :** १२:०० ते १:३०

## दिनविशेष

▶१८७६: बौद्ध धर्माचे जगद्विख्यात अभ्यास धर्मानंद कोसंबी यांचा जन्म. ▶१८९२: लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांचा स्मृतिदिन. ▶१९१४: मराठीतील 'बालबोध' या पहिल्या मराठी बालनियतकालिकाचे संपादक आणि मराठीत बाल वाङ्‌मयाचा पाया घालणारे बालकथा लेखक विनायक कोंडदेव ओक यांचे निधन. ▶१९४०: जॉन लेनन या बीटल् या संगीतकाराचा जन्म. ▶१९६७: युगांडा देश स्वतंत्र झाला. ▶१९७०: भाभा अणुसंशोधन केंद्राने युरेनियम २३३ ची निर्मिती करण्यास सुरुवात केली. ▶१९८२: जेष्ठ संसदपटू ह.वि. कामत यांचे निधन. ▶१९८२: पोलंडमध्ये सॉलिडॅरेटी संघटना विसर्जित. ▶१९८७: जनरल अरुणकुमार वैद्य यांची हत्या. ▶१९८९: कथा व नाटककार विद्याधर पुंडलिक यांचे निधन. ▶१९९२: नोबेल शांतता पुरस्कार विजेते विली ब्रँड यांचे निधन.

## राशीभविष्य

▲ **मेष** : कलागुणांना चांगला वाव मिळेल. ▲ **वृषभ** : प्रकृती सांभाळा. ▲ **मिथुन** : प्रवास घडतील. ▲ **कर्क** : करमणुकीसाठी वेळ द्याल. ▲ **सिंह** : अध्ययनासाठी चांगला दिवस. ▲ **कन्या** : कौटुंबिक गोष्टींकडे अधिक लक्ष द्या. ▲ **तुळ** : आप्तेष्टांच्या गाठीभेटी होतील. ▲ **वृश्चिक** : अनपेक्षित गोष्टी घडतील. ▲ **धनु** : कामात यश येईल. ▲ **मकर** : आरोग्य सांभाळा. ▲ **कुंभ** : व्यवहार सावधपणे करा. ▲ **मीन** : नोकरीत प्रगती कराल.

## आरोग्य

तज्ञ डॉक्टरांचे म्हणणे असे आहे की, आपल्याला जास्तीत जास्त एक ग्रॅम मीठाची आवश्यकता असते. पण ८-१० ग्रॅम मीठ आपण खात असतो. या जास्त खाल्लेल्या मीठामुळे आपल्याला किडनीचे विकार होतात. उच्च रक्तदाबही निर्माण होऊ शकतो. म्हातारपणी नव्हे तारुण्यातही! उगीच जास्त मीठ खाऊन रोगाला स्वच्छेने निमंत्रण कशाला द्यायचे? त्यापेक्षा कमी (आवश्यक तेवढेच) मीठ खाणे योग्य नाही का?

## व्यक्तीविशेष

### गोपाळ हरी देशमुख

लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांचा जन्म १८ फेब्रुवारी इ.स. १८२३ रोजी झाला. ते महाराष्ट्रातील अगदी पहिल्या पिढीतील समाजसुधारक. गोपाळरावांनी धार्मिक समजुती आणि चालीरिती यांच्या वर्चस्वाविरुद्ध लढा दिला. त्यांच्या पुढाकाराने 'ज्ञानप्रकाश', 'इंदुप्रकाश' आणि 'लोकहितवादी' ही नियतकालिके चालू झाली. इ.स. १८७७ साली ब्रिटिश शासनाने रावबहाद्दूर ही पदवी देऊन त्यांना सन्मानित केले होते. १९४८ पासून त्यांनी लोकहितवादी या नावाने प्रभाकर या साप्ताहिकात लेखन सुरू केले. बालविवाहामुळे काय अडचणी निर्माण होतात, हे त्यांनी 'प्रभाकर'मध्ये पत्र लिहून लोकांच्या नजरेस आणले. समाजातील बालविवाह, हुंडा, बहुपत्नीकत्व यासारख्या अनिष्ट प्रथांवर त्यांनी लेख लिहून हल्ला चढविला. इ.स. १८४८ ते इ.स. १८५० या काळात प्रभाकर या साप्ताहिकातून त्यांनी १०८ समाजसुधारणाविषयक निबंध लिहिले. हेच निबंध शतपत्रे नावाने प्रसिद्ध आहेत. अशा या लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांचे १८९२ मध्ये निधन झाले.

## बोधकथा

### पक्षांचीही भाषा एकच

हळूहळू अंड्यातून छोटी छोटी पिल्ले बाहेर आली. त्यांच्या लहान चोची फार सुरेख दिसायच्या. एकदा त्या पिल्लांचे आईबाबा दाणे शोधायला बाहेर गेले होते. त्यावेळी एक पिल्लू उडण्याचा प्रयत्न करताना खाली पडले आणि त्याचा पाय दुमडला. ते पिल्लू क्षीण आवाजात ओरडू लागले. त्याला घरट्यापर्यंत जाता येत नव्हेते. आदित्य सर्व बघत होता. त्याने लगेचच आईला सांगितले. आईच्या मदतीने त्याने त्या पिल्लाचा पाय सरळ केला. तिथे मलम पट्टी केली आणि अलगत उचलून त्याला पुन्हा घरट्यामध्ये ठेवले. थोड्या वेळाने पक्षाचे आईबाबा आले. त्यानंतर घरट्यातून बराच चिवचिवाट ऐकायला येत होता. बहुधा घडलेली घटना ती पिल्ले आईला सांगत असावीत. काही दिसवांनी पिल्लं मोठी झाली, स्वतंत्रपणे उडू लागली पण त्यांनी आदित्यचे घर विसरले नाही. रोज दुपारी या सगळ्या चिमण्या नियमितपणे आदित्यच्या घराच्या खिडकीतून आत येतात, घरभर फिरतात. कधी आदित्यच्या खांद्यावर बसतात आणि नंतर पुन्हा उडून जातात. जणू आदित्यने आणि त्याच्या आईने केलेल्या मदतीचा कृतज्ञभाव व्यक्त करण्यासाठीच त्या घरात येत असाव्यात. पक्षी बोलू शकत नसले तरीही भावना मात्र आपल्या कृतीतून नक्की व्यक्त करु शकतात. प्रेमाची भाषा सगळीकडे ऐकच असते याचा उलगडा आदित्यला झाला. आई ने जे सांगितलं होतं त्याप्रमाणेच सर्व घडत होतं. (उत्तरार्ध)

## जिज्ञासा

### इलेक्ट्रॉनिक चष्म्याचा शोध

अलिकडे मल्टीफोकल चष्म्यांमुळे ही समस्या काही प्रमाणात दिसू लागली आहे; मात्र मल्टीफोकल चष्म्यांमुळे बऱ्याच लोकांना फायद्यापेक्षा डोकेदुखी, चक्कर येणे यांसारखे त्रासही होतात मात्र अलीकडेच अशा व्यक्तींसाठी रोनाल्ड ब्लूम यांच्या पिक्सेल ऑप्टिक्स या कंपनीने एक इलेक्ट्रॉनिक चष्मा बनवला आहे. या नव्या पध्दतीच्या इलेक्ट्रॉनिक चष्म्याला स्वत:ची मेमरी असते. हा चष्मा लेन्सला सांगतो की तुम्ही कुठे बघत आहात. तुमची नजर खाली वळली तर इलेक्ट्रॉनिक मेमरी ०.०२५ सेंकदापेक्षाही कमी वेळात लेन्सला जवळच्या वस्तूवर स्थिर करते, तसेच तुमची नजर वरच्या दिशेने वळल्यास त्याला समजते की तुम्ही वाचणे बंद केले आहे आणि मग हा चष्मा डोळ्यांच्या नंबरनुसार लेन्सला त्या अवस्थेत परिवर्तीत करतो. म्हणजे दूरची वस्तू बघण्यासाठी नजर उठवताच चष्म्याची इलेक्ट्रॉनिक मेमरी जवळचे बघणाऱ्या अवस्थेचा स्वीच बंद करते. हेच या चष्म्याचे खास वैशिष्ट्य आहे. याची जवळची लेन्स डोळ्यांच्या इशाऱ्यानुसार चालू बंद होत असते. (क्रमश:)

## नवं संशोधन

### ग्लोबल पोझिशनिंग सिस्टीम

आपण प्रवास करत असलो, तर आपण किती वेगानं जात आहोत, एखाद्या विशिष्ट जागी पोहोचण्यासाठी आपल्याला किती वेळ लागेल, हेदेखील या प्रणालीच्या माध्यमातून शोधून काढता येऊ शकतं. या जीपीएस रिसिव्हरची अचूकता जवळपास ५० फुटांपर्यंत असते. जीपीएस रिसिव्हरवर अनेक प्रकारचे नकाशेही असतात. यामुळे आपल्याला आपला मार्ग शोधण्यासही मदत होते. प्रत्येक प्रकारसाठी वेगळे रिसिव्हर उपलब्ध आहेत. रस्त्यांचा नकाशा, समुद्री मार्ग, हवाई मार्ग, भौगोलिक नकाशे असे विविध नकाशे असणारे रिसिव्हरही आपण निवडू शकतो. अनेक जण आपल्या कारमध्ये जीपीएस प्रणाली बसवून घेतात. (क्रमश:)

## सोडवा सुडोकू

सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटीमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.

**क्रमांक : ४६१**

| | | | |
|---|---|---|---|
| | | | 3 |
| 3 | 2 | 4 | |
| | 4 | 3 | 2 |
| 2 | | | |

**क्रमांक ४६० चे उत्तर**

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | 1 | 4 | 3 |
| 1 | 2 | 3 | 4 |
| 3 | 4 | 1 | 2 |
| 4 | 3 | 2 | 1 |

## हास्यविनोद

मन्या आणि अभ्या गप्पा मारत बसले होते. कोण अधिक धीट यावर चर्चा सुरू असताना मध्येच मन्या म्हणाला, 'अभ्या मला सांग तू एवढं धीट असल्याचं सांगतोस, तू वाघाच्या गुहेत जावून परत येवू शकतोस ? **अभ्या** : हो अगदी ! काय आहे त्यात ? आत वाघ नसला म्हणजे झालं.



## म्हणींचे अर्थ

### पडतील स्वाती तर पिकतील मोती

पावसाच्या नक्षत्रांपैकी स्वाती हे एक नक्षत्र आहे. या नक्षत्रावर जर पाऊस पडला तर शेतकऱ्यांच्या पेरण्यांसाठी पाणी वेळेवर उपलब्ध होते आणि वरुणराजाच्या कृपेने शेतात धान्यरुपी मोती पिकतात. म्हणूनच 'पडतील स्वाती तर पिकतील मोती' अशी म्हण वापरली जाते.

## महिलायन

### वाढवा मुलांची क्रीडाकौशल्य

आपल्या मुलांनी वेगवेगळ्या खेळांमध्ये प्राविण्य मिळवावं, असं प्रत्येक पालकांना वाटत असतं. त्यासाठी लहानपणीच त्याच्याकडून तयारी करुन घेणं आवश्यक आहे. त्याच्यामध्ये ही 'मॅनिप्यलुटीव्ह स्कील' विकसित झाली तर खेळांमध्ये तर तो प्रगती करेलच पण आयुष्यातील वेगवेगळ्या आव्हानांनाही तो समर्थपणे सामोरा जाईल.



'मॅनिप्युलेशन' हा शब्द आपण रोजच्या जीवनात अनेक वेळा वापरतो. पण 'मॅनिप्युलेटीव्ह' याचा अर्थ याठिकाणी अतिहुशारी किंवा धूर्तपणा असा नाही. 'मॅनिप्युलेटीव्ह स्कील्स' या अर्थ या ठिकाणी मुलांना वेगवेगळ्या खेळांमध्ये कौशल्य मिळण्यासाठी त्यांच्यामध्ये सुधारणा करणं किंवा त्या क्षेत्रात चांगली कामगिरी करण्यासाठी त्यांनी आपली क्षमता वाढवणं असा घेऊ या. जे काम एखादी प्रौढ व्यक्ती अगदी सहजपणे करु शकते तेच काम करायला लहान मुलांना बराच वेळ लागू शकतो. या धर्तीवर मुलांना वेगवेगळ्या खेळांमध्ये चेंडू कशा पद्धतीने फेकावा त्यांच्या दृष्टीने सोपं नसतं. एखादी प्रौढ व्यक्ती चेंडू सराईतपणे फेकत असेल तर तेच काम लहान मुलांना अवघड वाटू शकतं. (क्रमश:)

## बालांगण


### दोस्ती संगणकाशी

अलीकडे नोकरीसाठी बायोडाटा पाठवण्यापासून मुलाखतीचं बोलवणंही हल्ली ईमेलनं येऊ लागलं आहे. त्यामुळे ईमेलचा वापर वाढू लागला आहे. आपला कामासाठी वापरत असलेला ईमेल आयडी सुरक्षित राखणंच योग्य आहे. तसंच, ज्या आयडीवरून तुम्ही काम करत आहात, त्यावरून कुठल्याही साईटवर साईन अप करू नका किंवा नोटीफिकेशन्स मागवू नका. अनेक स्पॅमर्स अथवा हॅकर्स याचा गैरफायदा घेऊ शकतात आणि तुमच्या आयडीवरील सर्व गोपनीय माहिती त्यांना मिळू शकते. त्यामुळे अशा गोष्टींसाठी आपलंच एखादं स्वतंत्र ईमेल अकाऊंट असणं योग्य ठरेल. त्यामुळे कामाच्या अकाऊंटवरून कामच होईल. यामुळे आपल्यालाही काम करणं सोपं जाईल.

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

# खोल समुद्रातील प्रकाश संश्लेषण




पानांमधील हरितद्रव्य, हवा आणि प्रकाशाच्या साहाय्याने वनस्पती प्रकाश संश्लेषण क्रियेद्वारे स्वतःचे अन्न तयार करतात, हे आपल्याला माहिती आहे. या क्रियेसाठी सूर्यप्रकाशाची नितांत गरज असते. समुद्रतळाशी सूर्यकिरणे पोहोचू शकत नाहीत. मात्र, जवळजवळ अंधारच असलेल्या किंवा अत्यंत तुरळक प्रकाश असलेल्या अशा ठिकाणच्या वनस्पतीही प्रकाश संश्लेषण करतात, असे आढळून आले आहे. आर्क्टिक महासागराच्या पृष्ठभागापासून १६० फूट खोलीवर अशा वनस्पती प्रकाश संश्लेषण करीत असल्याचे संशोधकांना आढळले.

पूर्वीच्या अनुमानापेक्षा अत्यंत कमी प्रकाशातही वनस्पती वाढू शकतात, असे या नव्या संशोधनातून दिसून आले आहे. मायक्रोअल्गी या जलीय शैवालाच्या अभ्यासातून ही बाब स्पष्ट झाली. या संशोधनाची माहिती नेचर कम्युनिकेशन्स या नियतकालिकात प्रसिद्ध करण्यात आली आहे. जर्मनीतील संशोधकांनी याबाबतचे संशोधन केले. आर्क्टिक महासागराच्या पृष्ठभागापासून १६४ फूट म्हणजेच ५० मीटर खोलीवर कमी प्रकाशाच्या स्तरात वनस्पती कसे प्रकाश संश्लेषण करतात, हे त्यांनी पाहिले. या वनस्पती सूर्यप्रकाशाचे आपल्या पानांमधील हरितद्रव्याच्या साहाय्याने ऊर्जेत रूपांतर करतात. त्यासाठी त्यांना अतिशय कमी प्रकाशही पुरेसा होतो. त्या सर्वात कमी प्रकाश स्तरातही ही क्रिया करतात. अशा कमी प्रकाशातही तग धरून राहण्याची क्षमता वनस्पतींनी स्वतःमध्ये विकसित केलेली आहे, हे आश्चर्यकारक संशोधन यामधून झाले. जमिनीवरही अनेक ठिकाणी कमी सूर्यप्रकाश मिळणारी ठिकाणे आहेत. त्यामध्ये युरोप, अमेरिकेतील थंड हवामानाच्या अनेक ठिकाणांचा समावेश होतो. अशा ठिकाणी कमी सूर्यप्रकाश उपलब्ध असतानाही पिकांची चांगली वाढ कशी होईल, याबाबतच्या संशोधनासाठी हे नवे संशोधन साहाय्यक ठरू शकते.

# जनुकात अचूक बदल शक्य

जगभरात जीन्स म्हणजेच जनुकांबाबतही वेगवेगळे संशोधन होत असते. जनुक संपादनातील प्रकाशाचा वापर करण्याची एक वेगळी पद्धतही वैज्ञानिकांनी शोधून काढली आहे. त्यामध्ये जनुकांचे संपादन अधिक अचूक पद्धतीने करता येते. पेशीतील जनुके नियंत्रित करण्याचा हा प्रभावी उपाय सापडला असल्याचे अमेरिकेतील पीटसबर्ग विद्यापीठातील संशोधक ॲलेक्झांडर डेटर्स यांनी म्हटलेले आहे.



या नवीन पद्धतीमुळे जनुकाचे पेशीतील स्थान व वेळ ठरवता येते. त्यामुळे एखादा जनुक अचूकतेने काढूनही टाकता येतो. सीआरआयएसपीआर–कॅस–९ या जनुक संपादन साधनाचा शोध २०१३ मध्ये लावण्यात आला होता. या पद्धतीत जीवाणूपासून मिळवलेले कॅस–९ हे प्रथिन व आरएनएची कृत्रिम मार्गदर्शक व्यवस्था जिनोममध्ये काप घेऊन जनुकाची दुरुस्ती करू शकते किंवा अपेक्षित उत्परिवर्तन म्हणजे म्युटेशन्स आणू शकते. प्रत्यक्षात सीआरआयएसपीआर (क्लस्टर्ड रेग्युलरसली इंटरस्पेस्ड शॉर्ट पॅलिडॉमिक रिपीटस ऑफ डीएनए बेस सिक्वेन्सेस) ही पद्धत सिस्टीक फायब्रॉसिस व सिकल सेल ॲनिमिया या रोगांवर बरीचशी परिणामकारक ठरली आहे. प्रयोगशाळेत माणसाला होणारे रोग प्राण्यांमध्ये निर्माण करून त्यांच्यावर प्रयोग करण्यात आले आहेत. कीटकांना दाद न देणाऱ्या गव्हाच्या प्रजातीही तयार करणे शक्य झाले आहे. नवीन अभ्यासानुसार संशोधकांना लायसिन या अमायनो आम्लाचे अवशेष कॅस–९ मध्ये आढळून आले आहेत. आताच्या नवीन प्रयोगात कॅस–९ प्रथिनाला जैविकदृष्ट्या निष्क्रिय करता येते, जैविक पिंजऱ्यात बंदिस्त करून ठेवता येते व प्रकाशाच्या मदतीने तो पिंजरा उघडता येतो. पिंजरा उघडेपर्यंत काही विकरांना कृतिशील करता येते शिवाय जनुकीय संपादन करता येते. पूर्वी कॅस–९ चे काम नियंत्रित करणे अवघड होते. कॅस–९ वर प्रकाशाचा झोत सोडून अधिक चांगल्या प्रकारे जनुकीय संपादन करता येते. अमुक पेशीत अमुक वेळी जनुकात बदल करायचा आहे तर ते आता शक्य आहे, असे डेटर्स यांनी म्हटले आहे. हा शोधनिबंध जर्नल ऑफ द अमेरिकेन केमिकल सोसायटी या नियतकालिकात प्रसिद्ध झालेला आहे.

# हिरव्या मिरचीचे गुणधर्म




भारतीय आहारपद्धतीत हिरव्या किंवा लाल मिरचीचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात असतो. आपल्याकडे हिरवी मिरची खर्डा किंवा ठेचा, मिरची भजी, तळलेली मिरची अशा स्वरुपातही खाल्ली जात असते. पोह्यांसारखे नाश्त्याचे पदार्थ असोत किंवा भाजी असो, हिरव्या मिरचीचे तुकडे त्यामध्ये चवीसाठी घातलेले असतातच. अर्थात, केवळ चवीसाठीच हिरवी मिरची गुणकारी नाही. आरोग्यासाठीही या मिरचीचे अनेक लाभ असल्याचे तज्ज्ञ सांगतात.

मिरचीचे योग्य प्रमाणात नियमितपणे सेवन केल्यास आरोग्यास अनेक लाभ मिळू शकतात. हिरव्या मिरचीमध्ये क जीवनसत्त्व मोठ्या प्रमाणात असते. त्यामुळे शरीराची रोगप्रतिकारक क्षमता वाढते. हिरव्या मिरचीत फायबरही अधिक असतात. त्यामुळे शरीराची पचनप्रक्रिया सुरळीत ठेवण्यास मदत मिळते. हिरव्या मिरचीत कॅप्साइसिन नावाचे तत्त्व असते, ज्यामुळे चयापचयाची क्षमता वाढते आणि वजन नियंत्रणात राहते. हिरव्या मिरचीत अँटी ऑक्सिडंट्स असतात. त्यामुळे शरीरातील कोलेस्टेरॉलची पातळी नियंत्रणात राहते. परिणामी, हृदयविकाराचा धोका कमी होतो. हिरव्या मिरचीतील कॅप्साइसिन तत्त्व शरीरातील एंडोर्फिन्सची पातळी वाढवते. त्यामुळे स्नायुदुखीपासून आराम मिळतो. हिरव्या मिरचीच्या सेवनाने रक्तशर्करेची पातळी नियंत्रणात ठेवण्यासही मदत मिळते.

# ओराफिश माशाचे दुर्मीळ दर्शन


जगाचा अंत होणार, पण कधी आणि कसा याबाबत बरेच दावे केले जातात. काही घटना अशा आहेत ज्याचा संबंध जगाच्या अंताशी जोडला जातो. या घटना म्हणजे जगाच्या अंताचे संकेत मानले जातात. त्यापैकीच एक म्हणजे हा मासा, ज्याला शापित मानलं जातं. जो दिसणं म्हणजे काहीतरी भयंकर घडणार. आता हा मासा दिसला त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे.



ऑस्ट्रेलियाच्या समुद्रकिनाऱ्यावर हा डुम्सडे फिश ज्याला 'ओराफिश' असंही म्हटलं जातं, हा दुर्मीळ मासा सापडला आहे. कर्टिस पिटरसन नावाच्या व्यक्तीला तिवी आयलँडवर हा मासा सापडल्याची माहिती आहे. याचे फोटोही सोशल मीडियावर पोस्ट करण्यात आले आहे.

हा मासा जेव्हा जेव्हा दिसला तेव्हा तेव्हा भूकंप आला आहे. १५ वर्षांपूर्वी जपानमध्ये जेव्हा भूकंप आला तेव्हासुद्धा हा मासा दिसला होता. त्यानंतर या माशाचा आणि भूकंपाचा संबंध जोडला जाऊ लागला. हा मासा दिसल्यानंतर भूकंप येतो, असं लोक म्हणू लागले. द मिररच्या रिपोर्टनुसार, पर्यावरणीय भूकंपशास्त्रज्ञ कियोशी वडात्सुमी यांनी मात्र हा निव्वळ योगायोग असल्याचे स्पष्ट केले आहे. समुद्राच्या तळाजवळ राहणारे खोल समुद्रातील मासे हे समुद्राच्या पृष्ठभागाजवळील माशांपेक्षा हालचालींबद्दल अधिक संवेदनशील असतात, असे ते म्हणतात.

# सर्वात लहान आकाराचा बल्ब



जगभरात अतिशय सूक्ष्म अशा वस्तूही बनवल्या जात असतात. सध्याच्या नॅनोटेक्नॉलॉजीच्या काळात तर याबाबत अफलातून कामगिरी करता येऊ शकते. तुम्हाला माहिती आहे का, जगातील सर्वात लहान दिवाही तयार करण्यात आलेला आहे? तो ग्राफिनच्या एका अणुइतक्या जाडीचा आहे. त्यामुळे ग्राफिन आता स्मार्टफोन, संगणक, मोटारी व इमारती तसेच उपग्रह यांचे रूप बदलून टाकणार आहे.

जगातील सर्वात लहान विद्युत बल्ब अतिशय पातळ अशा ग्राफिनच्या थरापासून अतितप्त होऊ शकणारे आपल्या नेहमीच्या बल्बमध्ये असते तसे तारेचे वेटोळे तयार करण्यात आले आहे. ते २५०० अंश सेल्सिअस तापमानाला प्रकाशमान होते. आण्विक पातळीवर असला तर या बल्बचा प्रकाश नुसत्या डोळ्यांनी दिसतो इतका प्रखर आहे. ज्या सिलिकॉन चिपवर तो बसवलेला असतो, तिचे कुठलेही नुकसान या जास्त तापमानामुळे होत नाही. नवीन प्रकारची स्वीच, प्रकाशीय संगणक, डिजिटल माहितीचे वहन यात त्याचा उपयोग होणार आहे. माहितीचे वहन सिलिकॉन चिपपेक्षा वेगाने होईल, असा वैज्ञानिकांचा दावा आहे. न्यूयॉर्कमधील कोलंबिया विद्यापीठातील मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे प्राध्यापक जेम्स होन यांनी सांगितले की, संगणकाच्या चिपवर प्रथमच प्रकाशस्रोत तयार करण्यात आला आहे. हे संशोधन 'नेचर नॅनोटेक्नॉलॉजी' या नियतकालिकात प्रसिद्ध झाले आहे. होन यांच्या दाव्यानुसार जगातील सर्वात लहान विद्युत बल्ब तयार करण्यात त्यांना यश आले असून, यात नवीन प्रकारचा ब्रॉडबँड प्रकाश उत्सर्जक वापरण्यात आला आहे. त्यामुळे अणुएवढ्या जाडीच्या लवचिक पदार्थातून प्रकाश मिळवता आला आहे. त्याचा संदेश वहनात मोठा उपयोग होईल. ग्राफिन हा पदार्थ रशियन वैज्ञानिकांनी मँचेस्टर विद्यापीठात शोधून काढला होता व तो कार्बनच्या जाळ्यासारख्या रचनेचा बनलेला असतो. त्याची जाडी एका अणुएवढी असते. तो खूपच हलका आणि विजेचा तो पूर्णवाहक असतो.

# उत्खननात सापडली दोनशे वर्षांपूर्वीची चिठ्ठी

इतिहासाची पाळंमुळं शोधण्याच्या कारणामुळे आजवर अनेक भागांमध्ये, अनेक महत्त्वपूर्ण क्षेत्रांमध्ये पुरातत्त्व विभागापासून या क्षेत्रात सक्रिय असणाऱ्या अनेक संघटनांनी उत्खनन करत कैक अचंबित करणाऱ्या गोष्टी जगापुढे आणल्या आहेत. पुरातन काळातील नाणी, भांडी, गतकाळातील जीवनशैलीवर भाष्य करणारे मानवी संस्कृतीचे अनेक पुरावे आजवर समोर आले आहेत. त्यातच आता एक अशी गोष्ट अभ्यासकांच्या हाती लागली आहे की, जी पाहून त्यांनाही आपण काहीतरी मोठा टप्पा साध्य केल्याची प्रचिती येत आहे.


फ्रान्समधील एका क्षेत्रामध्ये पुरातत्त्व विषयाचा अभ्यास करणाऱ्या काही विद्यार्थ्यांना एक कमाल गोष्ट हाती लागली. गॉलिश टाऊन येथे उत्खनन करतेवेळी त्यांच्या हाती एक लहानशी काचेची बाटली लागली. एका मातीच्या माठवजा भांड्यामध्ये ही बाटली सापडली. अभ्यासकांच्या मते, २०० वर्षांपासून ही बाटली लपवण्यात आली होती. या बाटलीतील ही चिठ्ठी एका अभ्यासकाची असून, त्या अभ्यासकानंही या क्षेत्रामध्ये उत्खननाचं



काम केल्याचं म्हटलं गेलं. गिलौम ब्लॉडेल यांनी यावेळी या निरीक्षणपर मोहिमेचे नेतृत्त्व केले असून, हाती लागलेल्या पुराव्यांना त्यांनी परीक्षणासाठी पाठवले आणि चिठ्ठीतील मजकुरासह त्यावर लिहिलेलं नाव समोर आलं. पी. जे. फेरेत हे एक स्थानिक प्रस्थ असून, स्थानिक नोंदींमध्ये नमूद असणाऱ्या माहितीनुसार त्यांनीही या भागात २०० वर्षांपूर्वी उत्खनन केल्याचे पुरावे आहेत. इतिहासकारांपासून पुरातत्त्व विभागातील मंडळींसाठी हा एक मोठा टप्पा असून, येत्या काळात त्यांना गॉलिश गाव आणि संस्कृतीला आणखी जवळून निरीक्षण करण्याची संधी या चिठ्ठीच्या माध्यमातून मिळणार आहे, असं म्हटलं जात आहे.

# बुरशीजन्य संसर्गाचा धोका वाढला

जगभरात सध्या बुरशीजन्य संसर्गाचा धोका वाढत असल्याचे दिसून आले आहे. एवढंच नव्हे तर याच्या उपचाराकरिता वापरली जाणारी औषधे प्रभावहिन होत असल्याचे संशोधनात आढळले आहे. या चोरपावलांनी पसरत असलेल्या धोक्याची वेळीच दखल घेणे गरजेचे असल्याचेही तज्ज्ञांचे म्हणणे आहे.



ब्रिटनच्या मँचेस्टर विद्यापीठातील आण्विक जीवशास्त्रज्ञ नॉर्मन व्हॅन रिजन यांच्या मते, जागतिक आरोग्य चर्चांमध्ये बुरशीजन्य रोगजनक आणि अँटिफंगल प्रतिरोधकतेच्या धोक्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. तातडीचे लक्ष न दिल्यामुळे किंवा कारवाई न केल्यामुळे बुरशीजन्य संक्रमण वर्षाला ६.५ दशलक्ष लोकांना संक्रमित करते. एवढंच नव्हे तर यामुळे दरवर्षी ३.८ दशलक्ष लोकांचा बळी जातो. याकडे लक्ष दिलं नाही तर हा आकडा आणखी धोकादायक बनू शकतो, असा इशाराही संशोधकांनी दिला आहे.

बुरशीजन्य संसर्गाचा प्रभाव कमी रोगप्रतिकारशक्ती असलेल्यांना होत आहे. नॉर्मन व्हॅन रिजन आणि शास्त्रज्ञांचा एक आंतरराष्ट्रीय गट सरकार, संशोधन समुदाय आणि फार्मास्युटिकल उद्योगाला 'बॅक्टेरियाच्या पलीकडे पाहा' असं आवाहन करत आहे. चीन, नेदरलँडस्, ऑस्ट्रिया, ऑस्ट्रेलिया, स्पेन या देशांतील संस्थांमधून आलेल्या नॉर्मन व्हॅन रिजन आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सांगितले की, 'गेल्या दशकांमध्ये औषधांच्या प्रतिकारशक्तीच्या समस्यांची संख्या पाहता, जीवाणूंकडे असमान लक्ष देणे चिंताजनक आहे. एस्परगिलस फ्युमिगॅटससारख्या बुरशीजन्य रोगाचा फुफ्फुसांवर आणि कॅन्डिडा म्हणजे जीभेवर परिणाम होते. कमकुवत रोगप्रतिकार प्रणाली असलेले लोक आणि वृद्ध प्रौढांना सर्वाधिक धोका असतो. जीवाणू आणि विषाणूंच्या तुलनेत बुरशी हे अधिक क्लिष्ट जीव आहेत. ज्यामुळे शरीरातील इतर महत्त्वाच्या पेशींना हानी न करता बुरशीच्या पेशी नष्ट करणारे औषध विकसित करणे शास्त्रज्ञांना कठीण आणि अधिक महाग होते. सध्या अँटिफंगल औषधांचे फक्त चार वर्ग आहेत.

# युरिक ॲसिड वाढल्यास...

खाण्या–पिण्याच्या चुकीच्या सवयींमुळे अनेक आरोग्याच्या समस्या उद्भवतात. त्यापैकी एक आहे, युरिक ॲसिड वाढणे. 'युरिक ॲसिड' हा एक नैसर्गिक पदार्थ आहे, जो शरीरात निर्माण होतो. मात्र, जेव्हा त्याची पातळी जास्त होते, तेव्हा ते सांधे दुखणे, गाऊट आणि इतर अनेक आरोग्य समस्यांना कारणीभूत ठरते. विशेषतः तरुण पिढी, जी फास्ट फूड आणि चुकीच्या आहार सवयींमुळे आरोग्याच्या समस्या भोगत आहे, त्यांच्यासाठी ही समस्या म्हणजे एक महत्त्वाचा मुद्दा बनला आहे. यामुळे योग्य आहार आणि नियंत्रण आवश्यक आहे.



तज्ज्ञांनी काही प्रभावी खाद्यपदार्थांची माहिती दिली आहे, जे शरीरातील युरिक ॲसिड नियंत्रित ठेवण्यास मदत करतात.

चेरी हे फळ युरिक ॲसिड नियंत्रित करण्यासाठी अत्यंत फायदेशीर मानले जाते. चेरीमध्ये असलेल्या अँटिऑक्सिडंटस्मुळे शरीरातील सूज आणि जळजळ कमी होते. त्याचबरोबर चेरीमधील फ्लेव्होनॉयडस्? युरिक ॲसिडच्या पातळीला स्थिर ठेवतात. नियमितपणे चेरीचे सेवन केल्याने गाऊटचा त्रास कमी होण्यास मदत होते. लिंबूमध्ये व्हिटॅमिन सी आणि अँटिऑक्सिडंटस्? भरपूर प्रमाणात असतात. लिंबूचे नियमित सेवन केल्यास शरीरातील विषारी पदार्थ बाहेर टाकण्यास मदत होते, तसेच युरिक ॲसिडची पातळीदेखील नियंत्रित होते. गाजर उच्च फायबरयुक्त असते, जे युरिक ॲसिड कमी करण्यास प्रभावी ठरते. गाजरात असलेल्या अँटिऑक्सिडंटस्मुळे शरीरातील विषारी पदार्थ बाहेर टाकले जातात व शरीराची प्रतिकारशक्ती वाढते. पालक, मेथी, कोथिंबीर या हिरव्या पालेभाज्यांमध्ये खनिज पदार्थ आणि अँटिऑक्सिडंटस्? भरपूर असतात, जे शरीरातील सूज कमी करण्यास मदत करतात. या भाज्या नियमित आहारात घेतल्याने युरिक ॲसिडची पातळी नियंत्रणात राहते व सांधे दुखण्याचे त्रास कमी होतात.

बोरांमध्ये भरपूर प्रमाणात व्हिटॅमिन सी असते, जे शरीरातील जळजळ कमी करण्यास आणि युरिक ॲसिड नियंत्रित करण्यास मदत करते. ओमेगा–३ फॅटी ॲसिडस्मुळेही सांधे दुखणे व जळजळ कमी होते. ओमेगा–३ युक्त मासे, जसे की सॅल्मन, मॅकेरेल हे मासे नियमित आहारात घेतल्याने युरिक ॲसिड नियंत्रित ठेवता येते.

## आकुर्डीतील लाभार्थींना सदनिकांचे होणार वाटप
# 'प्रधानमंत्री आवास' लाभार्थींना 'दसरा गिफ्ट'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकने आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी पिंपरी व आकुर्डी येथे सदनिका निर्माण केल्या आहेत. या प्रकल्पातील लाभार्थींचा यावर्षीचा दसरा गोड होणार आहे. महापालिका प्रशासनाने सदर प्रकल्पाचा चावी वाटप कार्यक्रम लवकरच होणार आहे.

महानगरपालिका प्रशासनाने केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री आवास योजनेच्या माध्यमातून आकुर्डी येथे ५६८ सदनिकांच्या सहा इमारती बांधल्या आहेत. तसेच, पिंपरी येथे ३७० सदनिकांसाठी दोन इमारती बांधल्या आहेत. केंद्र सरकार व राज्य सरकार आणि लाभार्थींचा स्वहिस्सा आहे. सदर प्रकल्पांना बांधकाम पूर्णत्वाचा दाखला मिळाला आहे. लाभार्थींही निश्चित झाले आहेत.

गेल्या दोन महिन्यांपासून लाभार्थी गृहकर्जाचे हप्ते भरीत आहेत. मात्र, प्रशासनाकडून सदनिकाधारकांना ताबा मिळाला नव्हता. या पार्श्वभूमीवर भाजपा आमदार महेश लांडगे यांनी महानगरपालिका आयुक्त व प्रशासन यांच्यासोबत बैठक घेतली होती. त्यावेळी 'लवकरच कार्यवाही करु', असे आश्वासन प्रशासनाने दिले होते. त्यानुसार हा प्रश्न आता मार्गी लागला असून, आठवडाभरात चावी वाटप होणार आहे.

पिंपरी आणि आकुर्डी प्रधानमंत्री आवास योजना आरक्षण 'बेघरांसाठी घर' असे होते. मात्र, सदर प्रकल्पाची व्यापक जनहिताच्या दृष्टीने आरक्षणाचा उद्देश 'आर्थिक दुर्बलांसाठी घर' असा करण्यासाठी राज्य शासनाकडे पाठपुरावा करण्यात आला. त्यानंतर प्रकल्पाचे भूमिपूजन करण्यात आले. प्रकल्प उभारणी करुन लाभार्थींसाठी सोडत प्रक्रिया करण्यात आली. लाभार्थी निश्चित करुन आता सदनिकांचे वाटप होत आहे. प्रकल्पाचे आरक्षण बदलण्यापासून भूमिपूजन ते लोकार्पण हा उद्देश साध्य झाला. याचे समाधान वाटते, अशी प्रतिक्रिया आमदार महेश लांडगे यांनी दिली आहे.







"पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'सर्वांसाठी घर' या संकल्पनेतून पिंपरी-चिंचवडमध्ये विविध ठिकाणी 'प्रधानमंत्री आवास' योजना राबवण्यात आली. त्यामुळे सर्वसामान्य पिंपरी-चिंचवडकरांचे हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण होत आहे. तसेच, शहर झोपडपट्टीमुक्त होण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे. पिंपरी आणि आकुर्डी प्रकल्पातील लाभार्थींना अनेक दिवसांपासून सदनिकांचा ताबा मिळण्याची प्रतीक्षा होती. आता या प्रकल्पाचे लोकार्पण होणार असून, सदनिकाधारकांना हक्काचे घर मिळणार आहे."

**— महेश लांडगे** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

## » Selected



### अमीर खानच्या मारेकऱ्याला पोलिसांकडून १२ तासांत अटक

**पिंपरी :** चिंचवडमधील विजय बिअर बार समोर मयत अमीर मकबुल खान (वय ३४ वर्षे रा. वेताळनगर झोपडपट्टी, चिंचवड) हा देशी दारुच्या दुकानात दारु विकत घेत काऊंटरजवळ थांबलेला होता. शेजारी एक अज्ञात इसम हा दारु पीत थांबलेला होता. अज्ञात इसमाने त्याचा दारूचा ग्लास तेथे बाजुला असलेल्या तिऱ्हाईत इसमास प्यायला दिला. अज्ञात इसमाने त्याचा दारूचा उष्टा ग्लास तिऱ्हाईत इसमास दिला. याचा अमीर खान यास राग आला. त्याने अज्ञात इसमास शिवीगाळ करून चप्पलने मारले.

तेव्हा सदरचा अज्ञात इसम दुकानाच्या बाहेर गेला व त्याच्या मागे अमीर खान हा देखील बाहेर गेला. दुकानाच्या बाहेर त्यांच्यात पुन्हा हाणामारी चालू झाली. तेव्हा अमीर खानने अज्ञात इसमास वीट फेकून मारली. त्यामुळे चिडून जावून अज्ञात इसमाने त्याच्याकडील स्क्रू-ड्रायव्हर अमीर खान याच्या छातीत खुपसून त्याचा खून केला व पसार झाला. या प्रकरणी चिंचवड पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करणेत आला. हा प्रकार (दि.०६) रोजी रात्री ९.४५ वा चे सुमारास घडला.

पोलीस पथकाने परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली. त्यामधुन एका संशयीत इसमाचे गुन्ह्याच्या ठिकाणच्या हालचालीवरुन त्यानेच गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले. साक्षीदारामार्फत त्याच्याबाबत सविस्तर माहीती प्राप्त करत असताना इसमाचे नाव यशवंत आत्माराम बगाडे (वय ४२ वर्षे रा. चिंचवडेनगर, चिंचवड) असल्याचे निष्पन्न झाले. तदनंतर रात्री दरम्यान तपास पथकचे अधिकारी व अंमलदार यांनी दोन टिम तयार करून आरोपीचा चिंचवडेनगर व दळवीनगर भागात तांत्रिक पध्दतीने शोध घेवून १२ तासाच्या आत त्याच्या मुसक्या आवळल्या आहेत.

### काळेवाडीत अनधिकृत पत्राशेड बांधकामांवर कारवाई



**पिंपरी :** 'ब' क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने काळेवाडी येथील लकी बेकरी जवळील अनधिकृत पत्राशेड बांधकामांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली. या कारवाईमध्ये एकूण २२०० चौरस फुट पत्राशेड बांधकाम निष्कासित करण्यात आले.

अतिक्रमण विभागाचे उप आयुक्त मनोज लोणकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच क्षेत्रीय अधिकारी अमित पंडित यांच्या अधिपत्याखाली ही कारवाई करण्यात आली. या कारवाईदरम्यान अतिक्रमण विभागाचे कार्यकारी अभियंता, उपअभियंता, कनिष्ठ अभियंता तसेच अतिक्रमण पथक, महाराष्ट्र सुरक्षा दल, पोलीस दल, सुरक्षा कर्मचारी आणि मजुर उपस्थित होते.

### डुडुळगावतील गृहप्रकल्पासाठी अर्ज करण्यास मुदतवाढ

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत डुडुळगाव येथे गृहप्रकल्पाचे काम सुरू आहे. तेथील सदनिकांसाठी महिनाभरात केवळ २ हजार अर्ज आले आहेत. अर्ज स्वीकारण्यासाठी ३१ ऑक्टोबरपर्यंत एक महिन्याची मुदतवाढ देण्यात आली आहे.

त्या ठिकाणी ३२३ चौरस फूट चटई क्षेत्र आकाराच्या एकूण १ हजार १९० सदनिका आहेत. त्यासाठी १४ लाख १४ हजार १७३ रुपये हिस्सा पात्र लाभार्थ्यांना भरावा लागणार आहे. या सदनिकांसाठी १० हजार ५०० रुपये भरून ऑनलाईन अर्ज स्वीकारण्यास ३० ऑगस्टला सुरुवात झाली आहे. तीस सप्टेंबरपर्यंतच्या एका महिन्यात एकूण २ हजार अर्ज महापालिकेस प्राप्त झाले आहेत.

गृहप्रकल्पाच्या नोंदणीसाठी महापालिकेस प्राप्त झालेल्या अर्जाच्या तुलनेत ही संख्या खूपच कमी आहे. त्यामुळे महापालिकेने अर्ज स्वीकृतीस एका महिन्याची मुदतवाढ दिली आहे. अर्ज ३१ ऑक्टोबरपर्यंत स्वीकारण्यात येणार आहेत. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील कुटुंबांनी अर्ज करावेत, असे आवाहन झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभागाचे उपायुक्त अण्णा बोदडे यांनी केले आहे.

## राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

### टाटा उद्योगसमूह हा राष्ट्रप्रेमी – पद्मश्री पोपटराव पवार

**पिंपरी :** "स्थापनेपासून सातत्याने समाजासाठी आणि देशासाठी योगदान देणारा टाटा उद्योगसमूह राष्ट्रप्रेमी आहे." असे गौरवोद्गार महाराष्ट्र राज्य आदर्शगाव संकल्प समितीचे कार्याध्यक्ष पद्मश्री पोपटराव पवार यांनी ऑटोक्लस्टर सभागृह, चिंचवड येथे सोमवार रोजी काढले. महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास परिषद, पुणे आयोजित भारतरत्न जे. आर. डी. टाटा उद्योग पुरस्कार प्रदान सोहळ्यात पोपटराव पवार बोलत होते. ज्येष्ठ समाजसुधारक पद्मश्री गिरीश प्रभुणे अध्यक्षस्थानी होते. या दोन्ही मान्यवरांच्या हस्ते विविध क्षेत्रांतील उद्योजकांना पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. त्यामध्ये तळवडे येथील श्री ओम टेक्नो सर्व्हिसेसचे संचालक अनिल शेटे आणि कात्रज येथील गणेश ग्रुप इंजिनिअरिंग प्रॉपर्टीजचे संचालक मंगेश पोखरकर यांना भारतरत्न जे. आर. डी. टाटा उद्योगरत्न पुरस्काराने गौरविण्यात आले.

त्याचबरोबर आळंदी येथील हॉटेल नीलमचे संचालक नीलेश बोरचटे (भारतरत्न जे. आर. डी. टाटा उद्योगभूषण पुरस्कार), कल्याणी अर्थमुव्हर्स ॲण्ड कन्स्ट्रक्शन कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक गोपीनाथ देशपांडे (भारतरत्न जे. आर. डी. टाटा उद्योगविकास पुरस्कार), संगमनेर येथील रुद्रा मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉडक्टचे संचालक डॉ. अक्षय पवार (भारतरत्न जे. आर. डी. टाटा उद्योगश्री पुरस्कार), आदर्शगाव हिवरेबाजारच्या सरपंच विमल ठाणगे (भारतरत्न जे. आर. डी. टाटा ग्रामभूषण पुरस्कार) आणि चिखली येथील श्रेयश पॅकेजिंग मॅन्युफॅक्चरर्स ऑफ कोरोगेटेड बॉक्सेस रोल ॲण्ड सिटचे श्रेयश पुंड (भारतरत्न जे. आर. डी. टाटा युवा उद्योजक पुरस्कार) यांना सन्मानित करण्यात आले. सन्मानचिन्ह, मानपत्र, शाल आणि ग्रंथ असे पुरस्कारांचे स्वरूप होते.



### आत्मनिर्भरतेचे एक नवीन पाऊल

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**सांगवी :** युवा पिढीसाठी 'आत्मनिर्भरतेचे एक नवीन पाऊल' या विषयावर आधारित कौशल्य विकास व पॅरामेडिकल प्रशिक्षण शैक्षणिक सत्राचा उदघाटन समारंभपिंपळे गुरव येथील नटसम्राट निळू फुले नाट्यगृह या ठिकाणी मोठ्या उत्साहात आणि युवकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात संपन्न झाला.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे व्यवसायाभिमुख शिक्षणाचे स्वप्न साकार करू – शंकर जगताप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सांगवी :** विकसित भारतासाठी देशातील तळागाळातील शेवटच्या विद्यार्थ्यांपर्यंत व्यवसायाभिमुख शिक्षण पोहचविण्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे उद्दिष्ट आहे. त्यांचे हे स्वप्न साकार करण्यासाठी बार्टीसारख्या संस्थेच्या माध्यमातून सर्व घटकातील विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करण्याची जबाबदारी आमची आहे व ती आपण निश्चितच पार पाडू, असा विश्वास भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी व्यक्त केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), मोरया सामाजिक प्रतिष्ठान, लोकनेते आमदार लक्ष्मण जगताप पॅरामेडीकल कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने बजाज फिन्सर्वच्या सहकार्याने मोफत पॅरामेडिकल प्रशिक्षण, पॅरामेडिकल करिअर २.० आणि पॅरामेडिकल क्षेत्रातील कौशल्य प्रशिक्षण युवा पिढीसाठी 'आत्मनिर्भरतेचे एक नवीन पाऊल' या विषयावर आधारित कौशल्य विकास व पॅरामेडिकल प्रशिक्षण शैक्षणिक सत्राचा उद्घाटन समारंभपिंपळे गुरव येथील नटसम्राट निळू फुले नाट्यगृह या ठिकाणी मोठ्या उत्साहात आणि युवकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात संपन्न झाला.

## जगद्गुरु संत तुकाराम महाराज संतपीठ शाळेमध्ये नवरात्र व भोंडला उत्साहात




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** भारतीय संस्कृती विविध परंपरांनी नटलेली आहे. भारतीयांनी ही या संस्कृती व परंपरांचे जतन व संवर्धन केल्याने युगानुयुगे या परंपरा टिकून आहेत. सर्वांना सोबत घेऊन सामूहिकता, एकता व समतेचे संस्कार आपोआप मनात रुजविणारा लोकोत्सव म्हणजे नवरात्रात खेळला जाणारा भोंडला व गरबा. जगद्गुरु संत तुकाराम महाराज संतपीठ शाळेमध्ये नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने शाळेचे प्राचार्य डॉ.ज्ञानेश्वर गाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली भोंडला, दांडिया व गरबा आयोजित करण्यात आला. या विशेष प्रसंगी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी पारंपारिक वेशभूषा परिधान करून भोंडला, गरबा व दांडिया नृत्याचा आनंद लुटला.

कार्यक्रमाची सुरुवात शाळेचे संचालक ह.भ.प राजू महाराज ढोरे, प्राचार्य डॉ .ज्ञानेश्वर गाडगे, मुख्याध्यापिका स्नेहल पगार व समन्वयिका मयुरी मुळूक यांच्या हस्ते दीपप्रज्वलन, हत्ती ( हादगा) व दुर्गा मातेच्या पुजनाद्वारे करण्यात आली. विद्यार्थ्यांनी सुंदर गरबा नृत्य सादर करून शाळेत एकात्मता आणि आनंदाचे वातावरण निर्माण केले, ज्यामुळे सर्व विद्यार्थ्यांमध्ये एक नवीन ऊर्जा संचारली. कार्यक्रमाची विशेष बाब म्हणजे दांडिया नृत्यात केवळ विद्यार्थीच नाही तर शिक्षकांनीही सहभाग घेतला आणि संपूर्ण वातावरण आनंदाने भरून गेले. नृत्याबरोबरच देवीच्या भक्तिमय गीतांनी संतपीठ परिसर भक्तिमय झाला.

## चॅलेंजर पब्लिक स्कूलमध्ये स्वच्छता अभियान संपन्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** पिंपळे सौदागर येथील चॅलेंजर पब्लिक स्कूलमध्ये (दि. २) रोजी लालबहादूर शास्त्री आणि महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधून शाळेतील विद्यार्थी आणि संपूर्ण कर्मचाऱ्यांनी स्वच्छता अभियान राबविले. संस्थेतील मुलांनी संपूर्ण शाळेतील कचरा एका जागी जमा केला. सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना या अभियानासाठी योग्य ते मार्गदर्शन केले. संस्थेतील विद्यार्थ्यांनी या स्वच्छता अभियानात उत्साहाने सहभाग घेतला आणि संस्थेचा परिसर स्वच्छ केला. संस्थेचे संस्थापक आणि अध्यक्ष संदीप काटे यांनी महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांचे विचार किती थोर होते हे उदाहरणासहित विद्यार्थ्यांना पटवून सांगितले. प्लास्टिकचा कमीत कमी वापर करून पर्यावरणाची काळजी घ्या, अस आवाहन करीत संस्थेतील मुलांना एक जबाबदार भारतीय नागरिक बनविण्यासाठी संस्था कटिबद्ध असल्याबाबत मत व्यक्त केले.

## सीमाभिंत, ड्रेनेज, स्ट्रॉमवॉटर लाईनच्या कामाचा 'श्रीगणेशा'
# चिखली घरकुलच्या प्रलंबित प्रश्नांना अखेर मिळाला न्याय!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** चिखली घरकुल येथील पायाभूत सोयी-सुविधा आणि समस्यांबाबत महानगरपालिका प्रशासन आता खडबडून जागे झाले आहे. घरकूलची सीमाभिंत, ड्रेनेज व स्ट्रॉमवॉटर लाईनचे काम सुरू झाले असून, लवकरच काम पूर्ण करण्यात येईल, असा दावा प्रशासनाने केले आहे.

चिखली घरकुलच्या समस्यांबाबत आमदार महेश लांडगे यांनी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या उपस्थितीमध्ये घरकुल प्रतिनिधी व पदाधिकाऱ्यांची नुकतीच बैठक घेतली होती. त्यावेळी नागरीकांच्या समस्या तातडीने मार्गी लावाव्यात, अशी सूचना केली होती. अखेर प्रशासनाने काम सुरू केले आहे. त्यामुळे सर्वसामान्य घरकुलवासीयांना दिलासा मिळाला आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, राज्य शासन आणि केंद्र शासनाने आर्थिक दुर्बल घटकांतील नागरिकांना घर मिळावे. या उद्देशाने २००८ मध्ये 'जेएनएनयुआरएम' अंतर्गत चिखली से. १७/१९ नेवाळे वस्ती या ठिकाणी ६ हजार ७२० घरांची निर्मिती करण्याची योजना आणली आहे. २०१४ मध्ये या प्रकल्पातील लाभार्थींना घरांचे वाटप करण्यात आले. मात्र, प्रकल्पाच्या 'डिझाईन'प्रमाणे सोयी-सुविधा विकसित झालेल्या नाहीत.

त्यामुळे घरकुलच्या रहिवाशांना नाहक त्रास सहन करावा लागतो आहे. दरम्यान, घरकुलमधील समस्यांबाबत अशोक मगर यांनी बुधवारी घरकुलच्या प्रवेशद्वारासमोर उपोषण सुरू केले होते. यानंतर आमदार महेश लांडगे यांच्या सहकाऱ्यांनी त्यांची भेट घेतली आणि या प्रश्नाबाबत तातडीने बैठक लावण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार आयुक्त कार्यालयात बैठक झाली होती.



### घरकुलच्या समस्येचे मूळ कारण काय?

● चिखली घरकुल प्रकल्पाची निर्मिती करताना तेथील भौगोलिक स्थिती आणि भविष्यात वाढणारी लोकसंख्या आणि परिसराचा विकास याचा विचार करुन प्रकल्प उभारला नाही. त्यामुळे मुख्य रस्त्यापेक्षा सखल भागात प्रकल्प उभारला आहे. परिणामी, पावसाळ्यात पाणी साचण्याची समस्या, ड्रनेज समस्या यासह पायाभूत सोयी-सुविधा निर्माण करण्यात अनेक अडचणी आहेत

#रा

## पाच लाखांहून जास्त थकीत कर असणाऱ्या थकबाकीदारांवर कारवाई!

# सातबारा उताऱ्यावर थकबाकीचा 'बोजा' चढणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरात निवासी, औद्योगिक, बिगर निवासी, मिश्र, मोकळी जमीन अशा ६ लाख ३० हजारांहून अधिक नोंदणीकृत मालमत्ता आहेत. महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत सदर मालमत्ताधारकांकडून कर वसूल करण्यात येत आहे. कर आकारणी व कर संकलन विभागाने सर्व मालमत्ताधारकांमधील थकबाकीदारांबाबत इंत्यभूत माहिती जमा केली असून सर्व प्रशासन अधिकारी व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना प्रथम थकबाकीदारांबाबत कारवाईच्या नुकत्याच पार पडलेल्या बैठकीमध्ये सूचना देण्यात आल्या. सदर बैठकीमध्ये, पाच लाखांहून अधिक थकबाकीदारांच्या यादीचे वाटप संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांना करण्यात आले. थकबाकीदारांवर तीन टप्प्यामध्ये कारवाई करण्यात येणार असून त्याबाबतसुद्धा स्पष्ट सूचना देण्यात आल्या. यासोबतच, पहिल्या टप्प्यात प्रशासन अधिकारी व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना येत्या दहा दिवसांमध्ये पाच लाखांहून अधिक थकबाकी असणाऱ्या थकबाकीदारांचा सातबारा, प्रॉपर्टी कार्ड प्राप्त करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. याबरोबर, अधिकाऱ्यांनी संबंधित तलाठ्यांना पत्रव्यवहार करुन येत्या दहा दिवसात थकबाकीदारांच्या थकीत रकमेचा बोजा संबंधिताच्या सातबारा उताऱ्यावर चढविण्यात यावा. असे निर्देश कर आकारणी व कर संकलन विभागाचे सहाय्यक आयुक्त अविनाश शिंदे यांनी दिले आहेत.

### दुसऱ्या टप्प्यात महापालिका राबविणार मालमत्ता जप्तीची धडक मोहिम!

● आतापर्यंत चालू वर्षी ३ लाख ७२ हजार ६६७ मालमत्ताधारकांनी ५०७ कोटींच्या कराचा भरणा केला आहे. एकूण मालमत्ताधारकांकडून मागील वर्षीपर्यंतचा ७२५ कोटींचा थकीत कर बाकी असून आंशिक कर भरलेल्यांकडून ४५.७८ कोटींचा थकीत कर येणे बाकी आहे. त्याचबरोबर, चालू वर्षीच्या मागणीपैकी २३३ कोटींचा कर थकीत असून ८४.८ कोटींचा कर आंशिक कर भरलेल्यांकडून येणे बाकी आहे. यामध्ये शहरातील मालमत्ताधारकांमध्ये पाच लाखाहून अधिक रक्कम असलेल्या २,०२२ थकबाकीदारांकडे तब्बल २८०.६८ कोटींचा कर थकीत आहे. या थकीत मालमत्तांधारकांनी येत्या दहा दिवसांमध्ये आपल्या थकीत रकमेचा भरणा न केल्यास संबंधित मालमत्तांवर जप्तीची कारवाई सुरु करण्याच्या अशा सूचना प्रशासन अधिकारी व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना बैठकीत देण्यात आल्या आहेत.

> पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील मालमत्ताधारकांनी सदैव जागरूकपणे कराचा भरणा करून शहराच्या विकासामध्ये हातभार लावला आहे. अद्यापि काही थकबाकीदारांनी आपल्या थकीत कराचा भरणा केला नसून त्यावर आता विलंब शुल्कही लागू झाले आहे. शहराच्या विकासासाठी आपला कर वेळेत भरण्यासाठी महापालिका वारंवार विविध माध्यमातून आवाहन करीत आहे. अद्याप कर भरणाऱ्या थकबारीदारांची संख्या मोठी असून त्यामधील पाच लाखाहून अधिक थकीत रक्कम असणाऱ्या थकबाकीदारांच्या सातबारा उताऱ्यावर येत्या दहा दिवसांमध्ये थकीत रकमेचा बोजा चढवला जाणार आहे. तरी, येत्या दहा दिवसांत आपल्या कराचा भरणा करुन दुसऱ्या टप्पात होणारी मालमत्ताजप्तीची कारवाई टाळावी."
>
> **—शेखर सिंह,** आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी - चिंचवड महानगरपालिका

### तिसऱ्या टप्प्यात जप्त मालमत्तांचा होणार 'लिलाव'!

● येत्या काळामध्ये जे थकबाकीदार आपल्या थकीत कराचा भरणा करणार नाहीत. अशा थकबाकीदारांच्या मालमत्ता महापालिकेकडून जप्त केल्या जाणार आहेत. मालमत्ता जप्तीच्या मोहिमेत जप्त केलेल्या मालमत्तांचा महापालिका लिलाव करणार आहे. त्यामुळे संबंधित थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त केल्यानंतर सदर मालमत्तांचा लिलाव करावा. अशा सक्त सूचना बैठकीमध्ये संबंधित क्षेत्रीय अधिकारी व प्रशासन अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

### पाच लाखाहून अधिक थकीत रक्कम असणाऱ्या थकबाकीदारांचा 'असा' होणार 'बोभाटा'!

● थकबाकीदारांना आवाहन करण्यासाठी सर्जनशील अभियानांच्या माध्यमांतून विभाग करणार जनजागृती

● पाच लाखांहून अधिक थकबाकीदारांची यादी असणाऱ्यांची नावे वर्तमानपत्र, सोशल मीडियातून होणार प्रसिध्द

● मालमत्तेसमोर स्पीकरद्वारे थकबाकीदारांची नावे पुकारण्यात येऊन होणार मालमत्ता जप्तीची कारवाई




## पिंपरीच्या आखाड्यात पैलवान..!

# पै. दीपक रोकडे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून प्रबळ दावेदार





■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** आपले शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य तंदुरुस्त असणे गरजेचे आहे, आरोग्य अशी गोष्ट आहे की पैशाने विकत घेता येत नाही. निरोगी आरोग्यासाठी व्यायाम, संतुलित आहार, ताणतणाव मुक्त जीवन जगा, असे आवाहन गुणवंत कामगार कल्याण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या कार्यक्रमात डॉ. प्रमोद कुबडे यांनी केले.

वाहतूक विभागाचे उपायुक्त बापूसाहेब बांगर म्हणाले की आपल्या शहरात गेल्या दोन वर्षात 373 रस्ते अपघातात नागरिक मृत्यू झाले 70 खून दोन वर्षातील 20 ते 40 वयोगटातील नागरिकांचे झाले आहेत. जास्तीत जास्त दुचाकी आणि पाई चालणाऱ्या नागरिकांचे मृत्यू झाले आहेत. "आपण सुरक्षित तर आपले कुटुंब "सुरक्षित रहा, व्यसनमुक्त जीवन जगा, जग सुंदर आहे, असे त्यांनी यावेळी सांगितले. बी.एल.जोशी लायन्स इंटरनॅशनलचे म्हणाले की, विम्या यासंबंधीची माहिती कोणी गांभीर्याने घेत नाही. देशात फक्त 5%ते 6% लोकांचा विमा आहे. वार्षिक उत्पन्नाच्या 25% रकमेच्या तरी विमा घेतला पाहिजे. प्रत्येकाचा जीवन विमा, अपघात विमा असणे गरजेचे आहे. राजेंद्र साळुंके निवृत्त सहाय्यक आयुक्त म्हणाले की कामगारांनी काम करताना एसओपी पाळली पाहिजे फाजील आत्मविश्वास जीविताला घातक ठरू शकतो कोणत्या प्रकारचे काम समजल्याशिवाय करू नये असे त्यांनी सांगितले. कामगार मंडळाच्या अध्यक्षा डॉ. भारती चव्हाण म्हणाल्या की, खंत व्यक्त केली की भारतात वाहतुकीचे नियम मोडणे हे स्टेटस समजले जाते. हेल्मेट न घालणे, सिग्नल न पाळणे, हे दुर्दैवी आहे. विम्याचे महत्त्व आम्ही महाराष्ट्रभर संस्थेच्या माध्यमातून नागरिकांना पटवून देणार आहोत असे त्यांनी यावेळी सांगितले. वृक्षमित्र व मराठवाडा जनविकास संघाचे अध्यक्ष अरुण पवार म्हणाले कि कामगार कल्याण मंडळ व मराठवाडा जनविकास संघ दोन्ही संस्था मिळून यापुढे रक्तदान शिबिरे ग्रामीण भागात घेणार असल्याचे त्यांनी सांगितले

शहराध्यक्ष मोहम्मदशरीफ मुलांणी यांनी प्रास्ताविक करून मंडळांने आता पण राबवलेले योजना व सामाजिक कार्याची माहिती दिली.

सचिव राजेश हजारे यांनी महाराष्ट्र कामगार मंडळांने बंद केलेले साहित्य संमेलन परत पत्रव्यवहार करून चालू केल्याचे सांगितले. यावेळी काम कामगार कल्याण मंडळाच्या अध्यक्षा भारतीताई चव्हाण, सेवानिवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त राजेंद्र साळुंके, उपायुक्त वाहतूक विभाग बापूसाहेब बांगर, प्रांतकाल लायसन इंटरनॅशनलचे बी. एल. जोशी, डॉ प्रमोद कुबडे एमडी स्टार हॉस्पिटल, वृक्षमित्र अरुण पवार, अँड अनिरुद्ध सानप,कोअर कमिटी सदस्य भरत शिंदे, राजेश हजारे, आण्णा जोगदंड, तानाजी एकोंडे, संजय गोळे, संपत खैरे इत्यादी उपस्थित होते.

पान १ वरून

## पेरली जिलेबी; उगवलं कमळ!

माजी मुख्यमंत्री भूपिंदरसिंह हुड्डा संपूर्ण निवडणूक प्रचाराचे नेतृत्व करत होते आणि राहुल गांधी यांनी डझनभर सभा, विजय संकल्प यात्रा काढल्या होत्या. याशिवाय राज्यात शेतकरी, जवान आणि पैलवानांच्या नाराजीचे कथानक काँग्रेसकडून चालवले जात होते. त्यांच्यावर अन्याय होत असल्याचा मुद्दा प्रचाराच्या केंद्रस्थानी होता. महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीची तयारी करणाऱ्या दोन प्रादेशिक पक्षांना जम्मू आणि काश्मीरच्या निवडणुकीत मोठा झटका बसला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस तर उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेच्या बहुतेक सर्व उमेदवारांची अनामत रक्कम जप्त झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसने भाजपशी आघाडी न करता स्वतंत्रपणे निवडणूक लढवली. काही मोजक्यात मतदारसंघात अजितदादांनी उमेदवार उतरवले होते; पण एकाही मतदारसंघात पक्षाला आपले अस्तित्व दाखवता आले नाही. काही मतदारसंघात तर पक्षाच्या उमेदवारांना अपक्ष आणि नोटापेक्षाही कमी मते मिळाली आहेत. शिवसेनेचीही अशीच गत झाली आहे. सैन्य भरतीत अग्निवीर योजना लागू करण्यास तीव्र विरोध झाला होता आणि निवडणुकीतही हा मुद्दा महत्वाचा ठरेल, असे काँग्रेसने म्हटले होते. याशिवाय दिल्लीतील जंतरमंतरवर कुस्तीपटूंचे आंदोलन आणि त्यापूर्वी सुमारे दीड वर्ष चाललेले शेतकरी आंदोलनही काँग्रेसच्या पथ्यावर पडण्याची चिन्हे होती. मात्र हरयाणात सर्व अंदाज फोल ठरत भाजपने सलग तिसऱ्यांदा सत्ता राखली आहे. तर काँग्रेससाठी मोठा धक्का आहे.

जम्मू काश्मीरमध्ये सरकार स्थापन करण्याचे भाजपचे स्वप्न भंगले. काँग्रेस-नेशनल कॉन्फरन्स ५२ जागांवर आघाडी घेतली आहे. दुसरीकडे भाजप २७ जागांवर पुढे आहे. त्यामुळे जम्मू काश्मीरमधील राजकीय चित्र स्पष्ट झाले आहे. सुरुवातीच्या कलानुसार मानले जात होते की, मेहबूबा मुफ्ती यांचा पीडीपी आणि अपक्ष उमेदवार गेमचेंजर ठरले आहे.

३७० हटवल्यानंतर जम्मू-काश्मीरमध्ये भाजपची ही पहिलीच अग्निपरीक्षा होती. मात्र भाजप काश्मीरच्या लोकांना हा विश्वास देण्यात कमी पडली की, त्यांच्या पक्षाचे सरकार लोकांच्या कल्याणासाठी असेल. भाजप 'नवीन काश्मीर' चा नारा देत होती, मात्र जनतेने यावर विश्वास ठेवला नाही.

## सरेंडर व्हा,नाहीतर...

दरम्यान, एन्काऊंटर करण्यासाठी पोलिसांचे एक विशेष पथक सराव करीत असून, त्याबाबत गोपनीयता बाळगली जात आहे.

घाटमाथा परिसरात मुलीवर अत्याचार करणाऱ्या तिघा आरोपींच्या शोधार्थ गुन्हे शाखा, कोंढवा, वानवडी, हडपसर, लोणी काळभोर पोलिसांची पथके दिवस-रात्र काम करीत आहेत. त्याद्वारे स्थानिक नागरिकांच्या माहितीसह आजूबाजूच्या सीसीसीटीव्ही फुटेजनुसार पोलिसांनी संबंधित आरोपींची कुंडली मिळविली आहे. त्यानुसार त्यांच्या कुटुंबीयांना ताब्यात घेऊन विचारपूस केली जात आहे. विश्वसनीय सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलिसांनी संबंधितांना 'ट्रॅक' केले असून, लवकरच त्यांना ताब्यात घेतले जाणार आहे.

बोपदेव घाटात महाविद्यालयीन तरुणीवर झालेल्या सामूहिक बलात्कार प्रकरणात (एआय) वापर केला आहे. तसेच आरोपींची अधिकची माहिती देणाऱ्यास पुणे पोलिसांकडून १० लाख रुपयांचे रोख बक्षीस दिले जाणार आहे. याप्रकरणी आतापर्यंत पोलिसांनी परिसरातील तब्बल तीन हजार मोबाईल संवादाचा डेटा संकलित केला आहे. त्यांचे नाव, पत्त्यानुसार माहितीचे पोलिसांकडून तांत्रिक विश्लेषण सुरू केले आहे. तसेच अडीचशेहून अधिक सराईतांची चौकशी करण्यात आली

## माजी आमदार मुरकुटे यांना अटक

रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मुरकुटे यांना अटक झाल्याची माहिती समोर येताच, त्यांच्या निवासस्थानी कार्यकर्त्यांनी सकाळी गर्दी केली होती. नगरच्या जिल्हा रुग्णालयातदेखील गर्दी होती.

मुरकुटे यांचा नगर जिल्ह्यातील राजकारणात दबदबा आहे. त्यांच्याविरोधात अत्याचाराचा गुन्हा दाखल झाल्याने खळबळ उडाली आहे. या प्रकरणाविषयी वेगवेगळ्या चर्चा सुरू आहेत. गोविंदराव आदिक यांचा पराभव केल्याने ते जायंट किलर ठरले होते. १९८० पासून ते तीनदा आमदार म्हणून निवडून आले. नंतर त्यांचा जयंत ससाणे यांनी पराभव केला.

## पन्नास लाखाचे कोरलीन रॉक्स जप्त

वनपरिक्षेत्र अधिकारी सुरेश वरक यांच्या मार्गदर्शनाखाली लोणी काळभोरचे वनपरिमंड अधिकारी प्रमोद रासकर, आरागिरणीचे वनपरिमंडळ अधिकारी व्ही जे बाबर, वनरक्षक अंकुश कचरे, अनिल राठोड, काळुराम कड, ओंकार गुंड, प्रिती नागले व वनपरिक्षेत्रातील वनकर्मचारी वृंद यांच्या पथकाने केली आहे.



## अबॅकसमुळे मुलांच्या बौद्धिक क्षमतेत वाढ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** गणितीय कौशल्य आत्मसात् करीत आपली अंगभूत क्षमता विकसीत करण्यासाठी प्राथमिक स्तरापासूनच आजचे विद्यार्थी अबॅकसच्या माध्यमातून गणितामध्ये प्राविण्य मिळवितांना दिसतात एवरेस्ट अबॅकस अकॅडमी वडगांवशेरी पुणे या शाखेमध्ये या शालेय विद्यार्थ्यांना यासंदर्भात घेण्यात आलेल्या ३१ व्या नॅशनल अबॅकस स्पर्धेत येथील एकूण 20 विद्यार्थ्यांनी नेपूण्य संपादन करत एक प्रकारे यशाचे एवरेस्ट गाठले यशस्वी विद्यार्थ्यांना अबॅकस शिक्षिका सौ दुर्गा राहुल पवार यांनी मार्गदर्शन केले. एवरेस्ट अबैकस अकॅडमी कडून ३१ व्या राष्ट्रीय अबॅकस स्पर्शचे ऑनलाईन आणि ऑफलाईन पद्धतीने स्पर्धेचे नियोजन १५ सप्टेंबर २०२४ रोजी वेगवेगळ्या केंद्रावर करण्यात आले,

यावेळी वडगांवशेरी पुणे शाखेतील विध्यार्थ्यानी घवघवीत यश संपादन केले. विध्यार्थ्यांच्या पारितोषिक सभारंभासाठी प्रमुख पाहुणे पोलीस इन्स्पेक्टर मुंबई ब्रँच येथील आदरणीय श्री. संदीप जमदाडे साहेब उपस्थित होते. त्यांच्या हस्ते सर्व विध्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. वडगांवशेरी पुणे शाखेमधील चार विध्यार्थ्यानी पाच मिनिटात जास्तीत जास्त गणिते सोडवले व चॅम्पियन चे बक्षीस पटकवले त्यामध्ये मल्हारराजे तरडे याने १४२ गणिते सोडवले ( बेरीज + वजाबाकी ) अथर्व राहुल पवार याने पाच मिनिटात १३० गणिते सोडवले, वेदिका गवळी हिने १३६ गणिते सोडवले तसेच रवी यमजाल याने ११६ गणिते सोडवले आणि हे वरील सर्व विध्यार्थी चॅम्पियन पुरस्काराचे मानकरी ठरले. तसेच नियती पेठे, प्रियांश लड्डा, सिद्धांत सोनावणे, आयुष विक्रम जावळे, जिगीषा पुंडे, आद्यश्री अमोल अकोलकर, सावि साळवी, दुर्वेश दत्तात्रय पाटील, मृणाल चव्हाण, अर्णव कुदळे, श्लोक राजगुरू, यांनी १०० पेक्षा जास्त गुण मिळूवून पहिल्या दहा मध्ये राष्ट्रीय स्तरावर बक्षीसाचे मानकरी ठरले, तर शार्दूल चव्हाण,नेथन गायकवाड, बेस्ट रँक मिळवली तसेच अनन्या बारकूल, अभिदन्या गाडे, यांनी देखील एक्ससिलंट रँक मिळवली.

अबॅकस मुळे विध्यार्थ्यांच्या गणिताची गती वाढती तसेच एकग्रता, स्मरणशक्ती,आणि आत्मविश्वास वाढतो असे वडगांवशेरी पुणे येथील संचालिका सौ. दुर्गा राहुल पवार मॅडम यांनी सांगितले.तसेच एवरेस्ट अबॅकस अकॅडमीच्या सर्वेसर्वा अध्यक्ष सौं. कल्पना घडेकर मॅडम ने देखील विदयार्थ्यांचे आणि त्यांना मार्गदर्शन केलेल्या शिक्षिका यांचे कौतुक केले.

## मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा

# मसाप पिंपरी चिंचवड तर्फे आनंदोत्सव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पिंपरी :** केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देऊन मराठी अस्मिता जपणाऱ्या प्रत्येक मनाला आनंदित केले. अशा प्रत्येक मनाच्या मागे मराठी भाषेसाठी कार्य करणाऱ्या महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवड शाखेने पद्मश्री गिरीश प्रभुणे यांच्या हस्ते फुगे आकाशात सोडून तसेच साखर व पेढे वाटून आनंद व्यक्त केला. त्यावेळी महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवड चे अध्यक्ष राजन लाखे, तळेगाव-अंबर चे संपादक सुरेश साखवळकर, मसाप देहू शाखेचे अध्यक्ष दत्तात्रय अत्रे,मावळ शाखेचे अध्यक्ष श्रीकृष्ण पुरंदरे, संभाजी बारणे तसेच इतर मान्यवर साहित्यिक मंडळी उपस्थित होती. त्यासाठी मसाप पिंपरी चिंचवड ने आनंदोत्सव कार्यक्रम आयोजित केला होता. सनई चौघडाच्या जल्लोषात, "मराठी भाषेचा विजय असो" अशा घोषणा देत निगडी येथील मसाप शान्ता शेळके सभागृहापासून निघालेल्या मिरवणुकीत पिंपरी चिंचवड, तळेगाव, देहू येथील साहित्यिक, वाचक, रसिक या आनंदोत्सवात सहभागी झाले होते. सर्वांना त्यावेळी साखर वाटून आनंद व्यक्त करण्यात आला. सभागृहात झालेल्या कार्यक्रमात लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी तसेच मराठी मायबोलीच्या कविता व गाणी म्हणण्यात आली. मराठी भाषा ही अभिजात होतीच परंतु त्यास अभिजात भाषेचा दर्जा यासंबंधी राजमान्यता मिळाल्यानंतर मराठी माणसाची जबाबदारी वाढली असून मराठीचे जतन आणि संवर्धन करता असतानाच, व्याकरणाचे महत्व लक्षात घेऊन प्रत्येकाने शुद्ध मराठीत बोलण्याचा प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे मत प्रभुणे यांनी व्यक्त करताना या प्रक्रियेमध्ये महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवड शाखेचा सिंहाचा वाटा असल्याचे प्रामुख्याने नमूद केले. केले. सुरेश साखवळकर दत्तात्रय अत्रे, श्रीकृष्ण पुरंदरे, बाळकृष्ण अमृतकर, कांचन नेवे, प्रतिमा काळे, प्राची देशपांडे, सुनीता बोडस तेजश्री पाटील यांनी मनोगतात मराठी भाषेला अभिजात भाषा अशी राजमान्यता मिळाल्याचा आनंद व्यक्त केला. राजन लाखे यांनी मराठी भाषेला अभिजात दर्जा जाहीर होत पर्यंत २०१२ पासून त्यासाठी मसाप पिंपरी चिंचवड ने केलेल्या प्रयत्नांचा आढावा घेतला.

#रा

## » Selected



## आपली सुरक्षितता आणि आरोग्य आपली जबाबदारी - डॉ.प्रमोद कुबडे

**पिंपरी :** आपले शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य तंदुरुस्त असणे गरजेचे आहे ,आरोग्य अशी गोष्ट आहे की पैशाने विकत घेता येत नाही. निरोगी आरोग्यासाठी व्यायाम, संतुलित आहार, ताणतणाव मुक्त जीवन जगा, असे आवाहन गुणवंत कामगार कल्याण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या कार्यक्रमात डॉ. प्रमोद कुबडे यांनी केले.

वाहतूक विभागाचे उपायुक्त बापूसाहेब बांगर म्हणाले की आपल्या शहरात गेल्या दोन वर्षात 373 रस्ते अपघातात नागरिक मृत्यू झाले 70 खून दोन वर्षातील 20 ते 40 वयोगटातील नागरिकांचे झाले आहेत. जास्तीत जास्त दुचाकी आणि पाई चालणाऱ्या नागरिकांचे मृत्यू झाले आहेत. "आपण सुरक्षित तर आपले कुटुंब "सुरक्षित रहा, व्यसनमुक्त जीवन जगा, जग सुंदर आहे, असे त्यांनी यावेळी सांगितले.

बी.एल.जोशी लायन्स इंटरनॅशनलचे म्हणाले की, विम्या यासंबंधीची माहिती कोणी गांभीर्याने घेत नाही. देशात फक्त 5%ते 6% लोकांचा विमा आहे. वार्षिक उत्पन्नाच्या 25% रकमेच्या तरी विमा घेतला पाहिजे. प्रत्येकाचा जीवन विमा, अपघात विमा असणे गरजेचे आहे .

राजेंद्र साळुंके निवृत्त सहाय्यक आयुक्त म्हणाले की कामगारांनी काम करताना एसओपी पाळली पाहिजे फाजील आत्मविश्वास जीविताला घातक ठरू शकतो कोणत्या प्रकारचे काम समजल्याशिवाय करू नये असे त्यांनी सांगितले.



## महापालिकेच्या मोरवाडी आयटीआयमध्ये स्वच्छता मोहीम

**पिंपरी :** शाळा आणि महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेबद्दल जागरूकता निर्माण केल्यास देशाच्या भावी पिढीमध्ये स्वच्छतेची मुळे रुजतील, असे मत मोरवाडी येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य शशिकांत पाटील यांनी व्यक्त केले.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या मोरवाडी येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत आज आयोजित करण्यात आलेल्या विशेष स्वच्छता मोहिमेत सुमारे 650 प्रशिक्षणार्थी तसेच स्वच्छता कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदविला. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

यावेळी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे कार्यालयीन अधिक्षक उमा दरवेश, गटनिदेशक किसन खरात, शर्मिला काराबळे, मनोज ढेरंगे, शैलेश तिकोणे, प्रकाश घोडके, मुख्य लिपिक सुभाष कुंभार, प्रविण शेलार, विजय भैलुमे, मयुरी वाडेकर, सर्व निदेशक, स्वच्छता कर्मचारी, सर्पमित्र, आय इ सी बेसिक्स संस्थेचे कर्मचारी यांच्यासह प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

## आ. बनसोडे यांच्या उमेदवारीला राष्ट्रवादीतूनच कडवा विरोध



**पिंपरी :** पिंपरी राखीव विधानसभा मतदारसंघातून आमदार अण्णा बनसोडे यांनी सोडून दुसरे कोणालाही उमेदवारी द्या, अशी रोखठोक मागणी बारामती येथे निमंत्रीत करण्यात आलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या बैठकित करण्यात आली. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि युवा नेते पार्थ पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत पिंपरी व चिंचवड विधानसभा मतदारसंघातील ४० वर माजी नगरसेवक यावेळी उपस्थित होते.

आमदार बनसोडे हे कोणालाही उपलब्ध नसतात, त्यांच्याबद्दल कार्यकर्त्यांत आणि मतदारांतही तीव्र नाराजीचा सूर आहे तसेच दहा वर्षांत त्यांचे एकही काम दिसत नसल्याने यावेळी त्यांना संधी दिलीच तर पराभव वाट्याला येईल, अशी भीती माजी उपमहापौर डब्बू आसवाणी यांनी व्यक्त केली. दुसरे माजी उपमहापौर जगन्नाथ साबळे, माजी नगरसेवक काळुराम पवार यांनी त्या मागणीला पाठिंबा दिला. उपस्थित बहुसंख्य नेत्यांनी त्या मताशी सहमती दाखविल्याने आता आमदार बनसोडे यांची उमेदवारी धोक्यात आली आहे.

दरम्यान, अजितदादा पवार यांनी या विषयावर बोलताना अद्याप जागा वाटपाची चर्चा बाकी आहे. पुढचे तीन दिवस त्यासाठी महायुतीचे नेते एकत्र बसणार आहेत. आणखी काही प्रभावी इच्छुक आपल्याला भेटून गेलेत असेही अजितदादांनी स्पष्ट केले. समोर महाआघाडी कोणाला उमेदवारी देणार ते पाहून नंतर या जागेबाबत उमेदवारीचा निर्णय करण्याचे आश्वासन अजित पवार यांनी दिले.

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांची ग्वाही

# व्यापारीवर्गाच्या अडीअडचणी सोडवणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** बारामती तालुक्याच्या सर्वांगीण विकासात व्यापारी वर्गाचे मोलाचे योगदान असून, व्यापारी वर्गाशी निगडीत प्रलंबित प्रश्न आणि अडीअडचणी सोडवण्यासाठी निश्चितपणे प्रयत्न करण्यात येतील, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दिली.

बारामती व्यापारी महासंघ आणि दि बारामती मर्चंट असोसिएशनच्यावतीने सोमवारी आयोजित व्यापारी मेळाव्याच्या प्रसंगी ते बोलत होते. बारामती व्यापारी महासंघाचे अध्यक्ष सुशीलकुमार सोमाणी, संस्थापक नरेंद्र गुजराथी, दि बारामती मर्चंट असोसिएशनचे अध्यक्ष संभाजी किर्वे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.



पवार म्हणाले, शहर व परिसरात आगामी ५० वर्षाचा विचार करुन सार्वजनिक विकास कामे सुरू आहेत. नागरिकांना उत्तम दर्जाची आरोग्य सेवा देण्याकरीता रुग्णालयाची उभारणी, रस्ते, पूल, सेवा रस्ते, कालवा सुशोभीकरण, नदी सुधार कार्यक्रम, क्रीडासंकुल इमारत, दशक्रिया विधी घाट, पाण्याची साठवण व्यवस्था, श्रीमंत बाबू नाईक वाडा परिसर सुशोभीकरण, नवीन भाजीपाला विक्री केंद्र, वनसमृद्धी कण्हेरी वनोद्यान आदी विकास कामे सुरू आहेत. शहराचा विस्तार होत असताना नागरिकांना वाहतुकीची शिस्त पाळावी लागेल, असे त्यांनी सांगितले. बारामतीच्या एमआयडीसीत ५० एकर जागेत २ हजार कोटी रुपयांचा नवीन प्रकल्प येणार आहे. त्यातून परिसरातील दीड हजार मुलांना रोजगार उपलब्ध होईल. त्याबाबत मंत्रालय स्तरावरील यंत्रणेला सूचना दिल्या असून तात्काळ सर्व प्रक्रिया पूर्ण करण्याच्या दृष्टीने हालचाली सुरू केल्या आहेत, असेही त्यांनी सांगितले.

अजित पवार म्हणाले की, कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलीस प्रशासन काम करीत असून नागरिकांनी जबाबदारीने त्यांना सहकार्य करावे. नागरिकांनी कायद्याचे पालन करावे, परिसरात गुंडगिरी, दादागिरी, दहशत खपवून घेतली जाणार नाही, कायदाचा भंग करणाऱ्यावर कडक कारवाई करण्याचे पोलीस यंत्रणेला निर्देश दिले आहेत, असेही अजित पवार म्हणाले.

आगामी काळात सार्वजनिक विकास कामांच्या माध्यमातून बारामतीचा चेहरा मोहरा बदलण्यासोबतच परिसराचा कायापालट करण्याचा प्रयत्न करण्यात येईल. सर्वांच्या सहकार्याने सर्वांग सुंदर बारामतीचे स्वप्न प्रत्यक्षात उतरू शकेल, असेही त्यांनी सांगितले.

## महिलेसह मुलीचा बसमध्ये विनयभंग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** शिक्रापूर (ता. शिरुर) येथील पुणे-नगर महार्गावर खासगी बसमधून प्रवास करणाऱ्या महिलेसह तिच्या अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याची घटना घडली असून, शिक्रापूर पोलिसांनी निलेश रमेश भराटे याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. तसेच त्याला अटक करण्यात आली आहे.

शिक्रापूर येथील पुणे नगर महार्गावरुन एका खासगी बसमधून प्रवास करत असताना, पहाटेच्या सुमारास हा प्रकार घडला. आरोपीने महिला तसेच तिची अल्पवयीन मुलगी यांच्याशी गैरवर्तन केल्याचे उघड झाले. पिडीत महिलेने शिक्रापूर पोलिस ठाण्यात फिर्याद दिल्याने, पोलिसांनी निलेश रमेश भराटे याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करत त्याला अटक केली.

» Selected



## अंबाबाईला फुलांची आकर्षक सजावट

**कारेगाव** : रांजणगाव गणपती, ता.शिरुर येथील प्रगतीशील शेतकरी नानासाहेब दिनकर पाचुंदकर यांच्यावतीने नवरात्रौत्सवानिमित्त कोल्हापूर येथील अंबाबाई देवीच्या मंदिर गाभारा व मंदिर परिसरात विविध रंगी फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली.

पाचुंदकर यांच्या वतीने नवरात्रौत्सवानिमित्त दरवर्षी कोल्हापूर येथील अंबाबाई मातेला फुलांची आकर्षक सजावट करण्यात येते.

या सजावटीमध्ये शेवंतीची ५०० किलो ,झेंडूची ७०० किलो, अष्टरची २०० किलो तसेच गुलाबाची ४०० किलो, शेवंतीची १०० किलो, अंथोरियमची १०० किलो व आर्चिडची ५० गड्डी फुले व इतर साहित्य वापरून मंदिर गाभारा व परिसरात फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली.मंदिर गाभारा व परिसरातील फुलांच्या या आकर्षक सजावटीचे दर्शनासाठी आलेल्या भाविकांनी कौतुक केले.

फुलांची आकर्षक सजावट केल्याबद्दल प्रगतीशील शेतकरी पाचुंदकर यांच्यासह युवा उद्योजक मानसिंग पाचुंदकर, ज्ञानेश्वर पाचुंदकर व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांचा देवस्थान ट्रस्टच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला.

## सफाई कर्मचाऱ्यांना लाड समितीच्या शिफारशीनुसार लाभ मिळावेत : युगेंद्र

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** बारामती नगर परिषदेत रोजंदारीवर काम करणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांसाठी सन १९८५ मधील लाड समितीच्या शिफारशीस नुसार वारस हक्काने नोकरी मिळावी, अशी मागणी विद्या प्रतिष्ठानचे खजिनदार युगेंद्र पवार यांनी केली आहे. त्यासाठी आपण स्वतः या कर्मचाऱ्यांसोबत मंत्रालयात जाऊन सविस्तर माहिती घेऊन विषय मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करू, असे आश्वासन त्यांनी दिले आहे.



संबंधित सफाई कर्मचाऱ्यानी बारामती नगर परिषदेसमोर आंदोलन केले. त्याठिकाणी भेट देत युगेंद्र पवार यांनी त्यांची समस्या जाणून घेतली; आणि तोडगा काढण्यासाठी आपण मंत्रालयापर्यंत पाठपुरावा करू असे आश्वासन त्यांना दिले. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी - शरदचंद्र पवार पक्षाच्या बारामती शहर महिला अध्यक्ष आरती शेंडगे - गव्हाळे उपस्थित होत्या. यावेळी कर्मचाऱ्यांतील युवराज खिराडे, पिंकी मोरे, मोहन बिरलिंगे, स्वप्निल आढागळे, राजू शेख, इकबाल शेख, आणि अन्य कर्मचाऱ्यानी त्यांच्या अडचणी सांगितल्या.

## ऐलमा पैलमा...

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



## गांधी विद्यालयातील महाभोंडल्यात १३०० विद्यार्थीनींचा सहभाग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर :** येथील महात्मा गांधी विद्यालयात शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त महाभोंडल्यात १३०० विद्यार्थीनी सहभागी झाल्या. या कार्यक्रमास राज्य वैधमापनशास्त्र निरीक्षकपदी निवड झालेली विद्यालयाची माजी विद्यार्थिनी अपूर्वा चासकर या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

शिक्षिका नेहा साने यांनी भोंडला का साजरा केला जातो, याचे महत्त्व सांगितले. संगीत अध्यापिका माधुरी काळभोर व विद्यार्थीनींनी पारंपारिक गाणी गायली. त्यातून आरोग्यास होणारा फायदा याविषयी माहिती सांगितली. प्राचार्या संध्या कांबळे यांनी विद्यार्थिनींना आपली भारतीय संस्कृती, संस्कृतीतील मूल्य, त्यांची जपणूक व संस्कृती रक्षणाची आवश्यकता यावर मार्गदर्शन केले. यावेळी राजगुरुनगर शहरात विविध शासकीय कार्यालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, बँक या ठिकाणी कार्यरत असणाऱ्या स्वच्छता दूत म्हणून काम करणाऱ्या महिलांचा सन्मान करून श्रमप्रतिष्ठा या मूल्यांची विद्यार्थ्यांमध्ये जोपासना करण्याचा प्रयत्न करण्यात आला. याप्रसंगी उपमुख्याध्यापक दशरथ पिलगर, पर्यवेक्षिका रेखा जाधव, अस्मिता पाठक, बाळासाहेब गाडेकर, सोपान निसरड हे उपस्थित होते. प्रतिपदा गोरडे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाचे संयोजन अर्चना गोडसे, वैशाली गव्हाणे, अस्मिता पाटोळे, कविता मुळूक यांनी केले.



## प्रा.गोरडे यांना जिल्हास्तरीय 'आदर्श गुणवंत पुरस्कार'

**लोणी - धारणी :** निरगुडसर (ता.आंबेगाव ) येथील पंडीत जवाहरलाल नेहरू माध्यमिक व दत्तात्रय गोविंदराव वळसे पाटील उच्च माध्यमिक विद्यालयातील प्रा.अरुण भगवंत गोरडे यांना पुणे जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघ पुणे यांच्या वतीने " जिल्हास्तरीय आदर्श गुणवंत पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार संजय आवटे,आमदार महेश लांडगे, माजी शिक्षक आमदार भगवान साळुंके, शिक्षणाधिकारी डॉ. भाऊसाहेब कारेकर यांच्या उपस्थित अंकुराराव लांडगे सभागृह भोसरी येथे रविवारी प्रदान करण्यात आला. यावेळी जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष, सचिव व त्याचे सर्व पदाधिकारी व माजी प्राचार्य बी. डी. चव्हाण, निरगुडेवर शिक्षण संस्थेचे सचिव प्रकाश तापकीर, संचालक मुख्याध्यापक सुनिल वळसे, प्राचार्य कांताराम टाव्हरे, मुख्याध्यापक विनोद बोंबले, पर्यवेक्षक संतोष वळसे, संतोष खालकर, उद्योजिका ज्योती गोरडे, आदित्य कामठे, प्रगती कामठे-गोरडे, युवा उद्योजक प्रतिक गोरडे व विद्यालयाचे सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. पुरस्कार मिळल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष ॲड. प्रदिप वळसे पाटील, उपाध्याक्ष रामदास वळसे पाटील व सर्व संचालक व ग्रामस्थांनी प्रा. गोरडे यांचे अभिनंदन केले .

## रानभाजी संवर्धनासाठी डॉ. सुपे यांना पुरस्कार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर :** आदिवासी खाद्य संस्कृती असणाऱ्या रानभाज्यांचा जतन संवर्धन व प्रदर्शन यासाठी विशेष प्रयत्न करणाऱ्या साकुर्डी (ता. खेड) येथील एसएम सुपे मेमोरियल फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. संतोष सुपे यांना ऋषिकेश परिवाराच्या वतीने यावर्षीचा निसर्ग सेवक पुरस्कार देवून गौरव करण्यात आला. शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक राहुल पाटील यांच्या हस्ते हा पुरस्कार नाणेघाट (ता. जुन्नर) येथील रानभाज्या महोत्सवांमध्ये प्रदान करण्यात आला.



याप्रसंगी ऋषिकेश परिवाराचे अध्यक्ष सुरेश जोशी, आदिवासी महासंघाचे अध्यक्ष तुकाराम रावते, लेखाधिकारी विजय दांगट, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालिका सारिका शेळके, सुनीता बोराडे आदी उपस्थित होते. सन्मानचिन्ह सन्मानपत्र व बचत गटांनी तयार केलेल्या वस्तू असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

## दरवाजाचे कुलूप तोडून दागिने लांबवले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** नागरगाव (ता. शिरुर) येथील संजय शेलार हे काही कामानिमित्ताने घराला कुलूप लावून बाहेरगावी गेले असता, दोन दिवसांनी त्यांच्या घराचे कुलूप तुटले असल्याचे शेजारील महेंद्र शेलार यांना दिसले. त्यांनी संजय यांना फोन करुन माहिती दिली, त्यांनतर ते घरी आले असता, त्यांना दरवाजाचे कुलूप तुटलेले दिसले. त्यांनी घरात पाहणी केली असता, घरातील कपाट उघडे दिसले. दरम्यान त्यांनी कपाटाची पाहणी केली असता, चोरट्यांनी सत्तर हजार रुपये किमतीचे सोने चांदीचे दागिने चोरल्याचे दिसून आले.

## जागर नवदुर्गांचा...



**लोणी धामणी :** श्री ललिता पंचमीनिमित्त निरगुडसर (ता.आंबेगाव ) येथील पंडीत जवाहरलाल नेहरू माध्यमिक व दत्तात्रय गोविंदराव वळसे पाटील उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षिकांनी आवर्जून केलेला पेहराव.

## बोल्हाईदेवी नवरात्र उत्सवानिमित्त भजन स्पर्धेचे आयोजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वाघोली:** श्री क्षेत्र वाडेबोल्हाई येथे प्रसिद्ध असलेल्या बोल्हाई देवी नवरात्र उत्सवानिमित्त विविध धार्मिक,सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये बोल्हाई देवीची सेवा करण्याची संधी म्हणून ग्रामपंचायतीचे माजी सदस्य तथा वाडेबोल्हाई पंचक्रोशी प्रासादिक दिंडीचे संचालक विजय पायगुडे यांच्या आयोजनाखाली तर वाडेबोल्हाई पंचक्रोशी प्रासादिक दिंडी,बोल्हाई देवस्थान ट्रस्ट व समस्त ग्रामस्थ यांच्या व्यवस्थापनाखाली बुधवारी, ९ ऑक्टोंबर रोजी सकाळी ९ वाजलेपासून ते संध्याकाळी ९ वाजेपर्यंत बोल्हाईदेवी मंदिरात



भव्य भजन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.या स्पर्धेचा बक्षिस वितरण समारंभ जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष तथा पुणे जिल्हा बँकेचे संचालक प्रदिप कंद व आदी मान्यवर यांच्या हस्ते होणार आहे.अशी माहिती वाडेबोल्हाई ग्रामपंचायतीचे माजी सदस्य तथा दिंडीचे संचालक विजय पायगुडे यांनी दिली.

या भजन स्पर्धेसाठी प्रथम क्रमांक - संचालक विजय पायगुडे यांसकडून २१,००१/-, द्वीतीय क्र. - उपसरपंच किर्ती अमोल पायगुडे यांसकडून १५००१/-, तृतीय क्र. - बोल्हाई देवस्थानचे अध्यक्ष बळीराम गावडे यांसकडून ११००१/-, चतुर्थ क्र. - देवस्थानचे सल्लागार बाळासाहेब पवार यांसकडून ७००१/-, पाचवा क्र. माजी उपसरपंच विद्याधर गावडे यांसकडून ५००१/-, शिस्तबध्द संघास हभप संजय केसवड महाराज २१०१/-,उत्कृष्ठ कोरस माजी सदस्य कांताराम गावडे २१०१/-,उत्कृष्ठ तबला,पखवाज वादक सा.कार्यकर्ते ज्ञानेश्वर पायगुडे २१०१/-,उत्कृष्ठ हार्मोनियम वादक सा.आकाश पायगुडे २१०१/-, सहभागी संघास १००१/- रु. व आकर्षक सन्मान चिन्ह दिले जाणार आहे.



## वाढदिवसाचा खर्च टाळून आश्रमातील अनाथ मुलांना मदत

**वाघोली :** वाडेबोल्हाईच्या पोलिस पाटील सुषमा दर्शन चौधरी यांनी वाढदिवसाचा अनावश्यक खर्च टाळून येथील माऊली बालक आश्रमातील सर्व अनाथ मुलांना दैनंदिन वापरातील सर्व प्रकारच्या वस्तूंचे किट वाटप करून मदत केली. तसेच अन्नदान करून सुषमा चौधरी यांनी त्यांचा वाढदिवस साजरा केला. सामाजिक कार्यकर्ते, चौधरी कुटुंबीय व मित्रपरिवार यांनी उपस्थित राहून सर्वांनी आश्रमातील मुलासोबत अतिशय आनंदात व उत्साहात हा वाढदिवस एक आदर्श वाढदिवस म्हणून साजरा केला. माऊली बाल आश्रमाच्या व्यवस्थापिका गोदावरी मॅडम, शेटकार, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) महिला तालुकाध्यक्षा सुरेखा भोरडे, सरपंच वैशाली केसवड, पोलीस पाटील स्वप्नाली गावडे, बिवरीचे पोलिस पाटील सागर गोते, ग्रामपंचायत सदस्या संध्या गावडे, सोनाली शिंदे, ज्ञानेश्वरी इंगळे, द्रौपदा इंगळे, अनिता इंगळे, सुजाता इंगळे, संध्या भोर, पूनम शिंदे, आशा चौधरी, देवस्थान चेअरमन विट्ठल गावडे, खजिनदार दत्तात्रय गोते, विशाल गावडे, अक्षय शिंदे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन लांडे यांनी केले, तर आदित्य पारेकर या विद्यार्थ्याने आभार मानले.

## पिवळे सोने विजयादशमीसाठी सज्ज बाजारभाव चांगला मिळण्याची शक्यता

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** विजयादशमीसाठी झेंडूचे पिक तयार झाले असून, सासवड तालुक्यात त्याची मोठ्या प्रमाणावर लागवड केली जाते. हे पिवळे सोने शेतकरी बांधवांना चार पैसे मिळवून देत असल्याने, यंदा त्याला चांगला भाव मिळेल अशी अपेक्षा आहे. कुंभारवळण येथील शेतकरी सुभाष कुंभारकर यांनी आपल्या शेतात यंदा मोठ्या प्रमाणात झेंडुची लागवड केली आहे.



दसऱ्याच्या दिवशी झेंडू या फुलाला चांगली मागणी असते आणि या दिवशी झेंडूचे दर देखील चांगला असतो, असे सुभाष कुंभारकर यांनी सांगितले. यंदा पावसाने चांगलाच हजेरी लावली त्या झेंडुची रोपे रहातात की वाहून जातोय का काय अशी परिस्थिती निर्माण झाली होती. देवाची कृपा असल्याने, झेंडू चांगलाच तरारला असून, ऐन दसरा दिवाळी सणाच्या वेळी बाजारात दाखल होईल. यामुळे चार पैसे उत्पन्न मिळून मुलाबाळांना सण चांगला साजरा करता येईल, अशी त्यांची भावना आहे. यंदा पावसाने शेतकरी वर्गाला चांगलाच फटका बसला. उभी पिके पाण्याखाली गेल्याने, सर्व पिके सडून गेली. हाती काहीच लागले नाही.

## शिरूरमध्ये लोकप्रतिनिधींभोवतीचा गराडा केव्हा थांबणार

# नागरिकांची भेट होणे झाले दुरापास्त

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** शिरुर तालुक्यात कोठेही आमदार, खासदार, मंत्री यांचा दौरा असला की, या लोकप्रतिनिधींच्या आजूबाजूला मोठ्या प्रमाणात ठराविक कार्यकर्त्यांचा गराडा असल्याचे दिसून येत येते. मात्र, या कार्यकर्त्यांच्या गराड्यामुळे तालुक्यातील नागरिकांना त्यांच्या समस्या मांडण्यासाठी लोकप्रतिनिधींना भेटणे अवघड होत असल्याने हा कार्यकर्त्यांचा गराडा केव्हा थांबणार, असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.

शिरुर तालुका वेगवेगळ्या गटात विभागला गेला त्यामुळे तालुक्याला वेगवेगळ्या ठिकाणचे लोकप्रतिनिधी लाभले असून सध्या शिरुर तालुक्यात वेगवेगळ्या पक्षांच्या कार्यकर्त्यांची गर्दी वाढत आहे, मात्र कोणत्याही गावात एखादे आमदार, खासदार, मंत्री किंवा नेते काही कार्यक्रमाच्या निमित्ताने आले तर त्या ठिकाणी सदर गावातील कार्यकर्ते त्यांच्या सोबत असणे गरजेचे असताना मात्र सध्या शिरुर तालुक्यात ठराविक चार पाच कार्यकर्ते व पदाधिकारी तालुक्यातील कोणत्याही गावात लोकप्रतिनिधी आल्यास तेथे हजर असतात, मात्र सदर ठराविक कार्यकर्त्यांमुळे स्थानिक पदाधिकाऱ्यांचा हिरमोड होत आहे, शिरुर सह हवेली तालुक्यातील किंवा आंबेगाव तालुक्याला जोडलेल्या काही गावांमध्ये त्या ठराविक कार्यकर्त्यांचा व पदाधिकाऱ्यांचा काहीही संबंध नसताना देखील ते प्रत्येक गावातील कार्यक्रमात हस्तक्षेप करत असल्याने त्या गावातील नागरिक व ग्रामस्थ नाराजी व्यक्त करत आहेत, त्यामुळे संपूर्ण तालुक्यात लोकप्रतिनिधींना मोजकेच कार्यकर्ते आहेत कि काय असा देखील सवाल उपस्थित केला जात असून तालुक्यात कोठेही लोकप्रतिनिधी अथवा नेत्यांचा कार्यक्रम असल्यास ठराविक कार्यकर्ते पदाधिकारी पन्नास, पन्नास किलोमीटर प्रवास करत लोक प्रतिनिधींच्या कार्यक्रम स्थळी पोहचून तेथील नियोजन करत

### पक्षाच्या रिंगटोनची वेगळीच चर्चा

● प्रत्येक पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या मोबाईलमध्ये पक्षाच्या तसेच नेत्यांच्या नावांची अनोखी रिंगटोन लावलेली असून कोणत्याही कार्यक्रम वेळी फोन आल्यास मोठ्याने आवाज होत पक्षाच्या अथवा नेत्याच्या नावाचा आवाज येतो त्यामुळे त्या रिंगटोनची वेगळीच चर्चा परिसरात रंगत आहे.

### स्नेह मेळाव्यात थेट लोकप्रतिनिधींना सवाल

● शिरुर तालुक्यातील लोकप्रतिनिधींचा नुकताच स्नेहमेळावा संपन्न झालेला असताना एका युवकाने थेट तुम्ही आमच्या गावासह कोठेही आल्यास तुमच्या भोवती आमच्या गावाशी संबंध नसलेले व्यक्ती असतात ते आम्हाला तुमच्या पर्यंत पोहचू देत नाही यावर काय तोडगा काढणार असा सवाल केल्याने सर्वांच्या भुवया उंचावल्याचे दिसून आले.

#रा

## विष्णूदादा भोसले यांची मागणी

# डॉ.आंबेडकर पुतळ्यासंदर्भात भूमिका जाहीर करा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**जिल्हाधिकारी देणार ५० लाख रुपये**

● पुतळ्याच्या शिल्पाबाबतची तपशीलवार माहिती मिळावी याबाबतचे उत्तर, शासन निर्णयाच्या अनुषंगाने सदरील बाब ही लोकवर्गणीतून होणे अपेक्षित असल्याने, सदरील बाब ही नगरपरिषेदेशी निगडीत नसून समितीशी निगडीत आहे, असे उत्तर देण्यात आले आहे. जिल्हाधिकारी यांनी यासाठी ५० लाख रुपये लागले तरी मी देण्यासाठी तयार आहे असे आंदोलनकर्त्यांना तोंडी सांगितले आहे.

**सासवड :** भारतीय संविधानाचे निर्माते विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याबाबत शासनाची स्पष्ट भूमिका जाहीर करावी. डॉ आंबेडकर यांचा पुतळा प्रशासनाने काढून टाकला आहे. त्याचे पुनर्वसन व त्यासाठीचा खर्च हा शासनाने करावा, ही आंबेडकरी जनतेची भावना आहे. पुरंदर प्रशासनाने आपली भूमिका पत्रकार परिषेदेच्या माध्यमातून जाहीर करावी, अन्यथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले श्रमिक ब्रिगेड व समविचारी पक्ष संघटनेच्या वतीने, सासवड येथील प्रशासकीय कार्यालयासमोर जाहीर निदर्शने आंदोलन करण्यात येईल, असा इशारा प्रदेश सरचिटणीस विष्णूदादा भोसले यांनी पत्रकाद्वारे दिला आहे.

डॉ आंबेडकर यांचा पुतळा, १४ जून रोजी चूकीच्या पध्दतीने काढून टाकला. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले श्रमिक ब्रिगेड, काही सामाजिक संघटना, राजकीय पक्ष दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी या संघर्ष करीत आहेत. दि. ६ जून रोजी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले श्रमिक ब्रिगेडच्या वतीने, याबाबतचे निवेदन, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांची प्रत्यक्ष भेट घेऊन दिले. त्यावेळी त्यांनी सांगितले की, जेजुरी तालुका पुरंदर जिल्हा पुणे येथील डॉ आंबेडकर यांच्या पुतळ्यासाठी निधीवर्ग करण्यात आला आहे. याबाबत माहिती अधिकार कायद्या अंतर्गत, माहिती मागितली असता, डॉ आंबेडकर यांच्या पुतळ्यासाठी अद्याप निधी प्राप्त झाला नाही, असे उत्तर देण्यात आले. पुतळ्यासाठी जागा देण्यात आली आहे का? याच्या आदेशा बाबत नगरपरिषद प्रशासन बोलत नाही. निवासी उपजिल्हाधिकारी निधी वर्ग करण्यात आला आहे, असे सांगत आहेत. डॉ. आंबेडकर, यांचा पुतळा शिल्प सुशोभीकरणासाठी पुरंदर हवेलीचे लोकप्रतिनिधी आमदार संजय जगताप यांनी त्यांच्या फंडातून निधी दिला असे आमदारांचे म्हणणे आहे. डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या सुशोभीकरणासाठी नगर परिषेदेचा कसलाही संबंध नाही असे उत्तर आहे. आज डॉ आंबेडकर यांच्या पुतळ्याचे सुशोभीकरणाचा भूमीपूजन सोहळा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा खासदार शरद पवार यांच्या शुभहस्ते जेजुरी येथे होत आहे. परंतु मुख्याधिकारी सांगतात याचा नगरपरिषदेची कसलाही संबंध नाही.

# 'हो, मी निवडणूक लढवणार'- माजी सनदी अधिकारी संभाजी झेंडे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**सासवड :** पुरंदर हवेली विधानसभेसाठी संभाजी झेंडे यांनी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाच्या वतीने ठाम दावा केला आहे. मी तयारी केली असता, शरद पवार यांनी ही जागा कॉंग्रेस पक्षाला दिली. पवार यांचा शब्द मी पाळला, असे प्रतिपादन त्यांनी सासवड येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली

मी कोणावरही वैयक्तीक टिका किंवा चिखलफेक केली नाही मी माझ्या कामाच्या जोरावर निवडणूक लढवणार असुन पुरंदर हवेली विधानसभा मतदारसंघ हा राष्ट्रवादीचा बालेकिल्ला असून हा मतदारसंघच राष्ट्रवादीकडे असल्याने यंदा पक्षाच्या नेत्यांनी मला उमेदवारी द्यावी, अशी ठाम मागणी सुनील तटकरे, शरद पवार यांच्याकडे पुरंदर तालुक्यातील नेत्यांनी केली आहे केली असल्याचे त्यांनी सांगितले.

या वेळी पुरंदर तालुका अध्यक्ष माणिकराव झेंडेपाटील, बाळासाहेब भिंताडे, बंडुकाका जगताप, राहुल गिरमे, सयाजी वांढेकर, दिपक टकले यांच्या सह अनेक पदाधिकारी उपस्थित होते

पक्षाने मला मुलाखतीला देखील बोलवले असून यंदा राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या वतीने मी निवडणूक लढवणारच, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

गेल्या वेळी युतीचा धर्म पाळला आहे आता इतर पक्षाने देखील मला उमेदवारी मिळाली तर आपला धर्म पाळावा व निवडणुकीत सर्व सहकार्य करावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

# जेजुरी मर्दानी दसरा सोहळा तयारी पूर्ण



**तयारी सीमोल्लंघनाची:** दसरा उत्सवाच्या नियोजनासाठी जेजुरी ग्रामस्थ मंडळाची ऐतिहासिक छत्री मंदिर आवारात बैठक संपन्न झाली.

## श्री खंडोबा देवाचा पालखी सोहळा संध्याकाळी सहा वाजता निघणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या जेजुरीच्या श्री खंडोबा देवाचा मर्दानी दसरा सोहळ्याची तयारी पूर्ण झाली असून, शनिवारी सायंकाळी ६ वाजता खंडोबा देवाचा पालखी सोहळा जेजुरी गडावरून सिमोलंघनासाठी मार्गस्थ होणार आहे. मध्यरात्री एक ते दोन वाजण्याच्या सुमारास रमणा डोंगरात देव भेटीचा सोहळा संपन्न होणार असल्याचे ग्रामस्थांच्या बैठकीत देवाचे मानकरी इनामदार राजेंद्र पेशवे यांनी सांगितले.

दसरा उत्सवाच्या नियोजनाबाबत जेजुरी येथील ऐतिहासिक छत्री मंदिर आवारात श्री खंडोबा पालखी सोहळा खांदेकरी मानकरी ग्रामस्थ मंडळाच्या वतीने बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. शनिवारी विजयादशमी दिवशी श्री खंडोबा देवाचा पालखी सोहळा सायंकाळी सहा वाजता जेजुरी गडावरून निघणार असून, मध्यरात्री एक ते दोन वाजण्याच्या कालावधीत रमणा डोंगरात देवभेटीचा सोहळा होईल व दुसऱ्या दिवशी सकाळी पालखी सोहळा गडावर येईल, अशी माहिती राजेंद्र पेशवे यांनी दिली.



श्री मार्तंड देवसंस्थानच्या वतीने दसरा उत्सवा निमित्त पालखी मार्गावर विद्युत रोषणाई, पालखी मार्गाची दुरुस्ती, रमणा डोंगरात देवभेटी वेळी हवाई फटाक्यांची आतषबाजी, जेजुरी गडावर तलवार स्पर्धा घेवून विजेत्यांना रोख पारितोषिके, कलावंतांना मानधन, खांदेकरी मानकरी यांचा सन्मान आदी परंपरेनुसार उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे देवसंस्थानचे प्रमुख विश्वस्त अनिल सौंदडे यांनी यावेळी सांगितले.

या बैठकीवेळी ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष जालिंदर खोमणे, पदाधिकारी सुधीर गोडसे, कृष्णा कुदळे, इनामदार राजेंद्र पेशवे, सचिन पेशवे, गणेश आगलावे, छबन कुदळे, रोहिदास माळवदकर, संतोष खोमणे पाटील, रामदास राऊत, दीपक राऊत, राजेंद्र चौधरी, संदीप जगताप, माजी नगरसेवक हेमंत सोनवणे, जाफर पानसरे, देवाची मानकरी पालखी सोहळ्याचे खांदेकरी, पुजारी सेवक वर्ग, ग्रामस्थ आदी उपस्थित होते. तसेच देवसंस्थानचे प्रमुख विश्वस्त अनिल सौंदडे, पांडुरंग थोरवे, मंगेश घोणे, अभिजित देवकाते, पोपट खोमणे, व्यवस्थापक आशिष बाठे उपस्थित होते.

## 'एमजीव्ही ९७' बॅचने वृद्धाश्रमात साजरे केले गेट-टुगेदर

**राजगुरूनगर :** सामान्यत: हॉटेलमध्ये भेटून दिवसभर मौजमजा करून माजी विद्यार्थ्यांचे गेट-टुगेदर साजरा केले जाते. मात्र समाजाप्रती कर्तव्याच्या भावनेतून नेहमी काही ना काही उपक्रम करून समाजसेवा करणाऱ्या राजगुरूनगर 'एमजीव्ही ९७' बॅचने ग्रुपलीडर सपना राठोड यांच्या पुढाकाराने पौड (ता. मुळशी) येथील स्वामीनिवास वृद्धाश्रमास भेट देऊन आर्थिक मदत केली आहे. सपना राठोड, ज्योती मुळुक, वैशाली आवटे, विणा थिगळे, निलिमा ढमाले, ज्योत्स्ना दौंडकर, राजश्री वाईकर, शितल पवार, हेमा देवकर, समिर कहाणे, संजीव कळमकर, गणेश बगाडे, सुहास कुलकर्णी, प्रमोद घुमटकर, राजेश गव्हाणे, संतोष माळी आदींनी तेथील आजी आजोबांबरोबर दिवसभर वेळ व्यतीत करून त्यांच्या सुखदुःखात सहभागी झाले.

## खरेदी विक्री केंद्र जुन्नर बाजार समितीने सुरु करावे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नारायणगाव :** सन २०२४-२५ केंद्र सरकारने निश्चित केलेल्या किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत नाफेडमार्फत मूग . उडीद व सोयाबीन हमीभाव खरेदी विक्री केंद्र जुन्नर बाजार समितीने त्वरीत सुरु करण्याची मागणी शिवनेरी शेतकरी संघटना महाराष्ट्र राज्य अध्यक्ष राजेंद्र ढोमसे यांनी केली आहे.

या केंद्रावर नाफेडमार्फत सोयाबीन प्रत्येक क्विंटल रुपये चार हजार आठशे ब्यान्नव. उडीद रुपये प्रतिक्विंटल सात हजार चारशे आणि मुग रुपये आठ हजार सहाशे ब्याऐंशी या हमीदराने शासन खरेदी करणार आहे सध्या मूग. उडीद व सोयाबीन काढणी हंगाम सुरू झाला असून बाजार समिती आवारात नवीन शेतमालाची आवक सुरू झाली आहे

**» Selected**

## सरपंचपदी प्रिया नवनाथ पवळे यांची बिनविरोध निवड

**शिरोली :** आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेल्या चांडोली (ता.खेड) येथील



ग्रामपंचायतीच्या सरपंचपदीप्रिया नवनाथ पवळे यांची बिनविरोध निवड झाली. सरपंचपदाची निवडणूक बिनविरोध झाल्याने ग्रामस्थांनी गुलाल भंडाराची मुक्तपणे उधळण करीत आनंद व्यक्त केला.

विद्यमान सरपंच सुनीता चेतन सावंत यांनी ठरल्याप्रमाणे आपल्या पदाची मुदत संपताच सरपंचपदाचा राजीनामा दिला. त्यामुळे रिक्त असलेल्या सरपंचपदाची निवडणूक ग्रामपंचायत कार्यालयात निवडणूक निर्णय अधिकारी तथा कडूसच्या विभाग मंडलाधिकारी सविता विटे यांचे अध्यक्षतेखाली शुक्रवार रोजी घेण्यात आली. निर्धारित वेळेत सरपंच पदासाठी प्रिया पवळे यांचाच एकमेव अर्ज आला.अन्य कुणाचेही अर्ज न आल्याने पवळे यांची बिनविरोध निवड झाल्याची घोषणा विटे यांनी सभागृहात सदस्यांच्या उपस्थितीत केली.सरपंचपदाची निवडणूक अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. ग्रामपंचायतीत चिकाशेठ वाघमारे यांचे ग्रुपचे बहुमत असल्याने त्या सर्व सदस्यांना सरपंच, उपसरपंच पदाची संधी मिळत आहे.

## शिवसेना तालुकाध्यक्षासह नऊ जणांवर अ‍ॅट्रॉसिटी प्रकरणी गुन्हा

**शिक्रापूर:** शिक्रापूर ता. शिरुर येथे कार चालकाला दमदाटी करत कार हि तोडफोड करत जातीवाचक शिवीगाळ केल्याची घटना घडली असल्याने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे शिवसेना शिंदे गटाचे हवेली तालुकाध्यक्ष व वितरण समिती सदस्य विपुल हनुमंत शितोळे सह प्रवीण पंढरीनाथ सोनवणे, प्रसाद शामराव नाळे यांसह पाच अनोळखी इसम व एक महिलेवर अ‍ॅट्रॉसिटी प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिक्रापूर ता. शिरुर येथील पुणे नगर महामार्गावरून शेषराव वानखडे हे १६ एप्रिल २०२४ रोजी त्यांच्या ताब्यातील एम एच १६ सि वाय ००३२ या कार मधून चाललेले असताना त्यांची एका कार चालकासोबत किरकोळ वादावादी झाली, असून पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले हे करत आहे.

## आमदार संजय जगताप: पिण्याच्या पाण्याच्या समस्येवर कायमचा उपाय

# पूर्व पुरंदरमध्ये पाणी योजनांसाठी तलावाची गरज

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**घरात नळाने पाणी देणे ही शासनाची जबाबदारी**

● प्रत्येक वाडी - वस्तीवरील पाईपलाईन व वितरण व्यवस्थेचे सर्वेक्षण करून प्रत्येक घरात नळाने पाणी देणे ही शासनाची जबाबदारी आहे. विहिर स्रोत असणाऱ्या ठिकाणी पाण्याची तपासणी करून जल शुद्धीकरण केंद्र उभारणे, सर्व पाईपलाईन नवीन करा, जलवाहिनी चांगल्या दर्जाच्या नसतील तर त्या बदल्या पाहिजेत. योजना ठेकेदारांसाठी नाही, बोपगाव येथील कामाची चौकशी करावी अशा सुचना आमदार संजय जगताप तसेच उपस्थित सरपंच व पदाधिकाऱ्यांनी केल्या.

**सासवड :** पूर्व पुरंदरमध्ये दर तीन चार वर्षांनी निर्माण होणाऱ्या दुष्काळी परिस्थितीमुळे पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण होते. त्यावर कायमचा उपाय म्हणून जलजीवन योजनेतून पारगाव - माळशिरस प्रादेशिक योजनांवरील गावांसाठी जनाई उपसा जलसिंचन योजना आणि शिवरी प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेतील गावांसाठी वीर धरणातून पाणी आणून राजुरी आणि निळूंज येथे साठवण तलाव करून पाणी पुरवठा करण्याची आवश्यकता आहे. या दोन्ही ठिकाणी गायरान जागा उपलब्ध करून साठवण तलाव करण्यात येतील., यासाठी दोन्ही योजनांतर्गत ग्रामपंचायतींनी साठवण तलावाच्या मागणीचे ग्रामसभेचा ठराव करून पंचायत समितीमार्फत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे द्यावे असे आवाहन आमदार संजय जगताप यांनी केले.

सासवड येथे सोमवारी पुरंदर पंचायत समितीच्या सभागृहात तालुक्यात सुरू असलेल्या जलजीवन मिशन योजनेतील कामांचा गावनिहाय आढावा घेण्यात आला. याप्रसंगी जिल्हा परिषदेचे कार्यकारी अभियंता अमित पाथरवट, गटविकास अधिकारी डॉ अमिता पवार, माजी पं स सदस्या सुनिता कोलते, कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रदीप पोमण, विठ्ठलराव मोकाशी यांसह जिल्हा परिषद, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे अधिकारी, गावोगावचे सरपंच, ग्रामसेवक, सदस्य उपस्थित होते. पारगाव - माळशिरस प्रादेशिक योजनेतील चौदा गावांसाठी राजूरी येथे गायरानच्या जागेवर २५० कोटी लिटर क्षमतेचा तर शिवरी प्रादेशिक योजनांतर्गतच्या गावांसाठी निळूंज येथील गायरानात १३१ कोटी लीटर क्षमतेचे साठवण तलाव होणार आहेत. जेणेकरून टंचाई काळातील २ ते ३ महिने नागरीकांना पिण्याच्या पाण्याची समस्या येणार नाही., असे आमदार संजय जगताप यांनी सांगितले. आडाचीवाडी गावची योजना पूर्ण होऊन पाणी मिळण्यास सुरुवात झाली आहे याबद्दल अभिनंदन करण्यात आले.

## दत्तात्रय वाळुंज यांचे निधन

**राजगुरूनगर :** पतित पावन संघटनेचे खेड तालुका संस्थापक अध्यक्ष



दत्तात्रय गणपत उर्फ भाऊ वाळुंज (७७) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. राजगुरूनगर शहरात नवरात्र उत्सवाचे सर्वप्रथम आयोजन त्यांनी सुरू केले. उत्कृष्ट मलखांबपटू असलेल्या वाळुंज यांनी अनेक हिंदुत्ववादी कार्यकर्ते व खेळाडू घडविले. त्यांच्या मागे हॉटेल व्यावसायिक संदिप वाळुंज व संतोष वाळुंज असा मोठा परिवार आहे.

## उत्तम शेती पद्धती या विषयावर एक दिवसीय चर्चासत्राचे आयोजन

# केशर आंबा आर्थिकदृष्ट्या फायद्याचा- डॉ. भगवानराव कापसे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नारायणगाव :** ग्रामोन्नती मंडळ कृषि विज्ञान केंद्र, नारायणगाव (पुणे) व महाराष्ट्र अ‍ॅग्री बिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) यांच्या संयुक्त विद्यमाने आंबा पिकातील उत्तम शेती पद्धती या विषयावर एक दिवसीय चर्चासत्राचे आयोजन कृषि विज्ञान केंद्र नारायणगाव येथे करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी कृषि विज्ञान केंद्राचे चेअरमन कृषिरत्न मा. अनिलतात्या मेहेर, ग्रामोन्नती मंडळ नारायणगावचे विश्वस्त मा. प्रकाश पाटे, छत्रपती संभाजीनगर येथील गटशेती प्रणेते व उपाध्यक्ष महाकेशर आंबा उत्पादक संघ डॉ. भगवानराव कापसे, पुणे येथील ग्रँट थोरटॅनचे सल्लागार ज्ञानेश थोरात, तंत्र अधिकारी प्रमोद बनकर, कृषि विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. प्रशांत शेटे तसेच शास्त्रज्ञ भरत टेमकर, डॉ. दत्तात्रय गावडे, योगेश यादव, नारायणगाव येथील कृषि तंत्र निकेतनचे प्राचार्य राधाकृष्ण गायकवाड जुन्नर, आंबेगाव तालुक्यातील प्रगतशील आंबा बागायतदार व शेतकरी मोठया संख्येने उपस्थित होते.



उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. भगवानराव कापसे यांनी केशर आंबा लागवडीवर भर देण्याचे आवाहन केले. केशर आंब्यासाठी जमिनीची निवड, लागवड पद्धत, खत व्यवस्थापन, पॅक्लोब्युट्रॅझॉलचा वापर, आंब्याची काढणी, आंबा पिकवण्याची सुधारीत पद्धत, पॅकेजिंग आणि विक्री व्यवस्थापन याविषयी त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. ग्रामीण भागातील युवकांनी नोकरीच्या मागे न लागता जर एक एकर क्षेत्रावर अतिघन पद्धतीने केशर आंब्याची लागवड केली तर वर्षाला खर्च वजा जाता निव्वळ नफा रूपये ४ लाख होऊ शकतो केशर आंबा निर्यातीला फार मोठा वाव आहे. देशांतर्गत सुद्धा मोठी बाजारपेठ उपलब्ध आहे. मराठवाडयामध्ये महाकेशर आंबा उत्पादक संघाच्या वतीने केशर आंबा उत्पादन, निर्यात, विक्री व्यवस्थापन संदर्भात संपूर्ण सहकार्य मिळेल असे आश्वासन त्यांनी दिले. या चर्चासत्राच्या उद्‌घाटन प्रसंगी कृषि विज्ञान केंद्राचे चेअरमन कृषिरत्न अनिलतात्या मेहेर म्हणाले की, महाराष्ट्र राज्य कृषि व पणन मंडळाचे कृषि क्षेत्रामध्ये मोठे काम आहे. कृषि पणन मंडळाने विविध पिकाच्या मूल्यसाखळी व्यवस्थापनाकरिता पायाभूत सुविधा उभारण्यावर भर द्यावा. बाजारपेठेच्या मागणीनुसार कृषिमाल उत्पादनावर भर द्यावा, असे ते म्हणाले. प्रकल्प अधिकारी अजय कुदळे यांनी युरोगॅप, ग्लोबल गॅप यासंबंधी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन कृषि विज्ञान केंद्राचे प्रा. भरत टेमकर यांनी केले, तर आभार वैभव शिंदे यांनी मानले.

# उमेदवारीचा निर्णय जनतेच्या दरबारात: माने, जगदाळे, शहा

**इंदापूर :** आगामी विधानसभा निवडणुकीत निवडणूक लढवण्याचा निर्णय आम्ही जनतेचा कौल घेऊन घेणार आहोत. जनता जो निर्णय देईल तो आम्ही मान्य करून निवडणूक निर्धाराने लढू.

असे इंदापूर तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेसचे विधानसभेसाठी इच्छुक असलेल्या प्रवीण माने, आप्पासाहेब जगदाळे व भरत शहा यांनी घेतलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत स्पष्ट केले.

ते पुढे म्हणाले की आम्ही सातत्याने इंदापूर तालुक्यातील जनतेचे सेवा गेले पंचवीस वर्षे करीत आहोत. वेळोवेळी आम्हाला शब्द देण्यात आला. मात्र, आज हर्षवर्धन पाटील यांनी पक्षांमध्ये



प्रवेश करताच त्यांना उमेदवारी देण्याच्या बाबतीमध्ये त्या ठिकाणी स्पष्ट केले. आम्हाला त्यांची उमेदवारी मान्य नाही. आमच्यापैकी नव्या उमेदवारातील तुम्ही कोणालाही उमेदवारी द्या. परंतु आमच्यावर पुन्हा कोणाचे नेतृत्व लादु नका. ही भूमिका आम्ही मागील आठवड्यातच पक्षाच्या अध्यक्षांजवळ व्यक्त केली होती. मात्र, आता श्री .पाटील यांना उमेदवारी देण्याबाबत स्पष्ट संकेत देण्यात आले आहेत .

आम्हाला आता वेगळा विचार करावा लागेल. मात्र तो विचार करताना इंदापूर तालुक्यातील आम जनतेला विश्वासात घेऊन त्यांची मते आजमावूनच आम्ही येत्या ११ तारखेला मेळावा घेऊन त्या ठिकाणी आम्ही आमचा निर्णय जाहीर करू. अद्याप पर्यंत ही आम्ही पक्ष सोडलेला नाही. आतापर्यंत निष्ठेने आम्ही पक्षाचे काम केलेले आहे. लोकसभा निवडणुकीतही आम्ही हिरीरीने प्रचार करून इंदापूर तालुक्यातून मताधिक्य मिळवून दिले. असेही ते म्हणाले.

पत्रकार परिषदेला मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

## महा आघाडीत १९० जागावर एकमत

# उर्वरित १८ जागांवर तीन दिवसांत निर्णय; बैठकांवर बैठकांचा सपाटा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महाविकास आघाडीच्या नेत्यांची सोमवारपासून तीन दिवस अंतिम चर्चेची बैठक मुंबईत सुरू झाली आहे. २८८ पैकी १९० जागांच्या जागावाटपावर आघाडीत एकमत झाले असून उर्वरित ९८ जागांबाबत या तीन दिवसांत निर्णय घेतला जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

शिवसेनेच्या ठाकरे गट १२५, काँग्रेस शंभर तर शरद पवार गटाची ८० ते ९० जागांवर तयारी पूर्ण झाली आहे. विदर्भ, मराठवाडा आणि मुंबईतील काही जागांचा तिढा सुटलेला नसल्याने त्याबाबत चर्चा करण्यात येणार आहे; मात्र काहीही झाले तरी १२ ऑक्टोबरला दसऱ्यापर्यंत जागावाटप निश्चित होणार असल्याचे सांगण्यात आले. विदर्भात ६२ जागा आहेत. लोकसभेला इथे चांगले यश मिळाल्याने काँग्रेसला विधानसभेलाही जास्त जागा हव्यात. तिथे त्यांची स्पर्धा ठाकरे गटाशी आहे. मराठवाड्यात हेच चित्र आहे. नागपूर, बुलडाणा, रामटेक, मुंबईतील भायखळा, बोरिवली आदी जागांवर उद्धवसेना आणि काँग्रेसकडून रस्सीखेच सुरू आहे.

मुंबईतील लोकसभेच्या सहापैकी ३ जागा शिवसेनेच्या ठाकरे गटाने जिंकल्या. काँग्रेसला एकच जागा मिळाली. त्यामुळे येथील विधानसभेच्या ३६ पैकी २० जागांवर उद्धवसेनेने दावा केला.



**मैत्रीपूर्ण लढतीची चाचपणी**

● काही जागांवरचा तिढा सुटत नसल्याने अशा ठिकाणी मैत्रीपूर्ण लढतीच्या चाचपणीबाबतही बैठकीत चर्चा झाल्याचे सूत्रांनी सांगितले. २०१९ च्या विधानसभेला काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये दहा जागांवर मैत्रीपूर्ण लढत झाली होती. आता केवळ चाचपणी आल्याचे सूत्रांनी सांगितले.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## संतप्त गावकऱ्यांचे अनोखे आंदोलन

**लक्षवेधी**



**परभणीच्या जिंतूर-येलदरी** रस्त्यावर मागील काही दिवसांपासून मोठं मोठी खड्डे पडले आहेत. यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले असून अनेकांना आपले प्राण देखील गमवावे लागले आहेत. मात्र सार्वजनिक बांधकाम विभागाने याकडे अक्षरक्ष: दुर्लक्ष करीत असल्याचा प्रकार घडला आहे. परिणामी, या त्रासापासून संतप्त झालेल्या गावकऱ्यांनी एक अनोख्या पद्धतीने आंदोलन करत प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. यात सार्वजनिक बांधकाम विभागाचा निषेधार्थ आज याच रस्त्यावर पडलेल्या खड्यात नागरिकांनी चक्क खड्ड्यात बसून जेवण करत सार्वजनिक बांधकाम विभागाचा निषेध नोंदवला आहे.

जिंतूर येलदरी मार्गे विदर्भात जाण्यासाठी एकमेव मार्ग असल्यामुळे या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक असते. शिवाय परीसरातील अनेक गावात जाण्यासाठी याच मार्गाचा वापर करावा लागतो. मात्र मागील काही दिवसांपासून रस्त्यावर जागोजागी मोठं मोठी खड्डे पडली आहेत. रस्त्यात खड्डा की खड्यात रस्ता अशी अवस्था झाली आहे. रस्त्यावरील खड्यामुळे नेहमीच अपघात घडत आहेत. परिणामी अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे. परंतु वेळोवेळी गावकऱ्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला निवेदन देऊन रस्ता दुरुस्त करण्याची मागणी केली.

» Selected

## सोलापुरातील पत्रकारांच्या घरांसाठी ७ कोटींचा निधी



**सोलापूर :** सोलापुरातील पत्रकारांसाठी असलेल्या गृहनिर्माण प्रकल्पाच्या बाह्य सुविधांसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्र निवारा निधीतून ७ कोटींचा निधी मंजूर केला. त्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार मानत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा सोलापूर श्रमिक पत्रकार संघ आणि राज्य मराठी पत्रकार संघ यांच्या वतीने सन्मान करण्यात आला. पत्रकारांसाठी असलेल्या गृहप्रकल्पाच्या बाह्य सुविधांसाठी या निधीच्या माध्यमातून सोयी-सुविधा उभारण्या येणार आहेत. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांचा सन्मान करण्यात आला.

## राजू शेट्टींना खासदार कोट्यातून मुंबईत म्हाडाचं घर जाहीर



**मुंबई :** माजी खासदार व स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी यांनाही म्हाडाच्या लॉटरीत घर मिळालं आहे. या सोडतीसाठी १ लाख १३ हजार जणांनी अर्ज केला होता. मात्र, या अर्जदारांपैकी फक्त २०३० भाग्यवंतांना हे घर मिळाले आहे. उर्वरित अर्जदारांची निराशा झाली आहे. पण, गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांनी घराचे स्वप्न बघणाऱ्यांना खुशखबर दिली आहे. लवकरच आणखी एक लॉटरी आणणार आहोत, असे सावे यांनी जाहीर केले आहे. या घराची किंमत जवळपास १ कोटी २० लाख रुपये एवढी आहे.

# भाजप आमदाराच्या हाती तुतारी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बीड:** दोन वेळा भारतीय जनता पक्षाकडून गेवराईतून आमदार राहिलेले लक्ष्मण पवार यांनी भाजप सोडल्यात जमा आहे. कार्यालयातील फलक काढून टाकल्यानंतर आता त्यांच्या पोस्टर, बॅनरवरूनही पक्षाचे चिन्ह गायब झाले आहे. आपण किंवा कुटुंबातील कोणीही विधानसभा निवडणूक लढविणार नाही, म्हणणारे पवार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या संपर्कात आहेत.

लोकसभा निवडणुकीत या मतदार संघातून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार बजरंग सोनवणे यांना सर्वाधिक मताधिक्य भेटल्याने त्यांची पावले या पक्षाकडे वळल्याचे दिसते. सोमवारी मुंबईत राष्ट्रवादीच्या बैठकीवेळी ते या पक्षाच्या एका बड्या नेत्यांसोबतही दिसले. २०१४ व २०१९ या दोन विधानसभा निवडणुकीत लक्ष्मण पवार गेवराईतून भाजपच्या तिकिटावर विजयी झाले. लोकसभा निवडणुकीत पंकजा मुंडे यांच्या प्रचारात पवार फारसे सक्रिय नव्हते. गेवराई मतदार संघातील भाजपच्या प्रचाराची धुरा त्यांच्या भावजय गीता पवार आणि पुतणे शिवराज पवार यांनी सांभाळली. मतमोजणीत या मतदार संघातून भाजपला सर्वाधिक फटका बसला.



**सेफ गेम**

● पवार यांनी भाजप सोडल्यात जमा आहे. त्यांची पावले तुतारी वाजविणारा माणूस चिन्ह असलेल्या पक्षाकडे वळली आहेत. सोमवारी मुंबईत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या बैठकीत माजी मंत्री राजेश टोपे यांच्यासोबत पवार दिसून आले. २०१४ मध्ये ६० हजारांच्यावर फरकाने विजयी झालेल्या पवार यांचा २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत केवळ ६७९२ मतांनी विजय झाला. त्यामुळे बदलत्या वातावरणात विधानसभेला 'तुतारी वाजविणारा माणूस' तारू शकतो, असे समीकरण समर्थक मांडत आहेत.

## राज्यात आजपासून पुन्हा पाऊस



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्यातील कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भाच्या काही भागांत विजांचा कडकडाट, वादळी वारे आणि मेघगर्जनेसह मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता आहे. राज्यात मागील आठवड्यापासून 'ऑक्टोबर हिट'मुळे उन्हाचा चटका वाढत आहे. त्यामुळे नागरिकांचे चांगलेच हाल होत आहेत. आता मात्र उन्हाचा बसणारा चटका काही दिवस कमी होण्याची शक्यता वाढली आहे. राज्यातील कोकण, मध्य महाराष्ट्र आणि कोकणाच्या काही भागांत बुधवार आणि गुरुवारी पाऊस होण्याची शक्यता आहे.

# सत्ता आल्यास 'लाडकी बहीण' योजना सुरू राहणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** विरोधकांकडून कितीही अफवा पसरविल्या जात असल्या तरी महायुती सरकार 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना'च काय, अन्य कोणत्याही योजना बंद करणार नाही. आगामी विधानसभा निवडणुकीत विरोधकांना त्यांची जागा दाखवून पुन्हा महायुतीला साथ दिल्यास सर्व कल्याणकारी योजना पुढील पाच वर्षे अव्याहतपणे सुरू राहतील, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी दिली. आगामी विधानसभा निवडणुकीत आयाबहिणींसह सर्वांनी महायुतीच्या तिन्ही घटक पक्षांना निवडून द्यावे, असे आवाहन या दोन्ही नेत्यांनी केले.



मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या वचनपूर्ततेनिमित सोलापुरात यापूर्वी तीन वेळा स्थगित झालेला लाभार्थी महिलांचा शासकीय महामेळावा मंगळवारी पार पडला. हजारो लाभार्थी महिलांच्या उपस्थितीत झालेल्या या महामेळाव्यातून महायुतीकडून आगामी निवडणुकीचे रणशिंगच फुंकले. यावेळी फडणवीस आणि पवार यांनी विरोधकांवर जोरदार टीकास्त्र सोडले. अजित पवार यांनी तर महायुतीच्या तिन्ही घटक पक्षांचे चिन्ह सांगून त्या चिन्हावर बटन दाबून मतदान करण्याचे आवाहन केले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे या महामेळाव्यास येणार होते. परंतु आजारपणामुळे ते येऊ शकले नाहीत.

# अमरावतीत २४ तासांत चौघांचा खून



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**अमरावती** गेल्या २४ तासांत शहरात चार जणांचा खून करण्यात आला. भरदिवसा या घटना घडल्याने नागरिकांमध्ये घबराट पसरली आहे. आरोपींवर पोलिसांचा वचक आहे की नाही, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत. आरोपींचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी मागणी केली जात आहे.

हत्येची पहिली घटना महाजनपुरा परिसरात घडली आहे. येथील रहिवासी प्रेमराज ऊर्फ मोंटू गोळे आणि अजय वानखेडे हे दोघे मित्र दुचाकीने जयस्तंभ चौकातून जात होते. त्या वेळी ४ ते ५ जणांनी मोंटू गोळे याच्यावर चाकूने हल्ला केला. या हल्ल्यात मोंटू गंभीर जखमी झाला. नागपूर येथे उपचारासाठी नेत असताना वाटेतच त्याचा मृत्यू झाला. या हत्याकांडाचा थरार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. हल्ला करणारे आरोपी हे अल्पवयीन आहेत. मोंटू याची हत्या करताना अजय याने आरोपींना पाहिले होते. तो या हत्या प्रकरणातील एकमेव साक्षीदार होता. अजयचादेखील आरोपींनी भररस्त्यात चाकूने भोसकून खून केला आहे. यामुळे शहरात मोठी खळबळ उडाली आहे.

महाजनपुरा परिसरातील तरुणांचा जमाव सोमवारी रात्री पोलीस आयुक्तालयासमोर एकत्रित आला होता. या वेळी आरोपींच्या अटकेची मागणी करण्यात आली. पोलीस आणि जमावामध्ये बाचाबाची झाल्याने परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. विशेष बाब म्हणजे, दोघांची हत्या झाल्यानंतरही आरोपी पोलिसांच्या हाती लागले नसल्याची माहिती आहे. हत्येची तिसरी घटना शहरातील मसानगंज परिसरात घडली आहे. किरकोळ वादातून वैभव पटेरिया या युवकावर ४ ते ५ जणांच्या टोळक्याने अचानक हल्ला केला. या हल्ल्यात वैभवचा जागीच मृत्यू झाला, तर अन्य एका घटनेत बडनेरा येथे मजहर नावाच्या युवकावर त्याच्या दोन मित्रांनी हल्ला केला. यामध्ये मजहरचा मृत्यू झाला आहे. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली, तर काही आरोपी फरार आहेत.

## गोंदिया जिल्ह्यात गांजा जप्त



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**गोंदिया :** रायपूरकडून नागपुरकडे जाणाऱ्या वाहनामधून वाहतूक करण्यात येणार गांजा पोलिसांनी जप्त केला आहे. गोंदिया जिल्ह्यातील देवरी पोलिसांनी रात्री शिरपूर बांध येथील सीमाशुल्क तपासणी नाक्याजवळ ही कारवाई केली असून यात ओल्या गांज्याची २४ पाकिटे जप्त केली आहेत. परराज्यातून गांजाची तस्करी होत असल्याचे या कारवाईतून स्पष्ट झाले आहे. देवरी पोलिसांना मिळालेल्या माहितीवरून रायपूरकडून नागपूरकडे एका चार चाकी वाहनातून गांजा वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्याने त्यांनी शिरपूर, बांध येथिल सीमा शुल्क तपासणी नाक्यावर नाकेबंदी केली.

## आंदोलन...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**पुणे :** अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आंदोलन केले. स्वागत कक्षात आंदोलकांनी घोषणा दिल्या.

# देवीच्या दर्शनासाठी निघालेल्या तिघांवर काळाचा घाला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जळगाव :** सातपुड्यात वसलेल्या मनुदेवीचे दर्शन व भंडारा देण्यासाठी निघालेल्याच भाविकांवरच काळाने घाला घातला. यावल-चोपडा रस्त्यावर कारचे टायर फुटल्याने झालेल्या अपघातात धुळे जिल्ह्यातील निजामपूर येथील तीन जणांचा जागीच मृत्यू झाला. कारचालक गंभीर जखमी आहे.

धुळ्याच्या साक्री तालुक्यातील निजामपूर येथील वाणी कुटुंब हे यावल तालुक्यातील सातपुडा निवासिनी मनुदेवी याठिकाणी नवरात्रीमध्ये दरवर्षी भंडारा देत असतात. त्यानुसार नवरात्री सुरू असल्याने ठरल्याप्रमाणे मंगळवारी वाणी कुटुंबातील शैलेश श्रीधर वाणी (वय ३४), नीलेश श्रीधर वाणी (वय ३०) हे दोन भाऊ आणि त्यांच्या सोबत जितेंद्र मुरलीधर भोकरे (वय ४७) हे कारने मनुदेवी येथे भंडारा देण्यासाठी सकाळी मार्गस्थ झाले होते; मात्र मनुदेवी मंदिर काही किलोमीटर अंतरावर असतानाच त्यांच्या कारचा अपघात झाला.



चोपडा- यावल मार्गावरील मजरेहोळ फाट्याजवळ कारचा अपघात झाला. खराब रस्ता असल्याने कारचे आधी मागचे आणि नंतर पुढचे असे दोन्ही टायर फुटले. यामुळे चालकाचे नियंत्रण सुटल्याने कार समोरून येणाऱ्या बसवर आदळली. यात मागे बसलेले शैलेश वाणी, नीलेश वाणी व जितेंद्र भोकरे या तिघांचा जागीच मृत्यू झाला, तर चालक गंभीर जखमी आहे.

## मंत्रालयात पुन्हा राडा..!

# आंदोलकांचे मंत्रालयाच्या संरक्षण जाळीवर उड्या

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** धनगर आरक्षणावरून राज्यातील वातावरण कमालीचं तापलं आहे. अनुसूचित जमाती प्रवर्गातून धनगरांना आरक्षण देण्यास विरोध करत नरहरी झिरवळ यांच्यासह आदिवासी आमदारांनी मंत्रालयाच्या तिसऱ्या मजल्यावरून संरक्षण जाळीवर उड्या मारून आंदोलन केलं होतं. त्यानंतर आता धनगर आरक्षणासाठी आंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्यांनी मंत्रालयात गोंधळ घातला आहे. मंत्रालयात लावण्यात आलेल्या संरक्षण जाळीवर ३ आंदोलकांनी उड्या टाकल्यात. यावेळी धनगर आरक्षणासाठी तिघांनी जोरदार घोषणाबाजी करत जाळीवर उड्या मारल्या.



पोलिसांनी तत्काळ धाव घेत तिघांना बाहेर काढलं आहे. या घटनेमुळे मंत्रालयात खळबळ माजली आहे. अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातून आरक्षण देण्याच्या मागणीवरून धनगर समाज आक्रमक झाल्याचं बघायला मिळत आहे. धनगर समाजाच्या काही कार्यकर्त्यांनी आरक्षणाच्या मागणीसाठी आज मंत्रालयात जाऊन जोरदार आंदोलन केले. यावेळी काही कार्यकर्त्यांनी सरकारचे लक्ष वेधून घेण्यासाठी मंत्रालयाच्या दुसऱ्या मजल्यावरून थेट सुरक्षा जाळीवर उड्या मारल्या. यावेळी आंदोलकांनी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजीही केली. आदिवासी कोट्यातून आरक्षणाच्या मागणीसाठी जोरदार आंदोलन केले गेले. धनगर आंदोलकांनी सरकारविरोधी घोषणाबाजी करत संरक्षक जाळ्यावर उड्या मारल्या आहेत. धनगर आंदोलकांनी जाळ्यावर उड्या मारल्यानंतर पोलिसांनी त्यांना बाहेर काढून ताब्यात घेतलं. त्यानंतर काही आंदोकांनी मंत्रालयाच्या आवारात घोषणाबाजी केली.

धनगरांना एसटी आरक्षण देण्यास विरोध करत मागील आठवड्यात आदिवासी आमदारांनी मंत्रालयातील तिसऱ्या मजल्यावरूनसंरक्षक जाळ्यावर उड्या मारल्या होत्या. आरक्षणाच्या मुद्द्यासहित विविध मागण्यासाठीआदिवासी आमदारांनी मंत्रालयातील संरक्षक जाळ्यावर उड्या मारल्या होत्या. उड्या मारणाऱ्या आमदारांमध्ये विधानसभेचे उपाध्यक्ष, राष्ट्रवादी कॉंग्रेस -अजित पवार गटाचे दिंडोरीचे आमदार नरहरी झिरवळ, इगतपुरीचे आमदार हिरामण खोसकर, पालघरचे भाजप खासदार हेमंत सावरा, राष्ट्रवादी कॉंग्रेसच-अजित पवार गटाचे अकोलेचे आमदार किरण लहामटे, बहुजन विकास आघाडीचे बोईसरचे आमदार राजेश पाटील या आदिवासी समाजातील आमदारांचा समावेश होता

#रा

## सहा दशकानंतर हॅट्रिक; सैनी मुख्यमंत्री, काँग्रेसचे पुन्हा एकदा पानिपत

# भाजपने हरयाणात घडवला इतिहास

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चंदीगड :** हरयाणात भाजपचा सलग तिसऱ्यांदा विजय झाला आहे. या हॅट्रिकसह नायब सिंह सैनी दुसऱ्यांदा राज्याच्या मुख्यमंत्रिपदी विराजमान होणार आहेत. हरयाणात काँग्रेसचे सरकार येणार असल्याचे अनेकजण सांगत होते. त्यामुळे, आजचा हा निकाल अनेकांना धक्कादायक वाटत असेल, पण असे नाही. भाजपचे राजकारण आणि रणनीती बारकाईने जाणून घेतल्यास हरयाणाचा निकाल धक्कादायक वाटणार नाही.

लोकसभा निवडणुकीतील कामगिरीनंतर आत्मविश्वास वाढलेल्या काँग्रेसने हरयाणा विधानसभा निवडणुकीत शेतकरी, सैनिक आणि पैलवानांचा मुद्दा बराच उचलून धरला होता. विशेषतः शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर काँग्रेसने भाजपवर चौफेर टीका केली होती. हरियाणात काँग्रेसचे सरकार आल्यास शंभू सीमेवर बसलेल्या शेतकऱ्यांना आपल्या माडण्यांसाठी दिल्लीला जाणाऱ्या हरियाणाच्या सीमा खुल्या केल्या जातील, असेही काँग्रेसकडून सांगण्यात आले. विशेषतः जाट समाजाला भाजपपासून दूर करण्यासाठी बरीच रणनीती आखण्यात आली.

हरयाणातील शेतकरी भाजपवर नाराज आहेत, ते भाजपला आता धडा शिकवतील, असे दाखवण्याचा प्रयत्न करण्यात आला; मात्र आता ज्या पद्धतीने निकाल येत आहेत, त्यावरुन असे दिसते, की शेतकरी भाजपवर नाराज नसून, खूश आहेत. आता प्रश्न पडतो, की मतदानापूर्वी भाजपच्या विरोधात फिरणारे वारे अचानक भाजपच्या दिशेने कसेकाय फिरू लागले? भाजपने नेमकी कोणती रणनीती अवलंबली, ज्यामुळे पक्षाचा एकहाती विजय झाला. हरयाणा निवडणुकीतील दुसरा सर्वात मोठा मुद्दा जवानांचा होता. काँग्रेसने अग्निवीर योजनेचा संबंध हरयाणाशी जोडला. याचे कारण म्हणजे, लष्करातील सुमारे १० टक्के सैनिक हरयाणातील आहेत. हरयाणाची लोकसंख्या ३ कोटींच्या आसपास आहे. एवढेच नाही, तर शेतकरी आणि सैनिकांचा प्रश्न हरयाणातील प्रत्येक घराशी संबंधित आहे.

केंद्र सरकारची 'अग्नवीर योजना' ही सैनिकांचा सर्वात मोठा विश्वासघात असल्याचे काँग्रेसने म्हटले. लोकसभा निवडणुकीतही काँग्रेसने देशभरात हेच मुद्दे मांडले होते. हरयाणात भाजप-काँग्रेसने लोकसभेच्या ५-५ जागा जिंकल्या होत्या. तर, हरियाणाच्या 'जाट'बहुल भागात भाजपला ज्या प्रकारे यश मिळते, ते पाहता शेतकरी आणि सैनिकांचा मुद्दाच कुठे आहे? असा प्रश्न पुन्हा निर्माण झाला आहे.



### भाजपसाठी बूस्टर डोस

- लोकसभा निवडणुकीनंतर हरियाणा निवडणूक ही भाजपसाठी लिटमस टेस्ट होती. या चाचणीत भाजपला जोरदार यश मिळाले असून, आता महाराष्ट्र आणि झारखंडमध्ये निवडणुका होणार आहेत. तिथे हरियाणा निवडणुकीचा स्पष्ट संदेश जाईल, की शेतकरी आणि सैनिक भाजपसोबत आहेत.

### काँग्रेसच्या पराभवाची कारणे...

- काँग्रेसमधील गटबाजीः पक्षातील गटबाजी, हे काँग्रेसच्या पराभवाचे सर्वात मोठे कारण मानले जात आहे. कुमारी सेलजा यांची नाराजीही आता समोर आली आहे. अशोक तंवर यांचे परत येणेही काँग्रेसचे डॅमेज कंट्रोल करू शकले नाही
- अँटी इंकंबन्सी नाहीः काँग्रेस पक्ष अनेक जागांवर दहा वर्षांतील अँटी इंकंबन्सीच्या भरवशावर दिसला. याशिवाय काँग्रेसला अति आत्मविश्वास नडला.
- संविधान आणि आरक्षणाचा मुद्दा भाजपची रणनीती भेदू शकला नाही
- अनेक नेते आपल्याच जागांपुरते मर्यादित राहिले
- भाजपच्या लाभार्थी वर्गाला पर्याच शोधण्यात अपयश

## » Selected

### अमेरिकेत मोठे वादळ धडकणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**न्यूयार्क :** १० दिवसांत दुसऱ्यांदा मोठे वादळ अमेरिकेत धडकणार आहे. 'रॉयटर्स'ने दिलेल्या माहितीनुसार, मिल्टन चक्रीवादळाच्या संदर्भात फ्लोरिडामध्ये इशारा देण्यात आला आहे. राष्ट्रीय चक्रीवादळ केंद्राने याला सर्वात विनाशकारी वादळांच्या श्रेणी ५ मध्ये ठेवले आहे. या प्रकारात मोठ्या प्रमाणात जीवित व मालमत्तेची हानी होण्याचा धोका आहे. मिल्टन बुधवारी फ्लोरिडाच्या दाट लोकवस्तीच्या 'टाम्पा बे'ला धडकू शकते. आता ते टाम्पापासून एक हजार किलोमीटर अंतरावर आहे. टाम्पाची लोकसंख्या ३० लाखांहून अधिक आहे. हे वादळ टाम्पा खाडीत पोहोचल्याने ते कमकुवत होण्याची अपेक्षा आहे. यानंतर ते मध्य फ्लोरिडाहून अटलांटिक महासागराच्या दिशेने जाईल.

### हिंटन, होपफिल्ड यांना नोबेल जाहीर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जीनिव्हा :** २०२४ चा भौतिकशास्त्राचा नोबेल पुरस्कार जाहीर झाला आहे. यंदा हा पुरस्कार 'एआय'चे गॉडफादर म्हणून ओळखले जाणारे जेफ्री ई. हिंटन आणि अमेरिकन शास्त्रज्ञ जॉन जे. होपफिल्ड यांना मिळाला. कृत्रिम न्यूरॉन्सवर आधारित मशीन लर्निंगशी संबंधित नवीन तंत्रज्ञानाच्या विकासासाठी त्यांना हा सन्मान देण्यात आला आहे. जेफ्री यांना मशीन लर्निंगसाठी नोबेल पारितोषिक मिळाले. त्याचप्रमाणे त्यांनी 'एआय' हा मानवतेसाठी धोका असल्याचे वर्णन केले होते.



## भाजप मित्रपक्ष संपवत असल्याची भीती

# हरयाणा आणि जम्मू-काश्मीरनंतर महाराष्ट्राबाबत चर्चा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** हरियाणा व जम्मू काश्मीर विधानसभा निवडणुकीत स्थानिक प्रादेशिक पक्षांची जबरदस्त पीछेहाट झाली आहे. जम्मू काश्मीरमध्ये भाजपसोबत घरोबा करून नंतर काडीमोड घेणाऱ्या 'पीडीपी'ची पिछेहाट झाली, तर हरियाणात 'जेजेपीपी'चा पुरता धुव्वा उडाला आहे. याऊलट या दोन्ही राज्यांत भाजपची दमदार कामगिरी झाली आहे. या निकालामुळे भाजप आपल्या मित्रपक्षांना संपवतो का, हा प्रश्न पुन्हा एकदा चर्चिला जात आहे.

जम्मू काश्मीर व हरियाणा विधानसभा निवडणुकीचा निकाल आज घोषित झाला. त्यात जम्मू काश्मीरमध्ये ओमर अब्दुल्ला यांच्या नेतृत्वातील 'नॅशनल कॉन्फरन्स'ने आघाडी घेतली आहे. या ठिकाणी भाजप २९ जागांवर आघाडीवर आहे, तर हरियाणात भाजपला आपली सत्ता राखण्यात यश येईल असा अंदाज आहे. या दोन्ही राज्यांत भाजपने कधीकाळी आघाडी केलेल्या मित्रपक्षांची पीछेहाट झाली आहे. भाजपने जम्मू काश्मीरमध्ये 'पीडीपी'च्या मदतीने सत्ता स्थापन केली होती; पण त्यानंतर त्यांनी 'पीडीपी'चा हात सोडला होता. दुसरीकडे, हरियाणात त्यांनी 'जेजेपी'ला सोबत घेतले होते; पण विधानसभा निवडणुकीत या दोन्ही पक्षांची पीछेहाट झाली आहे. त्यामुळे भाजप प्रादेशिक पक्षांसोबत युती करून त्यांना संपवत असल्याची चर्चा पुन्हा एकदा राजकीय पटलावर रंगली आहे.



जम्मू काश्मीर व हरियाणातील विधानसभा निवडणुकीच्या निकालामुळे महाराष्ट्रातील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेना व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसची चिंता वाढली आहे. भाजपवर आतापर्यंत अनेकदा आपल्या मित्रपक्षांना संपवण्याचा आरोप झाला. भाजप स्थानिक प्रादेशिक पक्षांसोबत युती करतो. त्यानंतर त्यांच्या मदतीने हळूहळू आपली पाळेमुळे रोवतो. अखेर आपल्याच मित्रपक्षांना कमकुवत करून सत्ता काबीज करतो, असा आरोप केला जातो. यासाठी शिवसेना व शिरोमणी अकाली दलाचे उदाहरण दिले जाते. त्यात आता 'पीडीपी' व 'जेजेपी' या दोन पक्षांची भर पडली आहे.

## राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

### सहा दिवसानंतर बाजारात 'मंगल दिन'

**मुंबई :** दोन राज्यांतील विधानसभा निवडणुकीचे निकाल आणि जागतिक बाजारातून मिळालेले चांगले संकेत यामुळे आज सहा दिवसांनंतर बाजारात तेजी दिसून आली. मिडकॅप आणि स्मॉलकॅप समभागांमध्येही चांगली खरेदी नोंदवली गेली. त्यामुळे बीएसईवर सूचीबद्ध सर्व कंपन्यांच्या एकूण बाजार भांडवलात आठ लाख कोटी रुपयांची वाढ झाली.

हरियाणा विधानसभा निवडणुकीत भाजप च्या चांगल्या कामगिरीमुळे बाजारात उत्साह होता. चीनच्या अर्थव्यवस्थेसाठी केलेल्या उपाययोजनांचा धातू स्टॉकवर कोणताही परिणाम झालेला दिसत नसल्याने त्यांच्यावर दबाव होता. आजच्या वाढीसह निफ्टीने पुन्हा एकदा २५ हजारांची पातळी ओलांडली. निर्देशांकातील ५० पैकी ३५ समभाग हिरव्या रंगात बंद झाले, तर मिडकॅप निर्देशांक दोन टक्के वाढीसह बंद झाले. दिवसअखेर सेन्सेक्स ५८५ अंकांच्या वाढीसह ८१,६३५ वर बंद झाला आणि निफ्टी २१७ अंकांनी वाढून २५,०१३ वर बंद झाला. निफ्टी मिडकॅप निर्देशांक १२३६ अंकांच्या वाढीसह ५८,५३६ वर बंद झाला आणि निफ्टी बँक ५४२ अंकांच्या वाढीसह ५१,०२१ वर बंद झाला.

हरियाणा विधानसभा निवडणुकीत भाजपच्या चांगल्या कामगिरीनंतर सरकारी कंपन्यांच्या शेअर्समध्ये वाढ झाली आहे. निफ्टी पीएसयू निर्देशांक २ टक्के वाढीसह बंद झाला. ट्रेंटच्या लॅब डायमंड्स ज्वेलरी लाइन लाँच केल्यानंतर, त्याचा स्टॉक ८ टक्क्यांवर बंद झाला. एचडीएफसी बँक आणि रिलायन्स इंडस्ट्रीजचा निफ्टीच्या वाढीमध्ये सर्वात मोठा वाटा आहे. बँक गॅरंटीबाबत दूरसंचार विभागाशी चर्चा झाल्याच्या बातम्यांनंतर व्होडाफोन आयडिया ४ टक्के वाढीसह बंद झाली.

### कुस्तीपटू विनेशने घडवला इतिहास

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**चंदीगड :** हरियाणा विधानसभा निवडणुकीत भाजपने बहुमताचा आकडा पार करताना काँग्रेसला धूळ चारली आहे; पण पॅरिस ऑलिम्पिकमध्ये अपात्र ठरलेल्या कुस्तीपटू विनेश फोगाटला पराभूत करणे भाजपला जमले नाही. जे बहिणीला जमले नाही ते विनेशने एका झटक्यात करून दाखवले आहे. पाच वेळा या मतदारसंघातून भाजप जिंकला होता. विनेश फोगाटचा जुलाना विधानसभात मतदारसंघातून दणदणीत विजय झाला आहे. तिने भाजपच्या उमेदवाराचा सहा हजारांहून अधिक मतांनी पराभव केला. मतमोजणीला सुरुवात झाल्यानंतर काही फेऱ्यांमध्ये ती मागे पडली होती; पण चार-पाच फेऱ्यांनंतर तिची आघाडी वाढत गेली आणि भाजपच्या योगेश कुमार यांच्यावर तिने विजय मिळवला.

# इस्त्रायलच्या संघर्षात भारताच्या मध्यस्थिची विनंती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**तेहराण :** अलीकडच्या काळात इस्रायलच्या हल्ल्यांनी इराण आणि लेबनॉनचे कंबरडे मोडले आहे. इराण आणि लेबनॉनच्या इस्रायलशी झालेल्या संघर्षाकडे आंतरराष्ट्रीय समुदायाचे लक्ष वेधले गेले असून, लेबनॉन आणि इराणने भारताला मदतीचे आवाहन केले आहे. इस्रायलसोबत सुरू असलेले युद्ध संपवण्यासाठी भारताने मध्यस्थी करावी, असे आवाहन लेबनॉनच्या राजदूताने केले आहे. भारताचे इस्रायलशी मजबूत संबंध असून, इस्रायल भारताचे म्हणणे ऐकून घेण्यास तयार आहे, त्यामुळे लवकरात लवकर या मुद्द्यावर मदत करावी, असे ते म्हणाले.

इस्रायल-लेबनॉन युद्धाने केवळ लेबनॉनमध्येच नव्हे, तर संपूर्ण मध्यपूर्वेत अस्थिरता निर्माण केली आहे. या संघर्षात आतापर्यंत २१०० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला असून ११ हजारांहून अधिक लोक जखमी झाले आहेत. लेबनॉनचे राजदूत रबीह नरेश यांनी पत्रकार परिषदेत सांगितले, की भारत हा शांतताप्रिय देश आहे आणि एक मित्र म्हणून आमच्यासाठी महत्त्वाचा आहे. भारताचे इस्रायलशी चांगले संबंध आहेत आणि आम्हाला आशा आहे की भारत हा संघर्ष संपवण्यास मदत करेल. युद्ध हा उपाय नसून शांततेची गरज आहे, हे इस्रायलला समजावून सांगणे महत्त्वाचे आहे, असेही ते म्हणाले.



इराणचे नेतृत्वही भारताशी संवाद साधण्याचा प्रयत्न करत आहे. इराणच्या सर्वोच्च नेत्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेटण्याची इच्छा व्यक्त केली आहे. भारत या समस्येवर मध्यस्थी करू शकेल आणि इस्रायलशी सुरू असलेला संघर्ष संपवण्यास मदत करेल, अशी आशा त्यांना आहे. नरेश म्हणाले, की लाखो लोक विस्थापित झाले आहेत आणि परिस्थितीमुळे प्रदेशात गंभीर अस्थिरता निर्माण होत आहे. एक मोठी आंतरराष्ट्रीय शक्ती असलेला भारत या क्षेत्रात शांतता प्रस्थापित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. भारताचे इस्रायल आणि लेबनॉन या दोन्ही देशांशी सकारात्मक संबंध आहेत. त्यामुळे त्यांची मध्यस्थी प्रभावी होऊ शकते. राजदूत नरेश यांनी भारताने इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांच्यावर त्यांच्या आक्रमक धोरणांचा पुनर्विचार करण्यासाठी दबाव टाकण्याचे आवाहन केले. लेबनॉनच्या राजदूताने हिजबुल्लाहवरील इस्रायलचे आरोप फेटाळले आणि त्याला कायदेशीर लेबनीज राजकीय पक्ष म्हटले आहे.

## विजयोत्सव...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**श्रीनगरः :** जम्मू-काश्मीरमध्ये 'नॅशनल कॉन्फरन्स'ला सर्वाधिक जागा मिळत असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर समर्थकांनी मतमोजणी केंद्राबाहेरच जल्लोष केला.

## पराभवानंतर काँग्रेसमध्ये : 'ब्लेम गेम'

# खा. सेलजा यांचा हुडा यांच्यावर निशाणा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चंदीगड :** हरियाणा विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा दारुण पराभव झाला आहे. भाजपने हरियाणात आपले वर्चस्व कायम ठेवले आहे. या ट्रेंडमध्ये माजी मुख्यमंत्री भूपेंद्रसिंह हुडा यांचा चेहरा उदास होता. आता या ट्रेंड्सबाबत खासदार कुमारी सेलजा यांनी या पराभवाला अप्रत्यक्षरीत्या हुडा यांना जबाबदार धरले आहे. हा निकाल आश्चर्यकारक असून, विचारमंथन करण्यास सांगितले आहे.

प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना सेलजा म्हणाल्या, की आपण कुठे ६० बद्दल बोलत होतो आणि आता असे वाटते, की आपण संघर्ष करत आहोत. काही जागा अजून मिळायच्या आहेत. आम्ही अंतिम निकाल येईपर्यंत वाट पाहू. काय झाले ते पाहणे बाकी आहे. एकतर आमची चूक झाली आहे किंवा भाजपने खेळ केला आहे. आम्ही का जिंकू शकलो नाही, यावर विचारमंथन करू. हा तुमच्याबद्दल दलित समाजातील संदेशाचा परिणाम आहे का? यावर सेलजा म्हणाल्या, की अनेक गोष्टी घडतात. खरे तर मला लढायचे होते; मात्र वैयक्तिक बाबी टाळाव्यात, तरीही राज्यात कसा पराभव पत्करावा लागला आणि जिंकता आले नाही, हे पाहावे.



सेलजा यांचे विधान हुडा यांच्यावर टीका करणारे आहे. त्यांच्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे किंवा त्यांना बाजूला केल्यामुळे हे घडले. मला निवडणूक लढवायची होती हे स्पष्ट झाले आहे, असे सेलजा म्हणाल्या; पण संधी मिळाली नाही. अशाप्रकारे कुमारी सेलजा यांनी हुडा यांना पराभवाला जबाबदार धरले. कुमारी सेलजा स्वतःला मुख्यमंत्रिपदाचा चेहरा म्हणून सादर करत होत्या. त्या म्हणाल्या, की हरियाणात कधीही दलित मुख्यमंत्री झाला नाही. त्यामुळे त्यांनाही संधी मिळायला हवी; मात्र हुडा यांनी त्यांच्याच गटाला ७२ तिकिटे मिळवली.

## मच्छीमारांना समुद्रात न जाण्याचा सल्ला; लेबनॉनच्या अनेक शहराचा नाश

# इस्त्रायल किनारपट्टी भागात हल्ल्याच्या तयारीत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बेरूत/तेल अवीव :** इस्रायली लष्कराने सांगितले, की ते लवकरच लेबनॉनच्या दक्षिणेकडील किनारपट्टी भागात कारवाई सुरू करणार आहेत. लष्कराने लेबनीज लोकांना समुद्रकिनाऱ्यांपासून दूर राहण्याचा सल्ला दिला आहे. मच्छीमारांना भूमध्य समुद्राला लागून असलेल्या ६० किलोमीटरपर्यंतच्या परिसरात न जाण्याचा इशारा देण्यात आला आहे.

इस्रायली सैन्याने सांगितले, की त्यांनी एका तासाच्या आत दक्षिण लेबनॉनमध्ये 'हिजबुल्लाह'च्या १२० हून अधिक तळांवर धडक दिली. लेबनॉनच्या आरोग्य मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, या हल्ल्यात किमान दहा अग्निशामकांचा मृत्यू झाला. याशिवाय अनेक लोक अजूनही ढिगाऱ्याखाली दबले गेले आहेत. हवाई हल्ल्यांसोबतच इस्त्रायली लष्कर दक्षिण लेबनॉनमधील 'हिजबुल्लाह'च्या तळांवरही जमिनीवरून कारवाई करत आहे. या काळात सोमवारी दोन इस्रायली सैनिकांचा मृत्यू झाला. लेबनॉनमधील ग्राउंड ऑपरेशनमध्ये आतापर्यंत ११ इस्रायली सैनिकांना आपला जीव गमवावा लागला आहे.



### १९० रॉकेट डागली

- इस्रायली लष्कराने सांगितले, की 'हिजबुल्लाह'ने १९० रॉकेट डागली. यामध्ये किमान ९ जण जखमी झाले आहेत. याशिवाय मूलभूत सेवांचेही नुकसान झाले आहे. हायवे आणि अनेक घरांवर थेट हल्ले करण्यात आल्याचे इस्रायली लष्कराने सांगितले.

#रा


## जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः दौंड तालुका व गाव कोरेगाव ता. दौंड परिसरातील लोकांना कळविणेत येते की,

गाव मौजे कोरेगाव, ता. दौंड, जि. पुणे येथील गट नं १९४/२ मधील ८० आर क्षेत्र शेत जमीन मिळकत ही आमचे अशिल यांनी बापू गेनभाउ अवचिते व इतर ७ यांचेकडून साठेखताने खरेदी केलेली होती तसेच सदर मिळकतीचे सब रजिस्टार सो यांचे समोर रजिस्टर्ड कुलमुखत्यारपत्र करून दिलेले आहे. असे असताना बापू गेनभाउ अवचिते व इतर हे सदर मिळकतीवर त्रयस्थ इसमांचा हक्क, अधिकार निर्माण करू पाहत आहेत. **बापू गेनुभाउ अवचिते व इतर हे सदर क्षेत्र विक्री करण्याचे तयारीत आहेत,**

तरी सदर शेतजमीन मिळकतीबाबत कोणीही कसल्याही प्रकारे गहान, दान, लिज, खरेदी, विक्री, बक्षीस, असा व्यवहार केल्यास सदर व्यवहार हा आमचे अशिलांचे हिश्यावर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसवणूक होवू नये याकरीता सदरची नोटीस दिली असे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

**बारामती**
**दिनांकः ८/१०/२०२४**

**(ॲडव्होकेट)**
**ॲड. परेश बाबुराव रूपनवर**
**रा. बारामती ता बारामती, जि. पुणे**
**मो.नं. ८२०८९५१३५२**

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, [illegible] सलिम महंमद शेख [illegible] रोजी निधन झाले. त्यांचे नावे [illegible] मध्ये नोंद असलेली [illegible] Tata कंपनीचे TATA ACE GOLD DISEL BS-VI गाडी क्र. MH14 HU 3636 चॅसीस क्र. MAT559004LZK10634 इंजिन क्र.700CCDI02KZXS80503 कलर IRISH CREAM असा आहे. [illegible]

श्रीमती शाबीरा सलीम शेख
[illegible]

## जाहीर आवाहन

सर्व लोकांना कळविण्यात येते की अजित धोंडीबा कड राहणार मुक्काम वाकी बुद्रुक तालुका खेड जिल्हा पुणे ४१०५०१ यांचे नुकतेच निधन झाले असून त्यांच्या नावावर असलेले चार चाकी खाजगी वाहन नंबर MH14 -CS-2636 असा असून त्याचा चासी नंबर 08433 व इंजिन नंबर61011 आहे हे चार चाकी वाहन त्यांची एकमेव कायदेशीर वारसदार पत्नी श्रीमती कल्याणी अजित कड यांच्या नावावर पिंपरी चिंचवड आरटीओ कार्यालयात करण्यात येणार असून याबाबत कोणाची काही तक्रार असल्यास पंधरा दिवसाच्या आत कार्यालयात कळवावे अन्यथा कोणाची काही तक्रार नाही हे समजुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दि.- ०९/१०/२०२४

**- श्रीमती कल्याणी अजित कड**
वाकी बुद्रुक, तालुका-खेड
जिल्हा-पुणे ४१०५०१

## उपविभागीय अधिकारी हवेली, उपविभाग पुणे यांचे कार्यालय

७, निलगिरी बंगला, क्विन्स गार्डन, अल्पबचत भवनमागे, पुणे ४११००१

**नोटीस**

क्र. आरटीएस/अपिल/४८२/२०२३
दिनांक ०३/१०/२०२४

अरुणा मुरलीधर म्हस्के
रा. केळगाव आळंदी देवाची
ता. खेड जि.पुणे **वादी**

**विरुध्द**

१) बबुबाई रंगनाथ वाळके
रा. दिघी आळंदी रोड परांडे नगर ता. हवेली, जि. पुणे
२) रामभाऊ ऊर्फ रामचंद्र पांडुरंग गुंड
रा. केळगाव आळंदी देवाची ता. खेड जि.पुणे
३) विशाल रामभाऊ ऊर्फ रामचंद्र गुंड
रा. केळगाव आळंदी देवाची
ता. खेड जि.पुणे **प्रतिवादी**

मौजे दिघी, ता.हवेली, जि. पुणे येथील येथील जमीन सर्व्हे नंबर/गट नंबर ८७/६ बाबत फे. फा.क्र. २०३६० यानिर्णयाविरुध्द अपिलार्थी यांनी इकडे दाखल केलेल्या अपिलाची सुनावणी उपविभागीय अधिकारी हवेली उपविभाग पुणे यांचे कार्यालय, ७, निलगिरी बंगला, राणीचा बाग, अल्पबचत भवन मागे, पुणे-४११००१ येथे दिनांक ०७/११/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता ठेवण्यात आलेली आहे. तरी आपण नेमलेल्या तारखेस व वेळी पुराव्याच्या कागदपत्रासह न चुकता हजर ठेवण्यात आलेली आहे. सदरहू तारखेस व वेळी आपण गैरहजर राहिल्यास तुमचे काही एक म्हणणे नाही असे समजून सुनावणीत एकतर्फी निर्णय घेतला जाईल याची कृपया नोंद घ्यावी. प्रतिवादींना अपिलासोबतची कागदपत्रे पुरविण्याची जबाबदारी अपिलार्थीची राहिल.

सही /-
उपविभागीय अधिकारी हवेली,
उपविभाग पुणे करीता


इंटरनॅशनल मास्टर्स लीगच्या उद्घाटन प्रसंगी

"आम्ही सर्वांनी क्रिकेट खेळायला सुरुवात केली यामागे आमची खेळाची आवड होती. आजचा शुभारंभ मला आणि माझ्या सहकाऱ्यांना आमच्या शुभचिंतकांसाठी आम्हाला आवडणारा खेळ खेळण्याची आणखी एक संधी देत आहे. आम्ही अधिक अविस्मरणीय आठवणी तयार करण्यासाठी सज्ज आहोत!" — सचिन तेंडुलकर

"मी माझ्या निवृत्तीचा आधीच विचार केला होता. भारतात येण्यापूर्वीही मी कर्णधार आणि प्रशिक्षकाशी याबाबत बोललो होतो. या दोघांशी चर्चा केल्यानंतर मी बीसीबी अध्यक्षांना माझ्या निर्णयाची माहिती दिली. मला वाटते की टी-२० फॉरमॅटमधून निवृत्ती घेण्याची हीच योग्य वेळ आहे." — महमुदुल्लाह, फलंदाज, बांगलादेश




### महिला विश्वचषक- इंग्लंड बी ग्रुपमध्ये टॉपवर

# दक्षिण आफ्रिकेचा पराभव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महिला विश्वचषकाच्या ९व्या सामन्यात इंग्लंडने दक्षिण आफ्रिकेचा ७ गडी राखून पराभव केला. यासह इंग्लंड ब गटात अव्वल स्थानी पोहोचला आहे. शारजाह क्रिकेट स्टेडियमवर, दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला आणि ६ गडी गमावून १२४ धावा केल्या. सोफी एक्लेस्टनने १५ धावांत २ बळी घेतले.

लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लंडच्या संघाने नताली सिव्हर ब्रंटच्या नाबाद ४८ आणि सलामीवीर डॅनियल व्याटने ४३ धावा करत नाबाद ४८ धावांची खेळी केली. दोघींनी तिसऱ्या विकेटसाठी ५५ चेंडूत ६४ धावांची भागीदारी केली. मॅच विनिंग पार्टनरशिपमुळे इंग्लंडने ४ चेंडू शिल्लक असताना सामना जिंकला.



सोफी एक्लेस्टनने दक्षिण आफ्रिकेची कर्णधार लॉरा वूलवर्थला ४२ धावांवर बाद केले. सोफी एक्लेस्टनने दक्षिण आफ्रिकेची कर्णधार लॉरा वूलवर्थला ४२ धावांवर बाद केले.

प्लेअर ऑफ द मॅच एक्लेस्टन आपल्या पहिल्या सामन्यात बांगलादेशचा पराभव करणाऱ्या इंग्लिश संघाने दक्षिण आफ्रिकेची पहिली विकेट ३१ धावांवर घेतली. येथे ताजमिन ब्रिट्सला लिन्से स्मिथने बाद केले. कर्णधार लॉरा वूलवर्थने शानदार फलंदाजी केली. तिने संघाला चांगली सुरुवात करून दिली आणि ४२ धावा केल्या. तिला एक्लेस्टनने बोल्ड केले. सोफी एक्लेस्टनने दक्षिण आफ्रिका महिला संघाच्या दोन प्रमुख फलंदाजांना बाद करून सामना इंग्लंडच्या बाजूने वळवला. लॉरा वूलवर्थशिवाय ॲन डर्कसेनने ११ चेंडूत नाबाद २० आणि मेरीजन कॅपने १७ चेंडूत २६ धावांची खेळी खेळली.


सोफी एक्लेस्टनने १५ धावांत २ बळी घेतले. सोफी एक्लेस्टनने १५ धावांत २ बळी घेतले.

इंग्लिश संघाची सुरुवात खराब झाली. संघाने १६ धावांवर पहिली विकेट गमावली. यानंतर सिव्हर ब्रंटने ३६ चेंडूत नाबाद ४८ धावा केल्या. तिने आपल्या खेळीत सहा चौकार मारले. ब्रंटने सलामीवीर व्याटसोबत ५५ चेंडूत ६४ धावांची भागीदारी केली. डॅनियल व्याटने ४३ धावांच्या खेळीत ४ चौकार मारले. दक्षिण आफ्रिकेसाठी मॅरिझान कॅप, एन. मलाबा आणि नदिन डी क्लर्क यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली. तत्पूर्वी, कॅपने १७ चेंडूत २६ धावांचे योगदान दिले होते. मागील सामन्याप्रमाणे या सामन्यातही इंग्लंड संघाने चार फिरकी गोलंदाजांसह प्रवेश केला.

## सखुबाई चव्हाण ३००० मीटर स्पर्धेमध्ये प्रथम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पिंपरी चिंचवड महानगरपालिका व जिल्हा क्रीडा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धा बालेवाडी या ठिकाणी आयोजित केल्या होत्या .या स्पर्धांमध्ये तिने ३०००.मीटर धावणे या क्रीडा प्रकारात *कु. सखुबाई कुमार चव्हाण* या विद्यार्थिनीने प्रथम क्रमांक मिळविला. तसेच तिची विभागीय पातळीवर निवड झाली आहे . तिच्या या यशाबद्दल संस्थेचे मानद सचिव राजेंद्रकुमार मुथा, सहाय्यक सचिव अनिलकुमार कांकरिया तसेच कोषाध्यक्ष प्रकाशचंद चोपडा ,प्राचार्य विक्रम काळे, पर्यवेक्षक शशिकांत हुले, विभागप्रमुख अंजली कामठे , शिक्षक प्रतिनिधी रेखा लोखंडे व सर्व शिक्षकांनी सखुबाई चव्हाण तसेच क्रीडा शिक्षक श्री संदीप माशेरे यांचे मनपूर्वक हार्दिक अभिनंदन केले.

## नवरात्र उत्सव उपवास रेसिपी

### उपवासाची जिलेबी

**साहित्य :**

१) भगर पीठ
२) साबुदाणा पीठ
३)दही
४)साखर
५)खायचा कलर




**कृती :** सर्वप्रथम एक बाउल मध्ये भगर पीठ आणि थोडेसे साबुदाणा पीठ घेऊन त्या मध्ये आंबट दही मिक्स करून छान घट्ट भिजवावे रात्री झोपण्यापूर्वी

दुसऱ्या दिवशी जिलेबी करताना आधी साखरेचा एक तारी पाक करून घ्यावा आणि नंतर त्या मध्ये खायचा कलर टाकावा

त्या नंतर एका कॅरी बॅग किंवा दुधाची पिशवी असते न त्या मध्ये हे पीठ जे छान फेतून घेऊन पिशवीत भरून घ्यावे आणि पसरट पण मध्ये तेल /तूप घेऊन ते गरम करावे. गरम झाले कि पिशवीला एक कोपऱ्यात मध्ये छोटेसे होल करावे आणि गरम तेल/तूप मध्ये छान कडक तळून घ्यावे आणि गरमच पाकात टाकावे.

अशा प्रकारे सर्व जिलेबी तयार करावे आणि छान सर्व करावे. झाली मस्त उपवासाची टेस्टी जिलेबी तयार. आहे न करायला एकदम सोपी आणि खायला एकदम टेस्टी.

- सौ. स्मिता मनोज साठे

## अजित वाडेकर क्रिकेट अकादमी संघाला विजेतेपद



**पुणे :** धीरज जाधव क्रिकेट अकादमी यांच्या वतीने आयोजित पूना वेस्टर्न करंडक १४ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत अंतिम फेरीत पृथ्वीराज कोंडे (६१धावा), शौर्य कोंडे(५१धावा) यांनी केलेल्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर अजित वाडेकर क्रिकेट अकादमी संघाने ब्रिलियंट्स स्पोर्टस अकादमी संघाचा ३१धावांनी पराभव करत विजेतेपद संपादन केले. भुगाव येथील द पूना वेस्टर्न क्लब या ठिकाणी पार पडलेल्या या स्पर्धेत अंतिम फेरीत अजित वाडेकर क्रिकेट अकादमी संघाने प्रथम फलंदाजी करताना १७.५षटकात सर्वबाद १५८धावा केल्या. यात पृथ्वीराज कोंडेने ३३चेंडूत ६चौकार व ५षटकारासह ६१धावा, शौर्य कोंडेने ३६चेंडूत ८चौकार व २षटकाराच्या मदतीने ५१धावा केल्या. याच्या उत्तरात ब्रिलियंट्स स्पोर्टस अकादमी संघाला २०षटकात ८बाद १२७धावाच करता आल्या. यात युवराज मोरे २६, आर्य कुमावत २३, स्वराज मोरे २१, रणवीर चव्हाण १२, आरव नन्ना नाबाद १६ यांनी दिलेली लढत अपुरी ठरली. अजित वाडेकर क्रिकेट अकादमीकडून अलंकार पारवे(३-२५), रणवीर पांगरे(२-२९), श्रावण वाव्हळ(१-१५) यांनी सुरेख गोलंदाजी करत संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला.

## भार्गवची एशिया रेकॉर्डने घेतली दखल

**लोणी-धामणी :** वडगावपीर (ता. आंबेगाव ) येथील भार्गव विजय राजगुडे याने पुणे ते पंढरपूर या आयएएस सायकल वारीच्या आठव्या पर्वात सर्वात लहान वयाचा अवघ्या आठ वर्षाचा सायकलपटू म्हणुन नऊ तास ४७ मिनिटामध्ये सायकलिंग मध्ये १९१.९ किमी अंतर पार करत एक वेगळा विक्रम पूर्ण केला. भार्गव राजगुडे याच्या कामगिरीची एशिया बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये समावेश करून प्रमाणपत्र देऊन त्याचा सन्मान केला आहे.

भार्गव राजगुडे पिंपळे सौदागर (पुणे) येथे विबग्योर स्कूल मध्ये तिसरी इयत्तेत शिकत आहे. त्याची आई स्वाती राजगुडे या एका खासगी बँकेमध्ये व्यवस्थापक म्हणून कार्यरत आहेत. वडील विजय रामजी राजगुडे आयटी कंपनीत व्यवस्थापक म्हणून कार्यरत आहेत. ते दरवर्षी पुणे ते पंढरपूर सायकल वारी करतात. आतापर्यंत पाच सायकल वारी त्यांनी पूर्ण केल्या आहेत.आणि त्यामुळे



भार्गवला सायकलींग विषयी आवड निर्माण झाली आणि मग छोट्या १० किलोमीटरच्या सायकलिंगच्या सरावापासून सुरवात होऊन परिणीती पुणे-पंढरपूर सायकल वारी पूर्ण करण्यात झाले. सायकल वारीसाठी भार्गव मे व जुन महिन्यात रोज सकाळी सायकलिंगचा सराव त्याच्या वडिलांच्या सोबत करत होता. हळूहळू ५० नंतर १०० किलोमीटर असा प्रवास करत स्वतःला या वारीसाठी तयार केले.

### राज्य निवड चाचणी स्नुकर स्पर्धेत

# निमिष कुलकर्णी, अमरदीप घोडके, सुरज राठी, सोनु मातंग उपांत्य फेरीत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे जिल्हा बिलीयडर्स आणि स्नुकर संघटना (पीडीबीएसए) तर्फे आयोजित राज्य निवड चाचणी स्नुकर स्पर्धेत निमिष कुलकर्णी, अमरदीप घोडके, सुरज राठी आणि सोनु मातंग यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला.

अहमदनगर रोडवरील क्यु क्लब येथे झालेल्या स्पर्धेच्या उपांत्यपुर्व फेरीमध्ये अमरदीप घोडके याने रोहीत लोणकर याचा ३७-२९, १७-४८, ४२-०६, ३७-२३, ४८-०४ असा पराभव करून आगेकूच केली. पीवायसी हिंदू जिमखानाच्या निमिष कुलकर्णी याने सिद्धांत फाटे ४२-०१, ३५-४५, ४२-०६, ४७-०६, ३०-२० असा संघर्षपूर्ण पराभव करून




उपांत्य फेरी गाठली. पुना क्लबच्या सुरज राठी याने लोकेश दिवाण याचा ३७-०४, ४५-०६, २७-३५, ३६-०७, ४९-२१ असा पराभव केला. युवा खेळाडू सोनु मातंग




याने १३ वर्षीय आरव संचेती याचा ००-३८, ३८-२७, ४१-२७, ३८-००, २०-५०, ३९-२१ असा संघर्षपूर्ण पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला.

## उत्तर विभाग उपांत्य फेरीत



**पुणे :** ५३ व्या अखिल भारतीय एफसीआय आंतर विभागीय फुटबॉल स्पर्धेत अपराजित राहून उपांत्य फेरी गाठणारा उत्तर विभाग पहिला संघ ठरला आहे. श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे-बालेवाडी येथे सुरू असलेल्या स्पर्धेत शनिवारी ईशान्य विभागाचा ३-१ असा पराभव करताना उत्तर विभागाने स्पर्धेतील सलग दुसरा विजय नोंदवत ६ गुणांसह (२ विजय) ब गटात अव्वल स्थान पटकावत अंतिम चार संघांत प्रवेश केला. आशुतोष थापलियालने (१९') उत्तर विभागाचे गोल खाते उघडले. सहा मिनिटांनी जोएल बेकहॅम सायमनने (२५') त्यात भर घातली. मध्यंतराला उत्तर विभागाकडे २-० अशी आघाडी होती. उत्तरार्धात, भरण्यु बन्सलने (४३') उत्तर विभागाला ३-० असे आघाडीवर नेले. एस. चिनमुअंथांगने (६३') ईशान्य विभागासाठी गोल करताना फरक कमी केला तरी प्रतिस्पर्धी संघाने ३-१ फरकाने बाजी मारली.

### रिलायन्स डीलबाबत चुकीची माहिती पसरवली गेली

# पीटी उषांनी २४ कोटींच्या अनियमिततेचे आरोप फेटाळले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या (IOA) अध्यक्षा पीटी उषा यांनी आज कोषाध्यक्ष सहदेव यादव यांनी कॅगच्या अहवालात केलेल्या दाव्याचे खंडन केले. कॅगला आपल्या अहवालात रिलायन्ससोबतच्या प्रायोजकत्व करारात IOAला २४ कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचे आढळून आले होते.



याला उत्तर देताना डॉ.उषा यांनी मंगळवारी सांगितले की, आयओएचे कोणतेही आर्थिक नुकसान झालेले नाही. उषा म्हणाल्या, हा त्यांची प्रतिमा डागाळण्याचा डाव आहे. चुकीची माहिती देणाऱ्यांवर कायदेशीर कारवाईची धमकी दिली.

**काय होता कॅगचा आरोप?**

२०२२ मध्ये ६ कार्यक्रमांसाठी ३५ कोटी रुपयांचा करार करण्यात आला होता. या करारात नंतर आणखी चार कार्यक्रम जोडण्यात आले, परंतु IOA ला या साठी कोणतेही अतिरिक्त पैसे मिळाले नाहीत. यासाठी आयओएला २४ कोटी रुपये अधिक मिळायला हवे होते, असे कॅगचे मत आहे.

## चैतन्याच्या ओम आरोटेची बुद्धिबळ स्पर्धेत विभागीय स्तरावर निवड

**ओतूर :** ओतूर(ता.जुन्नर) येथील ग्राम विकास मंडळाच्या चैतन्य विद्यालयातील विद्यार्थी ओम बाळासाहेब आरोटे याची बुद्धिबळ स्पर्धेत विभागीय स्तरावर निवड झाल्याची माहिती विद्यालयाचे क्रीडाप्रमुख शरद माळवे यांनी दिली.

याविषयी अधिक माहिती देताना माळवे म्हणाले की, "जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा अधिकारी आणि ग्लॅडिओलस इंग्लिश मीडियम स्कूल, चाकण यांचे संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन केले होते.यामध्ये १४ वर्ष,१७ वर्ष व १९ वर्ष मुलेमुली असे गट होते.एकूण ३५० च्या आसपास स्पर्धक सहभागी



झाले होते.विद्यालयाचा विद्यार्थी ओम आरोटे याने सहाव्या फेरी अखेर यश खेचून आणले व १४ वर्षे वयोगटात त्याचा तृतीय क्रमांक आला.विभागीय स्तरावर आता त्याची निवड झाली आहे."ओमच्या या यशाबद्दल त्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.ओमचे वडील बाळासाहेब आरोटे यांचेही त्यास मार्गदर्शन लाभले.

## पेस एथलेटिक क्रिकेट अकादमी, व्हिबग्योर स्कूल बालेवाडीचे विजय

**पुणे :** चॅम्प्स स्पोर्टस फाऊंडेशन यांच्या वतीने आयोजित चॅम्प्स करंडक १२





वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीत पेस एथलेटिक क्रिकेट अकादमी, व्हिबग्योर स्कूल बालेवाडी या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजय मिळवला. धायरी येथील सहारा क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत पहिल्या लढतीत शौर्य गायकवाड(३४ धावा व ३-१६) याने केलेल्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर व्हिबग्योर स्कूल बालेवाडी संघाने मोरया क्रिकेट अकादमी संघाचा ३३ धावांनी पराभव केला. दुसऱ्या सामन्यात शौर्य जगताप(नाबाद ३७ धावा व ४-१६) याने केलेल्या सुरेख कामगिरीच्या जोरावर पेस एथलेटिक क्रिकेट अकादमी संघाने गॅरी कर्स्टन क्रिकेट अकादमी संघाचा ९ गडी राखून पराभव करत पहिला विजय नोंदवला. शौर्य जगताप व शौर्य गायकवाडला मैन ऑफ द मैच पुरस्कार भेटला.


### हॉकी नाशिक, विजय हॉकीचे संघर्षपूर्ण विजय

# एमएसएसएचे सलामीच्या लढतीत तब्बल १४ गोल

■ राष्ट्रै संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आठव्या एसएनबीपी अखिल भारतीय मुले (१६ वर्षांखालील) स्पर्धेच्या पहिल्या दिवशी मुंबई स्कूल स्पोर्ट्स असोसिएशनने (एमएसएसए) तमिळनाडू हॉकी एकेडमीचा१४-० असा धुव्वा उडवला. हॉकी नाशिक आणि विजय हॉकी अकादमीने आपल्या मोहिमेची विजयी सुरुवात केली.

बालेवाडी-म्हाळुंगे येथील शिवछत्रपती क्रीडा संकुल येथे सुरू झालेल्या हॉकी स्पर्धेत सलामीच्या लढतीत हॉकी नाशिकने ऑलिम्पियन



भास्करन हॉकी अकादमीवर २-१ असा विजय मिळवला. एच गटात रिपब्लिकन स्पोर्ट्स क्लब आणि चेन्नई इलेव्हन यांच्यात २-२ अशी बरोबरी राहिली. एफ गटात प्रयागराज, उत्तर प्रदेश येथील विजय हॉकी अकादमीने पदार्पणात संगरूरच्या गगन बाबा साहिब दास अकादमीचा २-१ असा पराभव केला.

### स्पोर्टसफिल्ड मॅनेजमेंट तर्फे आयोजित 'स्पोर्टसफिल्ड मान्सुन लीग' अजिंक्यपद स्पर्धा

# हेमंत किणीकर, क्रिकेट नेक्स्ट ॲकॅडमी, उपांत्य फेरीत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** स्पोर्टसफिल्ड मॅनेजमेंट तर्फे आयोजित तिसऱ्या 'स्पोर्टसफिल्ड मान्सुन लीग' अजिंक्यपद १४ वर्षाखालील ३०-३० षटकांच्या क्रिकेट स्पर्धेत हेमंत किणीकर क्रिकेट ॲकॅडमी, क्रिकेट नेक्स्ट ॲकॅडमी आणि योगेश इलेव्हन या संघांनी अव्वल गुण मिळवत स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला.

सातारा रोड येथील टेंभेकर फार्मस् क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत अवनीष



कुलकर्णी याने केलेल्या ५२ धावांच्या खेळीच्या जोरावर हेमंत किणीकर क्रिकेट ॲकॅडमीने विराग क्रिकेट ॲकॅडमीचा १९ धावांनी पराभव करून उपांत्य फेरी गाठली. पहिल्यांदा फलंदाजी करताना हेमंत किणीकर क्रिकेट ॲकॅडमीने १६५ धावांचे लक्ष्य उभे केले. अवनीष कुलकर्णी याने ५२ धावा, शुभम पानसे (३२ धावा) आणि ऋषभ जोशी (३२ धावा) यांनी संघाच्या डावाला आकार दिला. या लक्ष्याचा सामना करताना विराग क्रिकेट ॲकॅडमीचा डाव १४६ धावांवर मर्यादित राहीला.

नील धडफळे याने केलेल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर धीरज जाधव क्रिकेट ॲकॅडमीने सनराईज क्रिकेट ॲकॅडमी १८७ धावांनी सहज पराभव केला. नील याने १० धावांमध्ये ६ गडी बाद करून अफलातून गोलंदाजी केली. दुसऱ्या सामन्यामध्ये विराट उत्तेकर याने केलेल्या ५२ धावांच्या जोरावर विराग क्रिकेट ॲकॅडमीने स्पार्क संघाचा ५१ धावांनी सहज पराभव केला.

#रा